म. ग्रं. सं. ठाणें
विषय कादंबरी
सं. क्र. ८७८

REFBK-0003980
REFBK-0003980

कैलासवासी

तीर्थरूप

# आई व दादा

यांचे स्मृतिसमाधीवर

# रविकिरणमण्डळाचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १. | **किरण** (गद्य-पद्य, मण्डळ) | ०४ |
| २. | **काव्यविचार** (काव्यविषयक निबन्ध, मण्डळ) | १ |
| ३. | **उषा** (पद्य, मण्डळ) | ०१२ |
| ४. | **मधुमाधव** (पद्य, घाटे–माधवजूलियन्) | ०१२ |
| ५. | **शलाका** (गद्य-पद्य, मण्डळ) | १ |
| ६. | **विरहतरङ्ग** (पद्य, माधवजूलियन्) | ०८ |
| ७. | **कला** (खण्डकाव्य, गिरीश) | ०६ |
| ८. | **नाट्यरूप महाराष्ट्र** (ऐतिहासिक प्रवेश, वि. द. घाटे) | १ |
| ९. | **छन्दोरचना** (मराठी वृत्तशास्त्र, मा. त्रि. पटवर्धन) | २ |
| १०. | **प्रभा** (गद्य-पद्य, मण्डळ) | ०८ |
| ११. | **सुधारक** (खण्डकाव्य, माधवजूलियन्) | १०८ |
| १२. | **आम्बराई** ( ,, गिरीश) | १ |
| १३. | **यशोधन** (पद्य, यशवन्त) | १०८ |

मण्डळाचें पुढील पुस्तक

## उमर खय्यामच्या रुबाया

'रुबा'इयात-इ-उमर-खय्याम'चें समग्र मूळ फार्शीवरून मराठी भाषान्तर, उपयुक्त टीपा व प्रस्तावनेसहित.

भाषान्तरकार—प्रो० **माधवराव पटवर्धन**, एम्. ए.

रविकिरणमण्डळ,

४६१ शनवार, पुणें, २.

रविकिरणमण्डळाचें तेरावें पुस्तक

# यशोधन

## यशवन्त

### यांच्या निवडक कवितांचा सङ्ग्रह



दा. क्र. ३९८०
REFBK-0003980
REFBK-0003980

रविकिरणमण्डळ, पुणें

१९२९

रथसप्तमी १८५०

# रविकिरणमण्डळ

विठ्ठल दत्तात्रय घाटे, एम्. ए., बी. टी.

माधव त्रिम्बक पटवर्धन, एम्. ए.

दत्तात्रय लक्ष्मण गोखले, एम्. ए.

श्रीधर बाळकृष्ण रानडे, बी. ए., एम्. एस्सी.

[ सौ० मनोरमाबाई रानडे, बी. ए. ]

शङ्कर केशव कानेटकर, बी. ए.

गजानन त्र्यम्बक माडखोलकर

यशवन्त दिनकर पेण्ढरकर

भाषान्तरासहित सर्व हक्क कर्त्याकडे.

प्रकाशक { यशवन्त दिनकर पेण्ढरकर,
रविकिरणमण्डळ, ४६१ शनवार, पुणें, २.

मुद्रक { अनन्त सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें, २.



# यशोधनांतील धन-कण

| कविता | पृष्ठ |
|---|---|
| पाखरास | १३ |
| पाणपोई | १४ |
| शारदावन्दन | १५ |
| निष्फळ प्रतीक्षा | १७ |
| आळवणी | १८ |
| गिरीविहार | १९ |
| इन्दुकला | २४ |
| चिमुकल्या वसन्तास | ३५ |
| सुधेस | ३६ |
| कळ्यांचा भात | ३६ |
| पन्तोजीची छडी | ३७ |
| माळुं नको ग | ३८ |
| चि० भास्करभाऊस | ३९ |
| ध्यासांतून भास | ४० |
| आई | ४१ |
| सङ्क्रमण | ४३ |
| नाङ्गरखुण्टी | ४८ |
| भूपतीस मुजरा | ४८ |
| शेतकींतील सुख | ४९ |
| चौघड्याचे धडे | ५० |
| यशः श्री पायिंची दासी | ५१ |
| खलांनो | ५२ |
| आमचा धर्म | ५३ |
| माझा महाराष्ट्र | ५५ |
| स्वातन्त्र्यलक्ष्मीस मुजरा | ५६ |
| समर्थांच्या पायांशीं | ५७ |

| कविता | पृष्ठ |
|---|---|
| माण्डवी | ५९ |
| देहाचा पूल | ६१ |
| अजुन | ६४ |
| बन्दीवान् गरूड | ६५ |
| वेलीच्या नव अङ्कुरा | ६६ |
| गुलामाचें गाऱ्हाणें | ६७ |
| प्रवासी जीवास | ६८ |
| तुरुङ्गाच्या दारांत | ६९ |
| दैवास आव्हान | ७० |
| इशारा | ७१ |
| गाउं त्यांना आरती | ७२ |
| सुनीत | ७४ |
| आन्धळा झालों तर | ७४ |
| श्रीलक्ष्मीदेवीस | ७६ |
| निर्धनतेस | ७६ |
| माळावरील समाध | ७७ |
| मनःसान्त्वन | ७८ |
| सङ्ग्राम | ८० |
| ग्रामसिंहास | ८० |
| गङ्गोदक | ८१ |
| रत्नाकर | ८२ |
| चमेलीचे झेले | ८३ |
| शिलालेख | ८५ |
| एक वर्षानन्तर | ८५ |
| स्वप्नसौदामिनी | ९१ |
| लिलाव | ९२ |
| प्रीतिसङ्गम | ९५ |

| कविता | पृष्ठ |
| --- | --- |
| फिरस्त्याचें गाणें | १०० |
| मनमोहिनी | १०३ |
| प्रेमसमाधी | १०४ |
| शीलावती सुन्दरीस | १०५ |
| मनीषा | १०६ |
| दुःशीला | १०८ |
| कलङ्किता | ११० |
| पावन झाल्यावर | ११४ |
| ऐनवेळीं | ११५ |
| घर | ११५ |
| न्याहारीचें गाणें | ११६ |
| घात | ११७ |
| प्रेमाची दौलत | ११८ |
| एक कहाणी— | ११९ते१२६ |
| स्थानभ्रष्ट फुलास | ११९ |
| तूं गेलीस समोरुनी | ११९ |
| प्रेमाचें स्मारक | १२० |
| पूर्तता | १२१ |
| दैवच चित्रकार | १२१ |
| तुझ्यावाचुनी | १२२ |
| विस्मृती ?–अशक्य ! | १२३ |
| वानग्या | १२३ |
| गेला विझोनी दिवा | १२४ |
| पात्रिकाहवन | १२५ |
| ज्योतिष्मति | १२५ |
| मीलन | १२६ |
| बालगन्धर्वांस | १२७ |

| कविता | पृष्ठ |
|---|---|
| गायकास नजराणा | १२७ |
| सारङ्गीवाला | १२८ |
| कवीस | १३० |
| दिवङ्गत कवयित्रीस | १३१ |
| गाउं कशाचें गान ? | १३३ |
| मोहिता | १३५ |
| सङ्गीत सञ्जीवनी | १३५ |
| प्रतीक्षा | १३६ |
| वेध | १३७ |
| मातृपदाविण | १३८ |
| जलक्रीडा | १३९ |
| नौकाविहार | १४० |
| हा प्रश्न कशाला | १४२ |
| कोण्डमारा | १४३ |
| अनन्यभाव | १४४ |
| मृत्यूस | १४६ |
| मरणा येउं नको आतांच | १४८ |
| तळमळ | १४९ |
| उपासक | १५० |
| अखेरचें मागणें | १५१ |
| दुबळेपणा | १५२ |
| दया नको | १५४ |
| पुष्पसमर्पण | १५५ |

# —निवेदनम्

अरसिकांना कवित्व निवेदन करणें मरणप्राय असतें खरें; पण रसिकां-बरोबर काव्यचर्चा करणें व कवीच्या मनोभूमिकेंत शिरून तादात्म्य पावणें, निरनिराळ्या दृष्टिकोनांनीं पाहून क्षणोक्षणीं प्रकट होणारी नवता अनुभवणें, काव्यसृष्टींतील पात्रें, त्यांची परिस्थिति, मनोरचना यांशीं समरस होऊन क्षणभरच कां होईना त्या सुखदुःखांचा आस्वाद घेणें आणि परस्परांचा अनुभव परस्परांना साङ्गून शतगुणित करणें यापेक्षां खऱ्या काव्यप्रेमी रसिकांना दुसरी कोणती गोष्ट अधिक प्रिय असणार !

ग्रन्थांतील विषयाचें गुणदोषविवेचन करणें आणि भाषापद्धति व तत्त्व-प्रतिपादन यांचा साधक-बाधक विचार करून ग्रन्थाचें व पर्यायानें ग्रन्थ-काराचें साहित्यांत स्थान ठरविणें हें टीकाकाराचें कार्य असतें. टीका हेंच ज्याचें लेखनसर्वस्व असा टीकाकार आपली विस्तृत निबन्धात्मक किंवा स्फुट परीक्षणात्मक टीका शक्य तितकी सर्वाङ्गसुन्दर व स्वतन्त्र करण्या-चा प्रयत्न करतो. त्याचप्रमाणें प्रस्तावना, हितगुज, हृद्गत, समर्थन इत्यादि पर्याय-शब्दांनीं व्यक्त केले जाणारे छोटे—मोठे प्रबन्ध ग्रन्थाच्या प्रवेश-द्वाराप्रमाणें असतात. बिचारा ग्रन्थकारच स्वतः प्रस्तावना लिहूं लागला तर तो भाम्बावूनच जातो. त्याला आपल्या ग्रन्थांतील प्रत्येक ओळ व शब्द वसुन्धरेच्या मोलाचे वाटत असतात; पण आत्मस्तुति करण्यास तो कचरतो, असतील नसतील ते आरोप स्वतःच पदरीं घेतो आणि शेवटीं कांहीं मित्रांचे व मुद्रक-प्रकाशकांचे आभार मानून जिवानिशीं पळ काढतो.

दुसऱ्याकडून प्रस्तावना लिहून घ्यावयाचा साम्प्रतचा प्रघात अनुसरला तर तशा प्रस्तावनालेखकावर मोठेंच सङ्कट ओढवतें. त्याच्या प्रामाणिक मताला ग्रन्थकाराच्या भिडेची मुरड पडते किंवा तो निर्भीड असल्यास तो आपल्या प्रबन्धांत प्रस्तावना व टीका यांचा बेमालूम रान्धा करून वाचकां-

पुढें ठेवतो. मङ्गलाचरण करणारा सूत्रधार नाटकाचे शेवटीं कण्वाचें किंवा कारणपरत्वें दुर्वासाचेंही रूप धारण करतो; त्याप्रमाणें प्रस्तावना लिहिण्यास समर्थ असणाऱ्या वाग्भटास टीकाकार होणें सहज साध्य असतें.

प्रभात झाल्यावर अनेक फुलें उमलतात व पक्ष्यांचें कूजन सुरू होतें, तर निशाविकासी फुलें निस्तेज होऊन मिटतात किंवा गळून पडतात व रात्रिंचर पक्षी विश्रान्ति घेण्यास परततात. तद्वत् काव्यप्रकाशन झाल्यावर चाङ्गल्या-वाईट टीका—परोक्षापरोक्ष, तोण्डी किंवा लेखी—कवीच्या वाट्यास येतातच. मग अगोदर प्रस्तावनारूपी टीका-लेख लिहून घेण्याची यातायात न करणें हाही पोक्तपणाचा विचार ठरतो.

विद्वान् लेखकांनीं लिहिलेले, कोणत्याही काव्यग्रन्थास जोडलेले प्रस्तावनालेख चाळावे; त्यांत "अथातो ब्रह्मजिज्ञासा" या सूत्राप्रमाणें काव्यब्रह्माची प्रथम व्याख्या व स्वरूप, प्रकार, दर्जा, प्रस्तुत कवीचें कौशल्य वगैरेंचें साङ्गोपाङ्ग विवेचन आढळतें. तशांत मुख्य ग्रन्थाइतकीच प्रस्तावना विस्तृत असल्यास 'एक पन्थ दो काज' अशी वाचकांची सोय होऊन काव्याचीं गद्य-पद्यस्वरूपें पाहण्यास मिळतात. भास्कराचार्यांच्या लीलावतीप्रमाणें रूक्ष शास्त्राचे सोदाहरण सिद्धान्त मनोरञ्जक रीतीनें माण्डलेले सांपडतात. याप्रमाणें वाचकांच्या अपेक्षेची पूर्तता, साहित्याचार्यांचें साहचर्य व ग्रन्थाचा अनायासें विस्तार असा तिहेरी लाभ कवीस सम्पादतां येतो.

श्री० कोल्हटकर, केळकर, भिडे, खाण्डेकर, प्रो० लागू, ताटके, चाफेकर, पटवर्धन इत्यादिकांनीं प्रस्तावना, निबन्ध, टीका व तत्सदृश लेखांतून काव्याची साङ्गोपाङ्ग चिकित्सा केली आहे. काव्याची व्याख्या अगोदर वाचल्याशिवाय काव्याची ओळ वाचावयाची नाहीं असाच वाचकांचा अट्टाहास असेल तर वरील लेखकांचे ते ते लेख वाचून त्यांची आकण्ठ तृप्ति होईल. काव्य हें बोलूनचालून ब्रह्मच! तेव्हां 'नेति नेति' म्हणत वेदाच्या पङ्क्तीस बसण्याचा मान मिळण्यापलीकडे त्यांच्या पदरांत

कांहीं पडणें नाहीं. वास्तविक ग्रन्थांतच अन्तर्भूत केलेल्या प्राथमिक काव्यचर्चेचा वाचकांस तादृश फायदा नसतो. ही चर्चा पचनीं पडून, लागलीच अभिरुचि वाढून काव्य समजण्यास मदत झाल्याचें सहसा आढळत नाहीं. या कामीं वाचकांची पूर्वसंस्कृत मनोरचना, अनुभव व अभिरुचि हींच उपयोगी पडतात. कुशल लेखकानें लिहिलेल्या गोष्टीवजा बेमालुम जाहिरातीइतकाच प्रस्तावनेचा उपयोग असतो, तर रस्त्याच्या कडेला बसलेल्या साधूंभोंवतीं जमलेल्या आस्तिक-नास्तिकांच्या घोळक्याइतका टीकाकारांचा व्यवहारांत उपयोग होतो. मौल्यवान् दागिना विकत घेतांना जवाहिऱ्याची पारख उपयोगी पडते, तर इष्टमित्रांचें कुतूहल किंवा मत्सरी हस्तक्षेप व सौद्यांतील बूड किंवा किफायतशीरपणा आनन्दांत भर किंवा विरजण घालतात; पण खरा आनन्द स्वतः अनुभवलेल्या सुखांतच असतो. वाचकांना प्रस्तावनाटीकांकडे दुर्लक्ष करूनही काव्याचा रसास्वाद चाखतां येतो. किम्बहुना असा आनन्द घेण्याची ज्यांची पात्रता त्यांनाच 'रसिक' हें नांव यथार्थतेनें लागू पडतें. कवीचें काव्य स्वतःसाठीं आणि अशा रसिकांसाठींच उत्पन्न झालेलें असतें.

खुद्द कवीची स्वतःच्या काव्यासम्बन्धींची भावना दरबारी थाटाची आहे. रसिक वाचकांना सम्राट् कल्पून काव्यधनाची खण्डणी त्यानें सादर केली आहे. 'खण्डणीसोबतचा खलिता', मध्यस्थांच्या हातचलाखीनें सम्राटापर्यन्त पोंचणार नाहीं या भीतीनें, खण्डणींतच समाविष्ट केलेला आहे. पूर्वापार परम्परेप्रमाणें कवी हा बोलून चालून निर्धन. या परवश राष्ट्रांतील इतर सुदैवी कवींप्रमाणें स्वतन्त्र जीववृत्तीचें भाग्य त्याचे वाट्यास नाहीं. अन्तःकरणांतले उमाळे, जीवाच्या ध्येयात्मक भराऱ्या व आकाङ्क्षा, डोक्यांतलें काहूर आंतल्याआंत दडपून टाकावें लागल्यामुळें जीवितावर पसरलेलें निराशेचें गाढ आवरण, मन दिवसेंदिवस उद्विग्न करणारी परिस्थिति आणि त्यांतच बुद्ध्या किंवा अजाणतेपणानें टीकाकारांनीं किंवा मत्सरी शत्रूंनीं केलेले विपर्यास व हेटाळणा यांचे पदोपदीं बसलेले फटकारे, अशा स्थितींत

कवीस काव्य सुचावें व त्यानें तें प्रसिद्ध करण्याचें धाडस करावें हेंच आश्चर्य. परन्तु काव्यरचनेची स्वर्गीय देणगी ईश्वरानें दिली नसती तर दुसरा पराक्रम करण्याचें सामर्थ्य नाहीं. रसिकांना मान्य होईल अशी अन्य वस्तु सङ्ग्रहीं नाहीं. मिळालेल्या गुणाचा परिपोष करून रसिकांना क्षणभर आनन्द देणें हेंच त्याचें जीवित-कार्य. त्यांत लाभलेलें यश हेंच त्याचें धन. "न भीतो मरणादस्मि केवलम् दूषितम् यशः" हीच यशवन्ताची एकटी भीति. अशा स्थितींत आपलें जीवितसर्वस्व रसिकांच्या किंवा ईश्वराच्या सेवेस सादर करतांना झालेली मनाची स्थिति 'पाणपोई' व 'पुष्पसमर्पण' या कवनांत कवीनें हळव्या शब्दांत माण्डली आहे.

हृदयीं भरला सुधार्णव
निपजे बोल मदीय त्यांतुनी
विपरीत परन्तु भाव ही
जनता त्यांतुनि घेइ शोधुनी

भलता जरि अर्थ दे गिरा
बरवी फारच मौनधारणा (पान ४४)

पण आंतून उसळणारी स्फूर्ति या भीतीनें कशी स्तब्ध बसणार ? परमेश्वराचा आश्रय घेण्यास दुसरीं कारणें आहेतच; पण

तीव्र विषारी शर निन्देचे
घाव गनीमी रिपुशस्त्रांचे
येथवरी नच पोचायाचे (पान १४५)

हाही विचार मनांत डोकावल्याशिवाय राहात नाहीं. शीलाच्या बळकट पायावर उभा असणारा जीव अर्थात् अशा खलांना किंवा प्रच्छन्न शत्रूंना भीत नाहीं. 'खलांनो' 'करूं नको फुम्फाट' 'ग्राम-सिंहास—' या कवितां-प्रमाणें तो स्वतःच धीर धरून, पवित्र्यांत उभा राहून बचावाचा पहिला वार

तर करतोच; पण तशाच स्थितींत असलेल्या लाखों वाचकांना प्रोत्साहन देतो. तद्वतच परिस्थितीनें जखडलेल्या खम्बीर मनाचे, स्वातन्त्र्यगीतांत आढळणारे उद्गार उन्नतिपथदर्शीच वाटतात.

कवि जसा परिस्थितीची पर्वा न करतां आपले भलेबुरे विचार व कल्पना काव्यांत माण्डतो त्याचप्रमाणें प्रसिद्धीकरणानन्तर त्यानें परिणामा-विषयींही बेफिकीर राहिलें पाहिजे. सासरीं जाणारी बाला माहेरघरास मृतप्राय असते. प्रसिद्ध झालेल्या कवितकन्येलाही जनक अन्तरतो. रसिकांनीं कोडकौतुक केलें तर ठीकच; उपेक्षा केली किंवा वाभाडे काढले तर मृतात्म्याप्रमाणें हूं–का–चूं करणें शक्य नसतें. आणि म्हणूनच 'पाण-पोई' व 'पाखरास' या कवनांत, रसिकसन्तोषांत कवित्वसाफल्य व आत्म-समर्पणाची तयारी कवीनें दाखविलेली दिसते.

वस्तुस्थिति पाहिली तर यशवन्तांना लाभलेलें भाग्य विद्यमान कवींत फारच थोडक्यांच्या वांट्यास आलें आहे. रविकिरणमण्डळावर प्रत्यहीं होणारे वार यांना चुकून, निसटतेच व संसर्गदोषानेंच लागले आहेत. बहुतेक प्रसिद्धाप्रसिद्ध हयात किंवा अस्तङ्गत नियतकालिकांतून यांची कविता आग्रहानें मागवून प्रसिद्ध झालेली आहे. सन १८९९ पासून १९१६त कवि साधुदास यांच्याशीं गुरुशिष्याचें नातें उत्पन्न होण्यापूर्वींचीं १७ वर्षे सोडलीं तर पुढील १३ वर्षांच्या अवधींत लिहिलेल्या कवितांचा दर्जा व रसिकांनीं केलेलें कौतुक पाहून कोणालाही आश्चर्यच वाटेल. सन१९२०सालीं महाराष्ट्र-शारदामन्दिराशीं सम्बन्ध आल्यापासून प्रसिद्ध केलेलीं 'इन्दुकला' व 'वीणा-झङ्कार' हीं पुस्तकें व सन १९२३ सालीं रविकिरणाचे एक प्रमुख घटक झाल्यापासून मण्डळाच्या पुस्तकांतून व इतस्ततः नियतकालिकांतून विखुर-लेल्या कविता पाहिल्या असतां रचनेस लागलेलें निराळें वळण सहज प्रत्ययास येतें. सन१९२१ सालीं सुमन्त टेकाडेप्रभृति कवींबरोबर बडोदें येथील साहित्यसम्मेलनांत यशवन्त काव्यगानानें रसिकांपुढें प्रामुख्यानें झळकले. काव्यगानानें कविता बहुजन–समाजांत प्रिय तर झालीच; पण

यशवन्ताची कविता आबालवृद्धांस माहीत झाली. शाळा-कॉलेजांतील युवकांना तर यांच्या कवितांनीं वेडच लावलें. ही लोकप्रियता रेन्दाळकर, गोविन्दाग्रज, माधवजूलियन, गिरीश यांशिवाय इतरांच्या वांट्यास फारशी आली नाहीं.

यामुळेंच यशोधनांतील कवितांची निवड करणें त्यांना बरेंच सोपें गेलें असावें. निरनिराळ्या प्रसङ्गीं श्रोत्यांस अत्यन्त आवडलेलीं गीतें व परीक्षणांतून रसिकांनीं वाखाणलेली कविता यांत ग्रथित केली असून कांहीं इतर अप्रसिद्ध कविता समाविष्ट केलेल्या आहेत. आणि कदाचित् याच अप्रसिद्ध कवितांसम्बन्धीं मतभेद होण्याचा सम्भव आहे.

कवीच्याच शब्दांत साङ्गावयाचें म्हणजे "अनुभवाच्या रवीनें घुसळलेल्या भावनेवर वेळोवेळीं जमून आलेलें नवनीत म्हणजेच हा कवितासङ्ग्रह होय." हे अनुभव क्वचित् स्वतःच्या आयुष्यांतील, बहुतेक इतरांच्या भावनांशीं तादात्म्य पावून आलेले, प्रसङ्गीं केवळ काल्पनिक ध्येयप्रान्तांत वावरणारे असतात. आयुष्यांत बऱ्या-वाईट प्रसङ्गांनीं असे हेलकावे ज्यांच्या हृदयाला मिळतात त्यांना कवितांचें स्वारस्य अनायासें प्रत्ययास येतें. तींतील भावनांचा क्षणकाल किंवा यत्किञ्चितही अनुभव नसला तर कवितेशीं सर्वांशानीं समरस होणें कठीण. "ज्याला दुःखाच्या आंवळ्याबरोबर भाकरीचा घास गिळण्याची पाळी आली नाहीं आणि 'उद्यां'वर आशाळभूत नजर लावून अश्रूंनीं उशी भिजवीत रात्रींच्या रात्री काढण्याचा प्रसङ्ग गुदरला नाहीं त्याला हे जगत्सूत्रचालका, तुझी ओळख अजून पटली नाहीं" हे परमेश्वराच्या अस्तित्वाबाबत गटे कवीनें काढलेले उद्गार कवितेचा रसास्वाद घेण्याच्या बाबतींतही स्थूलपणें लागू पडतात. आज एकादी कविता आकलन करतां आली नाहीं तरी कालान्तरानें तशा परिस्थितींतून जाण्याचा प्रसङ्ग आला तर ती कविता आपोआपच पटते. 'प्रेमसंन्यास'मधील जयन्त 'आनन्दी आनन्द गडे' हा चरण घोळूं लागतो. तरुणांना गोविन्दाग्रजांची व माधवजूलियनची आणि

घ्यानीं येईल. सर्वच सुनीतांतून व भावगीतांतून कवि स्वतःच्या भावना व्यक्त करतो ही भ्रामक समजूत एका आङ्ग्ल सुनीतकारानें एका सुनीतांतच कुशलतेनें दूर केली आहे. तो म्हणतोः " मीं सुनीतांतून माझें रहस्य व्यक्त केलें आहे असें तुम्हांस वाटतें तरी कसें! भूकम्पानें चारी भिन्ती पडून घरांतील सर्व रहस्यें दिसावीं अशा उद्देशानें तुम्ही डोळे ताणून पाहतां खरे; पण मींही माझीं रहस्यें अशीं बेमालूम स्वतःजवळ ठेविलीं आहेत कीं, त्यांचा ह्या सुनीतांतून तुम्हांला लवलेशही सांपडावयाचा नाहीं. ह्या सगळ्या दुसऱ्या व्यक्तींच्याच भावना आहेत. साम्भाळा, नाहीं तर तुमचीं-च रहस्यें तुम्हांला यांत सांपडतील बरें ! "

विपर्यासाला जागा राहूं नये म्हणून 'चमेलीचे झेले' ते 'प्रेमाची दौलत' हीं कथात्मक व भावात्मक कवनें एकत्र गुम्फलीं आहेत. द्वादश सुनीतांची गुम्फलेली 'एक कहाणी' हें स्वतःच्याच आयुष्यांतलें चित्र आहे असें म्हणण्याचा प्रसङ्ग हल्लींच्या सामाजिक सङ्क्रमण युगांत कित्येक तरुणांवर खात्रीनें आल्याशिवाय राहणार नाहीं. व्यवहारांत ध्येयाचीं शकलें झाल्याचें व शेख महमदी मनोरथ भग्न झाल्याचें आजमितीस एक तरी जिव्हाळ्याचें उदाहरण प्रत्येक वाचकांस आढळल्याशिवाय राहणार नाहीं. अशा स्थितींत सामाजिक बन्धनांत असहाय झालेल्या जीवाला कवि चितेंतील ध्येयात्मक मीलनाखेरीज कोणता मार्ग सुचविचार !

यापुढें मात्र सङ्ग्रहाच्या मनोरम भागास सुरवात होते. कवि, गायक व वादनपटु प्रसन्न झाल्यावर कविता प्रसन्न अन्तःकरणानें गाऊं लागते. निर्भय, स्वच्छन्द विहार, नाजुक भावना व सुखाचे क्षण यांच्या अनुभवांत मन गत-भावी चिन्ता विसरून जातें. आयुष्यांतील अशा सुखमय क्षणाप्रमाणे या सङ्ग्रहांतील रम्य व चिरकाल स्मृतीवर कोरून राहणाऱ्या, कविता ह्याच. ध्येय-मार्गी जीव अखेरीस वैतागतो. सुखाचा भर ओसरून निराशातिमिर कवटाळूं लागतो. To be or not to be हें कोडें पडून जीव जगन्नियन्त्यावर सर्व हवाला टाकून निर्भय होऊं पाहतो. या सर्व अवस्थां-

तून एक क्षणसुद्धां गेला नाहीं असा जीव विरळा. तेव्हां 'कालो ह्ययं निरवधिः' अशी प्रतीक्षा न करतां एकादी ओळ एकाद्या जीवास आपलीशी वाटली तरी कवितेच्चें साफल्य झालें आणि कवीचें वाञ्छित व यश त्यास मिळालें असें म्हटलें पाहिजे.

मध्यस्थांची भीड न घालतां रसिकांना मित्रकन्या एकदम दाखविणें एवढेंच निवेदनाचें कार्य होतें. भाषाप्रभु, पण्डित, टीकाकार यांनीं हिचें कौतुक केलें तर दुधांत साखरच पडली; मग इतरेजनांनीं नांवें ठेविलीं तरी 'पदरीं पडलें पवित्र झालें', 'रसिकांना रुचली ना; मग झालें तर' असें समाधान मानून घेतां येईल.

मृत्तिकेच्या कुम्भांनीं हें काव्यजल अधिक शीतल व सेव्य झालें असेल. आणि परमेश्वरास समर्पण केलेल्या पुष्पाच्या सङ्गानें निवेदनाच्या या मृत्तिकेस सुवासही लागला असेल. पण उलट या निवेदनाच्या मृत्तिकेचा मलिनपणा प्रस्तुत पुष्पसङ्ग्रहास लागला नसेल ना अशी शङ्का शेवटीं आल्याखेरीज राहात नाहीं.

महाबळेश्वर,
१४ जानेवारी १९२९

**श्रीधर बाळकृष्ण रानडे**

नको करूं सङ्कोच
पाखरा ! नको करूं सङ्कोच ॥ ध्रु ॥

पिकलें फळ हें तुझियासाठीं
खुपस आपुली चोंच. १

मज संवेदन असे नसे कीं,
हवा तुला कां पोंच ? २

पहा रसिक हे खुडती कुसुमा
जों न उमलतें तोंच ! ३

क्षतावाचुनी जरि न विमोचन
तरि बरवी तव चोंच ? ४

येरवडा, १।१२।२८

# पाणपोई

वृत्त–वारुणी


येइ भाई येथ पाही घातली ही पाणपोई
धर्म-जाती कोणती ती भेद ऐसा येथ नाहीं
संसृतीचा हा उन्हाळा, तल्खली होई जिवाची
स्वेदबिन्दू अश्रुधारा याविना पाणीच नाहीं

वायुवीची भोंवतीं आन्दोलुनी त्या वञ्चिताती
झोम्बती अङ्गीं झळा अन् मूर्च्छना ये ठायिं ठायीं
साउली नाहीं कुठेंही, तापतो मार्तण्ड डोई
श्रान्त पान्था ! बान्धली ही तूझियासाठीं सराई.

आद्य जे कोणी कवी तत्स्फूर्तिच्या ज्या सिन्धु गङ्गा
आणिल्या वाहून खान्दीं कावडी त्यांतील कांहीं
पान्थसेवासाधनीं हें व्हावयातें गार पाणी
मृत्तिकेचे मात्र माझे कुम्भ, ही माझी नवाई

ओन्जळी, दों ओन्जळी, आकण्ठ किंवा घे पिऊनी
हो जरा ताजा तवाना, येउं दे सामर्थ्य पायीं
पावतां तृप्ती मना, सञ्चारतां अङ्गीं उमेदी
जो दुवा देशील पान्था तेवढी माझी कमाई

येरवडा, १२।५।२७



# श्रीशारदावन्दन

मन्दारमाला

शोभे तरूचें शिरीं छत्र तूझ्या
  शिलेचें तसें भव्य सिंहासन,
चाले सरिद्गान, त्या हंसलीला,
  तुझी हेमकान्ती वना भूषण,
हातीं करी मञ्जु झङ्कार वीणा
  घुमे नाद कानीं मनीं अन्तरीं;
हे बोल माझे न, आई ! तयाचे
  ध्वनी येति बाहेर कांहीं तरी.


माते ! तुझें रूप कांहीं न जाणें
  जया वानितां सत्कवी भागले,
भासे परी नित्य अस्तित्व त्याचें
  मनोमन्दिरीं कांहिंसें सांचलें;
अत्यन्त आनन्द त्याचाच चित्तीं
  मुखीं बोल तल्लीन वृत्तीमधें
ते बालकाचे बरे मानुनी घे,
  कृपा-सिञ्चनातें करी शारदे !

मानापमानादिकांच्या पराण्या
   मना आंतुनी सारख्या टोंचिती,
चोंहींकडोनी जरी पारतन्त्र्यीं
   असे लागली आग देहाप्रती,
होतां महन्मङ्गले ! स्वस्मृती तों
   अकस्मात त्यांची पडे विस्मृती
श्रीशारदे ! सच्चिदानन्ददात्री !
   तुझ्या गायनीं रङ्गवी मन्मती.

संसारसौख्यीं समाधान नाहीं
   तुझ्या गायनीं जें मला लाभतें.
आशांसवें सम्पदेचे सुखाचे
   तुझ्या सेवनीं तोडिले पाश ते.

आई ! कृपेची मला न्यूनता ती
   नको दाखवूं हेंच मी याचितों;
माते ! तुला वन्दितों भक्तिभावें
   पुन्हा वन्दितों, वन्दितों, वन्दितों !

पुणें, १७/१२/२१



# निष्फळ प्रतीक्षा

वृत्त–वसन्त

प्रतीक्षा मी किती आतां करूं? कण्टाळला जीव!
सख्या, ये राघवा, स्नेहामृतातें शीघ्र पाजीव!
घडी मागें घडी जाते, युगें हीं लोटतीं वाटे,
उडी मन्मानसाची या न आतां थोपवे मातें.

किती मी आवरूं दृष्टी? फिरूनी धावते द्वारीं;
विवेका शक्ति ना आणावयातें तीस माघारी
जिरावी एक तों तेथें दुजी हृत्सागरीं लाट
कळेना जातसे कीं हा फुटोनी छातिचा कोट

किती मी पाखरावाणी सख्या रे पाखडूं प्राण?
न सोसे या विलम्बाचा मनाला वाढता ताण!
क्षणांची वाढते सङ्ख्या, दुणावे तीव्र उत्कण्ठा
गळयाशीं माप हें आलें, झणीं ये दे मिठी कण्ठा.

तमिस्रेनें निराशेच्या पहा कोन्दाटतो ऊर
तुझ्या भेटीविना जावा निराशेचा कसा नूर?

कऱ्हाड, २७।३।२२

# आळवणी

जाति—तूणक व चन्चला मिश्र

अदय काय होइ माय आपुल्या मुलावरी ?
आळवून आळवून
कण्ठ चालला सुकून
पाहणार अन्त काय—आणि तोहि कुठवरी ?

तव मुखास चन्द्रकान्ति
लोचनांत चन्द्रज्योति
देहिं चान्दणें; मलाच काजळी निशा परि !

तूं सतारवादनांत
दङ्ग होसि काननांत
गीतरङ्गपूर तेथ; कां न तान मज परि ?

कुरण दाट, धेनु त्यांत
घे न घास परि मुखांत
बावरून हम्बरेच वासरू जरी घरीं

निज शिलासनासमान
का कठोर बेगुमान
भक्तकामनन्दिनीच केविं व्हावि अन्तरीं ?

चालले त्यजून लोक
मी अनाथ होइ तोक
या अजाण कोकरास लोटिशी कशी दुरी ?

धरिसि रोप मौन तूंच
तरुलता लहान उन्च
दिलखुलास बोलती न माझियासवें तरी.

कोकिळा तरूवरील
मोकळा गळा करील
आस खुण्टली सरोष गानदेवता जरी.

तव कृपासुधातुषार
नन्दनवन उभविणार
खडक–माळ हें कपाळ पिकविणार तूं खरी
बोलुं कांहिं तूं नकोस
देउं वैभवें नकोस
फेक एक नजर मात्र मग पुरेन खापरी.

आळवून आळवून
जीव जाइ व्याकळून
हें कळून बघसि अन्त ?—आणि तोहि कुठवरी ?

येरवडा, १९।२।२४

---

# गिरि-विहार

जाति–बालानन्द

ऊठ शारदे घे वीणा
जाणार न मी तुझ्याविना
चल तूं माझ्या साङ्गाती
स्तोत्रें गिरिदरि तव गाती
विहार करुं ये तिथें खुला
गळा मोकळा करुं अपुला
घेऊं तन्नावर ताना
स्वच्छन्दानें फिरतांना

बागडण्याचे
बालपणाचे
दिवस मजेचे

आणुं परतुनी आज पुन्हा
ऊठ शारदे घे वीणा.

अरुन्द मन्दिर हें सोड
वनाकडे चल घे दौड
बन्दीखाना तुला मला
रुचेल का कोणा कविला.
येथिल शतपावली पुरे
अफाट फिरणें वनीं बरें
उच्छृंखल मम मन झालें
उदयाचलिं रविकर आले

परवशतेचा
दिन न आजचा;
स्वच्छन्दाचा—
म्हणुनि होइ आनन्द मना ऊठ शारदे घे वीणा.
एक सुराचीं नित्याचीं क्षुद्रपणाचीं स्वार्थांचीं
गाणीं केवळ भवतालीं घडामोड ही जगांतली
श्रवुनि कान माझे किटले मन अगदी विटुनी गेलें
जरी फेकली दृष्टि कुठें मना शिसारी बहु येते.
सौन्दर्याची
सात्त्विकतेची
नाविन्याची
सृष्टि पहाया जाउं वना ऊठ शारदे घे वीणा.
रोष असा कां मजवरती आळवणी तव करूं किती
दुखवितसे तव मौन मला झरा स्फूर्तिचा अडखळला.
तुझ्यावांचुनी उल्हास विकास कोठुन हृदयास
पहा कल्पना लुळी पडे आणि थाम्बतें गान गडे.
नसतां तूं जरि
केविं मी तरी
गाउं वनान्तरिं
सदये सखये नत चरणा ऊठ शारदे घे वीणा
हसली उठली मम माता जिकडे तिकडे मजा अतां
वीणेचा हा झङ्कार गुञ्जावितो सृष्टी नार
गगनांतिल ह्या ढगांसवें मनांतील नैराश्य जवें.
विरुनी, जगता किरणांचा मना मुलामा मोदाचा

जडता नुरली
वृत्ती फुलली
स्फूर्ति स्फुरली

उकळी फुटली लहरींना ऊठ शारदे घे वीणा.
सतार सृष्टीची सजली नाद-तरङ्गावलि उठली
ती उघड्या माळावरती दहा दिशांची जया मिति
त्यांत राहिली पसरूनी हिरव्यां रूपें अवतरूनी
लोक बोलती हिरवळ ही नटली थटली वनराई.

वर्षाऋतुचें
हें पाचूचें
बहु मोलाचें

लेणें चढवी वनाङ्गना ऊठ शारदे घे वीणा.
सतार सृष्टीची सजली नादतरङ्गावलि उठली
ऐकाया उघडे माळ होउन आतुर बहुकाळ
जीवाचें देती भान अणुअणुचे करुनी कान
अणुअणुला येउन प्राण प्राणाला फुटलें पान

तीं हीं पानें
जन अभिधानें
हिरवळ जाणे

डोलविते हिरवळ माना ऊठ शारदे घे वीणा.
वायूच्या झुळुकेसरशीं घेतीं कुरणें उशी कशी
एक एक एकापुढती अनन्त लाटा या उठती
जणु वरुनी चाले वात तया परन्तु न दुखवीत
चुम्बितसे कीं क्षणोक्षणीं मन्दस्मितलहरी वदनीं

म्हणुन उमटती
प्रेमा लुटती
लाजुन लवविति
तृणललना अपुल्या माना ऊठ शारदे घे वीणा.

या हिरव्या गवताखालीं हिरवी नागिण लपलेली
असेल राणी रानाची तृषा जिला मम गानाची
घाल नागिणी तूं अपुला विळखा माझ्या पायाला
खुशाल येथें निजेन मी रविप्रकाशीं घोर तमीं
कर्तव्याच्या
निष्ठुरतेच्या
अधिकाऱ्यांच्या
नको ऐकणें हाकांना ऊठ शारदे घे वीणा.

दुभङ्गून फेसाळून तसेंच कांहीं पिन्जून
सभोवताली झोत किती दरींत खाली आदळती
रजतरसाचा धवलपणा गमे त्यांचियापुढें उणा
माण्डलीक सम्राटाला जणू खण्डणी द्यायाला
हीरक मोती
माप घालिती
नसेच गणती
दृश्य हर्षवी क्षणक्षणा ऊठ शारदे घे वीणा.

क्षणीं पसरतें दाट धुकें हातावरचें दृश्य फिकें
जणु अपुल्या अङ्गावरली अस्मानानें शाल दिली
पाङ्घरुनी तसला बुरखा गिरिबाला मारी मुरका
मग सहजीं मन बावरुनी पडेल पाउल कीं चुकुनी

असली भीती
उठते चित्तीं
तोंच दिगन्तीं
धुकें विरतसे क्षणक्षणा      ऊठ शारदे घे वीणा.

पुन्हा पसरतें दाट धुकें      हातावरचें द्रव्य फिकें
स्वर्गाची इहलोकाला      समतासौख्यें द्यायाला
आलें उतरुनि आभाळ      गमे बघुन हा कल्लोळ
अशा धुक्याच्या नभांत या      जीव वान्छितो विहराया
परी जडाप्रति
सुखानुभूती
मिळावया ती
ऐकव तव झङ्कारांना      ऊठ शारदे घे वीणा.

पुणें, सप्टेंबर १९२२

# इन्दुकला

वृत्त–शार्दूलविक्रीडित

[ मित्रकन्या इन्दू हिला उद्देशून ह्या कविता असल्या तरी सामान्यतः लहान मुलांच्या लीला, हसणें-रडणें, खेळणें-बागडणें, मुग्ध असमंजस बोल, निष्पाप सरळ मनोवृत्ति, इत्यादि पाहून वत्सल हृदयांत ज्या भावना, कल्पना, आनन्द, भीति वगैरे मनोविकार उत्पन्न होतात, त्यांची या सोळा सरांत गुम्फण केली आहे. यांतील कांहींत प्रेममूर्ति मातेचे उद्गार आहेत, तर कांहींत कवीचे उद्गार आहेत.]

१

देवांनीं कसल्या तरी चुकिमुळें गन्धर्व जो शापिला
कांहीं काळ अम्हांप्रती भुलवुनी तो चालता जाहला.
माझा प्राणसखाच तो जरि अतां नान्दे न पृथ्वीवरी
तच्चैतन्य दिसे तनूंत तुझिया सामावलेलें परि
पाहोनी तुझिया मुखीं स्मित गमे माझा सखा हासला
ऐकोनी तव बोलणें मज गमे माझा सखा बोलला
तूं जातां पुढुनी पदोपदिं गमे माझा सखा चालतो
मित्राची प्रतिमाच देहिं तव मी आरोपुनी पाहतों.
देहीं दोन अम्ही, परी निगडलीं एकत्र होतीं मनें
त्यातें आठवुनी मनांत रडणें, दुःखी जिणें कण्ठणें.
दैवातें नच निन्दितां परि बघूं मूर्ती तुझी गोजिरी
मानूं 'मित्र दिगान्ति, तद्द्युति परी सन्चारते भूवरी'.
माझ्या प्राणसख्यामुळें प्रिय मला प्राणाहुनी तूं, पण–
तूझ्या बालपणामुळेंहि तुझिया ठायीं जडे मन्मन.

२

जाति—चन्द्रकला

ऊठ ऊठ बाळे कोमले छकुले लाडिवाळे
करि अपुले चाळे, पायिंचे वाजुं देत वाळे
गजबजलें अपुलें फुलांनीं उपवन भृङ्गांनीं
सदन जाउं दे हें भरोनी मञ्जुळ तव गानीं
दवबिन्दू पडती चमकती हरित तृणावरती
पुष्पदलांवरती जणू ते शिम्पल्यांत मोती
अङ्गणांत माझ्या घागऱ्या चरणींच्या तुझिया
ओघळुनी साऱ्या नर्तनीं सहजीं पसराव्या
सडा फुलांचा तो, तसें हें अङ्गण शोभेल
चान्दण्यांत असल्या यावया चन्द्रहि लोभेल
लपवी मुख बघुनी भानुला तया चुकाराचा
तारा परि घ्यावा पाहुनी केवळ रात्रीचा
बालकिरण रविचे घ्यावया मुके जिचे सजले
तीच इन्दु माझी लाडकी ! ऊठ ऊठ छकुले !

३

आल्या-गेल्यांचा सारखा भरतो बाजार
परि माझ्या जीवा तुजविना दुजा न आधार
पिञ्जऱ्यांत गाते सारिका नाचतसे मोर
मन्मति रति नच घे जरी नच तूं तिथें समोर
मनास रमवाया करावा उपवनिं सञ्चार
परन्तु केवळ तीं फुलें मज तुझ्यामुळें प्यार

फूलपाखरांची चालली सन्तत धावपळ
ज्यांत त्यांत दिसते परन्तू ही अचपळ बाळ
वसुन्धरा सारी स्वरूपीं तुझ्याच जणु नटली
चन्द्र, सूर्य, तारे – तुजविना दीप्ति तयां कुठली ?
सुखांत कसल्याही जरी नच तव भागीदारी
उदासीनतेची साउली त्यावरि येइ तरी.
जाउं नको बाळे, माझिया तूं डोळ्यापुढुनी
एकाकी मी ही पाहतें तुझ्यांत लोक तिन्ही

४

हिऱ्यामोतियांचे गळ्यामधिं घोस लोम्बतात
तिलक कुङ्कुमाचा कपाळीं, गालावर तीट
गळां घालुनीया रेशमी सुमनांच्या माळा
सुमनासम मृदुला गोरटी ये राजस बाळा.
विकसोन्मुख कलिकांमधिल कीं उभाच मकरन्द
कीं बोलामधला प्रीतिच्या नाजुक आनन्द
चराचरामधलें प्रीतिचें कीं गायन मन्द.
कीं सम्मेलन हें तिघांचें – प्रेम, गीत, गन्ध.
विविध लोलकांची बाहुली नटवुनि रङ्गविली
उमलवीत जगता उषा कीं उदयाचलिं आली
देउं किती उपमा, पुढें जर बालरूप विभुचें ?
'नेति नेति' येती ध्वनी हे नकळत मम वाचे.
उणीव एकच ही अतां तूं बोलूं लाग गडे
समाधि मग जडतां शिरीं मम कोसळुं देत कडे.

५

झाकुनि घेउनिया आपुला नवीन शृङ्गार
डोकावुनि बघते बालिका कुणि वारंवार
कोण कोण तिकडे? बघूं तें कोण तरी लपलें?
दिसले रे दिसले अम्हांला रामदास दिसले!
डोलत तोंच पुढें ठाकली मूर्त डौलदार
बोलत शान्तपणें "जयजय समर्थ रघुवीर!"
करिं कुबडी, स्मरणी, मेखळा भगवी अङ्गांत
'सदा सर्वदा०' हा मनाचा श्लोक चुकत गात.
बालपणीं कां हा बाणला रामदासि बाणा?
एव्हांपासुन का कुलाच्या धरिता अभिमाना?
महाराष्ट्र मृत हा चेतना तया नवी द्याया
खरंच गडे बाणा पाहिजे आज असा घ्याया!
'रामदास' म्हणुं का 'घेउनी आले अवतार'?
स्वतन्त्रता-देवी जाहली अथवा साकार?

६

पीताम्बर कासे, ललाटीं नाम कस्तुरीचा
कलींत अवतरला मुरारी गमे द्वापरींचा
बालमुकुन्दा हा कशाला घेतलास शीण?
पावन करिसी का अम्हांतें?—अम्ही हीन दीन!
दीन अनाथांच्या धावण्या धावुनिया येसी
ब्रीदावलि फिरुनी आपुली पटवुनि कीं देसी?

कां न दिसे हातीं – कुठें ती मनमोहन मुरली !
वृन्दावनवृत्ती जियेच्या नादानें हरली
मुरलीची जादू बोबड्या बोलांमधिं मुरली ?
बोल बोबडे ते – चालुं दे तर मग ती मुरली.

तुझिया बोलानें, नव्हे, त्या मुरली–नादानें
हृदयींचीं शल्यें घडिभरी का नच बोथटणें ?
कण्ठ दाटला तों आसवें माउलिचीं गळलीं
बालमुकुन्दानें धावुनी ओन्जळींत धरलीं

७

पडे खळी श्वासें असे तव करतल दुलदुलित
धरूं नको म्हणुनी आसवें अपुल्या ओन्जळित
तीं माझीं माझ्या शिरावरि देई शिम्पुनिया
शिकवी मज दुक्खें मनींचीं मनांत दडपाया

ज्वालामुखि माझ्या सारखा हृदयीं धगधगतो
हा नयनांवाटे रसाचा तप्त लोट येतो
हें माझें लेणें असूं दे मलाच लखलाभ
विटाळ तुज नलगे, नको तुज दुक्खांचा दाब.

दुक्खित हृदयींची रसरसे ही ओली आग
बालभावनांची तियेनें जळेल नव बाग
कसें हें न कळलें मला तरि ? अश्रू ओघळले—
न तेंहि एकान्तीं; हासऱ्या नयनां दाखविले ! !

बघ डोळे पुसले, न होवो खुरटा हा वाफा
मम दुक्खाश्रूंच्या तप्त कधिं लागोत न वाफा.

८

झुळझुळतो वारा जनांचा ताप निवाराया
लुकलुकते तारा मनामधिं आशा उभवाया
उतरे भूवरती चन्द्रिका जगास जगवाया
चन्द्रकला माझी साङ्गते अङ्गाई गाया
'नीज नीज बाळे'—लागली क्षणामधीं झोप
नित्य लोचनीं ती जिवाला ज्या नच भवताप
हसत-मुखावरती सारखी टक लावुनि बसले
कां एकाएकीं खिन्नतापटल तिथें दिसलें ?
ओळख नसतांना जिवाला कठोर जगताची,
उद्यांची न चिन्ता, न तैशी स्मृति गतदुक्खांची,
अथवा नच रुतले जिव्हारीं शब्दांचे भाले,
षडरींचे हल्ले नसुन कां मन कष्टी झालें ?
झोप नको असली, लाडके, ऊठ गडे ऊठ,
कालवतें पोटीं, गळ्याला मार मिठी घट्ट.

९

स्वप्न तरी पडतें कशाचें हें सोनुकलीला ?
कोण तिथें दावी आपुल्या भेसुर बहु लीला ?
उर धडधडे कां ? कशाचें दुक्ख तुला इन्दू ?
कां रडवी मुद्रा ? लोचनीं अश्रूंचे बिन्दू ?
कार्यीं जयहानी, निराशा, मानभङ्ग अथवा
मरणाची भीति, न ठावे भग्न-मनोरथ वा.

स्वर्गींचि भूवरती माझिया अङ्कावरि तुजला
काजळकाठ असा वृथा कां अश्रूंनीं भिजला ?
हास्यानें तुझिया येतसे उमेद मजलागीं
निर्जन मैदानीं उपवनें दिसतिं जागजागीं
कण्टकही दिसती पथांतिल दारुण अन्धारीं;
भर दिवसां तुझिया रोदनें परि ये अन्धारी.
ऊठ गडे छकुले ! पुरे ही दुक्खद तव निद्रा
हुरहुर निववाया ऊठ ये मार मिठी चन्द्रा !

## १०

दचकुनि रात्रीची मारिसी हाकावर हाका
इहलोकीं नसता कुणी तुज ओ देतिल परि का ?
झोंपेंतुनि उठुनी घालिसी मानेला विळखा
दृष्टीला दृष्टी रोखुनी सबाष्प बवसी कां ?
पुसतें परि तुज मी कशाला वृथाच वरकरणी
ही दाटी केली अश्रुंनीं माझियाहि नयनीं
तुझें चिमुकलें ज्या कारणें धडधडतें ऊर
तीच हृदीं माझ्या कालवाकालव हुरहूर.
स्वप्नामधिं तुजला दिसूनी आली जी मूर्ती
तीच पोहताहे माझिया अश्रुजलावरती
बोलुनि दावाया परन्तू येईना तुजला
सकल मला कळतें — तेंच तर असह्य बहु मजला
एकामेकांनीं द्यायचा धीर उभयतांना
मग कां हें रडणें ? पुसूं या ऊठ लोचनांना.

११

" माण्डीवर आई मला तूं आज घेतलेंस "
वरचेवर म्हणसी, कितीतरि तुज त्याचा हर्ष !
हें ज्यांना त्यांना साङ्गसी तूं उठल्या सुटल्या,
किति आनन्दाच्या अन्तरीं तव उकळया फुटल्या
कळे न अर्थ कुणा तुझ्या या अत्यानन्दाचा
आइच्या नि कविच्या अन्तरीं ग्रन्थ परी त्याचा.
नको सुमनशय्या, नको जरतारी शृङ्गार
कुबेरसदनींचे नको मणिमोत्यांचे हार.
आईच्या अङ्कीं निरन्तर लोळण लाभावें
वत्सल नजरेची पाङ्घरुन झूल झोंपि जावें.
नको अन्नपाणी, भुकेला भुकेहि पुरतात
लालन-पालन हें मिळाल्या स्वर्गावर लाथ !
या एक्या वचनीं इन्दु, तूं गुरूच मज होसी
बालगुरो ! शिकवा कधींकधिं असेंच चुकल्यासी !

१२

सगळे खेळ तुझे चालती सदाच निर्बन्ध
प्रतिक्षणीं देती सकौतुक नवीन आनन्द
कितीकदां चुकसी, मनीं नच खन्ती परि चुकता
साधुवृत्ति बाल्यीं नान्दते हर्ष-खेद-समता
पांच, सात किंवा झोलिसी नउ सागरगोटे
सागरगोटे त्या म्हणावें तरि ठरतें खोटें

होती वर खालीं झेलता, नयनांची कान्ती
पडुनी त्यांवरती मिळे त्यां रत्नांची दीप्ति
ते कविरायाचे झेलिसी कीं पञ्चप्राण
सप्तसागरांना मिळे कीं गोल रूप सान
कधीं कधीं होती नवग्रह तुझें खेळणें कीं
तव हातीं याया वाञ्छिती देव पहा नाकीं
म्हणुनी इन्दु गडे, सारखी अशीच तूं खेळ
भग्न चित्त रमतें जया नच संसारीं मेळ.

१२

" श्री-ग-णे-शा "तें वन्दुनी मुळाक्षरें पुढचीं
गिरवाया सजसी, कुचेष्टा होते परि त्याची
म्हणो कुणी " वेड्यावाकड्या काय अहा रेघा "
जलवृष्टी बिजली मातृपद देती परि मेघा
बालमुकुन्दाच्या आननीं दिसलें ब्रह्माण्ड
उद्यां कशावरुनी लिपी ही करील नच बण्ड
कणाकणामधुनी सांपडे मृत्तिकेंत सोनें
प्रगट न व्हावी कां लिपींतुन या ब्रह्मज्ञानें
मुळाक्षरें जरि हीं आजला इतस्ततः दिसलीं
भावी सौख्याचीं साधनें त्यांत परी लपलीं
आज भासतीं जीं अक्षरें जनांस बेडौल
मोक्षाच्या वाटा उद्यां परि तींच दावितील
तमास संहरिते वाकडी चन्द्राची कोर
अथाङ्ग भवडोहीं लिपी ही नाव वाकदार

१४

दासबोध उघडा, क्रमानें नजर फिरे वरुनी
अर्थबोध कुठला चित्त जर भलत्या अवधानीं
दुःखी स्मरणांची साखळी कां अवचित तुटली ?
परिचित हास्याची लकेर श्रवणीं आपटली
वळुन पाहिलें तों हासली इन्दू खेळांत,
चित्त माउलीचें उडालें क्षणिं गतकाळांत
हास पुन्हा इन्दू, सारखी अशीच तूं हास
मृतसौख्याशेचा सेवुं दे पुनरपि मज भास
ज्या हास्यावरती मनोरे अगणित मीं रचले
तेंच निमाल्यानें अकालीं सगळे कोसळले
देव्हाऱ्यामधल्या मूर्तिचें तूंच बालरूप !
खळी तुझ्या गालीं देतसे औदास्यीं हुरुप
लकब तिकडची ती हुबेहुब मिळे तुला, हास.
सत्य-सुखाभावीं दुःखिता आवडतो भास.

१५

आज लोम्बकळुनी घालिसी मानेला विळखा
कोण कवी कुठला — थोरपणिं ढुङ्कुनि बघशिल का ?
भीत भीत ऐसा प्रश्न करि मन शङ्केखोर
अनुभववृक्षाचीं चाखतां फळें कडू जहर.
घडो बिचारें हें कधीं जर असेल घडणार;
नियतीला कैशी कुणाची शक्ति अडविणार ?

सौख्य मानुनीया भोगणें दुक्खांचा मारा
हाच मुळीं आहे जीवितीं क्रूर कडक धारा.
जीं आशीर्वचनें ऐकिसी आज मुखांतील
त्वां अवमानियलें तरीही तींच प्रगटतील.
वेड लावुनी जें घालतें हृदयाङ्गणिं नाच
तुझिया थोरपणीं आठविन बालरूप हेंच.
होइल काय उद्यां कशाला वृथा धरूं भीति ?
गतसौख्यस्मरणें देइ कवि दुर्दैवा माती.

१६

तिथी सुमङ्गल ही इन्दु तव सालगिरा आज
शतायुषी भव ! घे तुला हा कवितांचा साज.
ओवाळणि कसली याविना दुसरी तुज घालूं ?
गरिबाच्या सदनीं न मुक्ताहार न वा शालू.
" शतायुषी भव " या प्रीतिच्या आशीर्वचनाच्या
कवितापङ्क्तिपुढें निष्प्रभा राशी रत्नांच्या
शोभति शम्भर या पाकळया जीवितारविन्दा
एक एक विकसो द्यावया अमोप आनन्दा
जीवित – काळानें सोडिला बाणच हा जाण
उल्लङ्घुनि वेगें चालला तव बाल्योद्यान.
त्रिभुवनमोलेंही न लाधे फिरुनी बाळपण
काळनक्र सोडी कधीं का मणि दाढेंतून ?
मधुर बाल्यसौख्यें पुढें परि तुजला आठवता
जरि गातिल कवनें हीं तरी मत्श्रमसार्थकता.
१९२२

# चिमुकल्या वसन्तास

जाति—चन्द्रकला

" उगि उगि रे बाळा वसन्ता किती रडायाचें "
हेतु कसे मनिंचे कळावे मुक्या वसन्ताचे
भुरक्या रङ्गाचें कपाळीं जावळ भुरभुरतें
सुन्दरशी टिकली मधोमध त्यांतुन चमचमते
मुठी झाकलेल्या, मनगट्या मणिबन्धीं खुलती
कण्ठ जया फुटला राघुची मान दिसे जणु ती
" घे बाळा हातीं खुळखुळा " – छे, गळला खालीं
दृष्टि वसन्ताची मनगटीवरती परि खिळली.
डबडबले डोळे अश्रुंनीं, बिन्दु तसे गालीं
परि एकाएकीं थाम्बलें रडणें त्या काळीं
" ओढओढुनी तीं पाहसी हातीं घ्यायास
जिवापाड करिसी आपुली शिकस्त सायास.
येईना हातीं परन्तू – जरि आटोक्यांत
जादुगिरीचा ह्या पडेना उमगहि डोक्यांत.
फिरफिरुनी झटसी, त्रासती, कण्टाळुन जासी
गङ्गायमुनांच्या पुन्हा ये भरती ओघासी."
विफल यत्न ऐसा चालतो दुबळ्या जीवांचा
समजुतिवाचोनी खळेना ओघळ अश्रूंचा
" उगि उगि रे चिमण्या, वसन्ता, किती रडायाचें,"
हेतु कसे मनिंचे कळावे बाल वसन्ताचे !

पुणें, १६।२।२३

---

## सुधेस

जाति—भूपतिवैभव

बघ वाकवाकुनी अशीच दारांतून
हें अर्धें दर्शन मज टाकी मोहून
ही क्षितिजामागें उषा लाजरी खुलते
कीं पानामागें कळी मनोहर डुलते
कीं आनन्दाची उकळी हृदयांतून
हुरहूर मधुर कीं उसळे उकळींतून
कीं लकेर अपुरी कुञ्जवनांतुन येई
कीं इन्द्रधनु नभीं क्षणिं येई क्षणिं जाई.
या नानापरिच्या सुन्दरतेंतिल गोडी
उमटली तुझ्या कीं कृतींत थोडी थोडी
निज ओष्ठसम्पुटीं हळुच तर्जनी धरुन
ती तशीच तिरपी नजर लाव चोरून.
मी उदासवाणा येतां कधिं तव सदनीं
मज फुलवी छकुले ! याच लपण्डावांनीं

पुणें, ३०।६।२२

---

## कळ्यांचा भात

जाति—चन्द्रकला

'सैंपाकहि करुनी तुला मी वालिन थोलपणीं'
सुधे, सुधेहुनि हें गोड तूं बोलसि बाळ गुणी !
झोम्बुनि कटिखान्दीं घालिसी तूं धाङ्गडधिङ्गा
अनन्त तव रूपें दिसतिं या हृदयाच्या भिङ्गा
डिवचुनि फिरफिरुनी माझिया भङ्ग समाधीचा
करुनि, मला म्हणसी 'जेव हा भात लुटूपटिचा'

बोलाचीच कढी जेवुनी बोलाचा भात
व्यवहारज्ञ पुसे 'होइ का क्षुधाविकल तृप्त' ?
खुळ्या पिश्या तुकया, फोल तव ती अभङ्गवाणी
काय न शिशुमूर्ती विठाई – रखुमाईवाणी ?
सुधे, थोरपणिंचा न ठावा नेमानेम कुणा
[ सुरळित रथ चालो, तयाला कधिं लागो न घुणा.]
परि कुसकरलेल्या कळ्यांचा वाढ आज भात
पुढचें पाहुं पुढें तृप्तता आज मला ह्यांत !

पुणें, १५।२।२३

---

## पन्तोजीची छडी

जाति–चन्द्रकान्त

बालबालिका – कळ्या कोंवळ्या ह्या तुझिया हातीं
कठोर करणी तुझी; पहा त्या कुसकरल्या जाती
बालभानु उमलवी कळ्यांना किति नाजुकतेनें
प्रभातसमयीं न पाहिलें का उघड्या डोळयानें
मनें मुलांचीं – कापुस केवळ विरल पिन्जलेला
सूत कातणें तुला न ठावें, टाकिसि ठिणगीला
मनें मुलांचीं – केवळ मखमल नाजुक गुल्जार
कला न ठावी कर लावावा कैसा हळुवार
प्रशान्त सलिलीं केविं पसरती हास्याच्या लहरी
झुळझुळत्या वायुची कला ती शिकुनी येइ तरी
तूं पन्तोजी, भाग्य मिळे तुज मालाकाराचें
परि सङ्गोपन तुला येइना मृदुल अङ्कुरांचें
पुरेल साखर तिथें योजना कशास जहराची
पन्तोजीनें छडी धरावी पुष्पपरागांची

हैद्राबाद, २।१०।२२

---

# माळुं नको ग !

जाति-फुलवेल

" माळुं नको ग। मीं केलं काय तली ग ! "

अश्रुबिन्दु शिशुनयनांमधुनी
टपटप खालीं गालांवरुनी
ओसरले, जणु गगनांतूनी
तारका तुटती। कीं फुलें वेलिचीं गळतीं !

वदनचन्द्रमा तान्हूल्याचा
किंवा झेला नव कुसुमांचा
म्लान दीन तो देखुनि साचा
हृदय मातेचें। द्रवल्याविण राहिल कैचें ?

जरी माय ती मारी वरुनी
तरि पायांशीं तिच्या बिलगुनी
मुखाकडे वर विचकत बघुनी
वदे वेल्हाळ-" कां देसी आई माल ? "

शब्द बोबडे तशांत असले
माउलिच्या जों कानीं आले
हृदय तियेचें क्षणिं विरघळलें
निवाला कोप। गळली छडि आपोआप

घेई चटकन उचलुन वरती
चुम्बुनि रडवी मोहक मूर्ती
पदराखालीं स्तनिं लावी ती
तिचेही झाले। अश्रुंनीं नयन मग ओले

निज मातेचें स्फुन्दन ऐकुनि
स्तनपानातें देई सोडुनि

मृदु हातानें अश्रू पुसुनी
म्हणे " आई ग ! कुणि तुला मारिलं साङ्ग ! "
गालासन्निध गाल बिलगला
गळ्याभोंवतीं हात चिमुकला
दुजा आइच्या पुशि नयनांला
दृश्य हें बघुन । निवर्तील न कां कविनयन ?

पुणें, ६।८।२०

---

# चि॰ भास्करभाऊस

ज्यांनीं झुन्ज तहाहयात अपुल्या दैवासवें माण्डिली
ज्यांनीं दुःसह सर्वथा विषमता आयुःपथीं साहिली
आले खात तहाहयात अपुली अश्रूंसवें भाकरी
केली भोगुनि भोग जीवित–तपश्चर्या जयांनीं पुरी
जे तावूनि सुलाखुनी निघटले संसारवन्हींतुनी
भाऊ, वृद्ध वडील देख अपुले – माङ्गल्यमन्दाकिनी !
सच्चारित्र्यतपें अहा उजळले ( लोकीं हुतात्म्यापरी
डङ्का नौबति राहिल्या झडुनिया त्यांच्या न कोठें जरी )
भाऊ, वृद्ध वडील देख अपुलें हें जागतें दैवत
त्यांचा आठव ठेवुनी हरघडी पाऊल जा टाकित
देवा आठवलेस वा नच जरी मानी न त्याच्या भया
साक्षात् तोहि तरी सजेल विजयोत्कर्षीं तुला न्यावया
लोकीं अन्य जरी अतां वसति ते आत्मा तयांचा परि
मच्चित्तीं स्फुरुनी असीं वदवितो आशीर्वचें, स्वीकरी

येरवडा, २१।३।२६ / १०।८।२८

---

# ध्यासांतून भास

वृत्त—भिल्लीण

ज्याच्या स्मृतिमाजीच जिवा पूर्ण विसावा
तो मित्र हनूमन्त गवाक्षांत दिसावा !
ती गौर तनू सोज्ज्वळ, वाणींत जिव्हाळा
स्नेहास उमाळा हृदिं तो नेत्रिं ठसावा
गाम्भीर्य जणू सिन्धु, उपाहास्य कपोलीं,
ती शान्ति जणू इन्दु; मला तोच कुडावा
हें ध्यान असें रेखुन चित्तीं धरिलें मीं
कां भक्तिबळें ईश न साकार दिसावा !

सोडून तुझें मौन झणीं बोल सख्या रे
वाणींत सुधाकुम्भ मला कां न मिळावा ?
होतास कुठें आजवरी दूर विदेशीं ?
मीं ध्यास तुझा कोठवरी सन्तत घ्यावा !
हातांत सख्या हात सदा घालुनि हिण्डूं
हें येइ मनीं, तूं परि गेहींच नसावा
'जाणार कुठें सोडुनि नाहींच तुला मी'
आश्वासन हें दे; मज तूं जीवन जीवा.

कां आड असे येति उभे राहुनि अश्रू ?
कां दर्शनसौख्यास असा व्यत्यय यावा !
अश्रूंस पुसायास वरी जों कर गेला
अश्रूंत कसा प्राणसखा हाय विरावा !
होतास पुढें ना ! तरि गेलास कुठें तू ?
कां चाळवण्या दाविसि ?—गेला नभिं रावा !
गेला परताया न; मना, स्वप्नच सारें
ध्यासांतुनि हो भास तया जीव फसावा !

येरवडा, २९।८।२३

# आई

जाति—रसना

'आई' म्हणोनि कोणी
ती हाक येइ कानीं
नोहेच हाक, मातें
आई कुणा म्हणूं मी ?
ही न्यूनता सुखाची
स्वामी तिन्ही जगांचा

चारा मुखीं पिलांच्या
गोठ्यांत वासरांना
वात्सल्य हें पशूंचें
पाहून अन्तरात्मा
वात्सल्य माउलीचें
दुर्भाग्य याविना का

शाळेंतुनी घराला
काढून ठेविलेला
उष्टया तशा मुखाच्या
कोणी तुझ्याविना गे
तूझ्याविना न कोणी
साङ्गेल ना म्हणाया

ताईस या कशाची
त्या सान बालिकेला
पाणी तरारतांना
ऐकूनि घे परन्तु
साङ्गे तसें मुलींना
ते बोल येति कानीं

आईस हाक मारी
मज होय शोककारी
मारी कुणी कुठारी
आई घरीं न दारीं !
चित्ता सदा विदारी
आईविना भिकारी.

चिमणी हळूच देई
ह्या चाटतात गाई
मी रोज रोज पाहीं
व्याकूळ हाय होई
आम्हां जगांत नाहीं
आम्हांस नाहिं आई

येतां धरील पोटीं
घालील घास ओठीं
धावेल चुम्बना ती
का ह्या करील गोष्टी ?
लावील सान्जवाती
आम्हां 'शुभं करोति'

जाणीव कांहिं नाहीं
न यांत कांहीं
नत्रा... चरे ही
" आम्हांस नाहिं आई "
" आम्हांस नाहिं आई "
" आम्हांस नाहिं आई ! "

आई ! तुझ्याच ठायीं
माहेर मङ्गलाचें
गाम्भीर्य सागराचें
नेत्रांत तेज नाचे
वात्सल्य गाढ पोटीं
वास्तव्य या गुणांचें

गुम्फून पूर्वजांच्या
साऱ्या सभाजनांनीं
आई, करावया तूं
या न्यूनतेमुळें ही
पञ्चारती जनांची
परि जीव बालकाचा

येशील तूं घराला
दवडूं नको घडीला
हे गुन्तले जिवाचे
कर्तव्य माउलीचें
रुसणार मी न आतां
ये रागवावयाही

सामर्थ्य नन्दिनीचें
अद्वैत तापसांचें
औदार्य या धरेचें
त्या कान्त चन्द्रिकेचें
त्या मेघमण्डळाचें
आई, तुझ्यांत साचें

मीं गाइलें गुणांला
या वानिलें कृतीला
नाहींस कौतुकाला।
मज त्याज्य पुष्पमाला
ना लोभवी मनाला
तव कौतुका भुकेला

परतूल केधवां गे
ये ये निघून वेगें
पायीं तुझ्याच धागे
करण्यास येइ वेगें
जरि बोलशील रागें
परि येइ येइ वेगें

पुणें, २२–१–१९२२

# सङ्क्रमण

वृत्त—शार्दूलविक्रीडित

१

प्रेमाचीं तुटलीं जिवाभंवतिचीं तीं बन्धनें पूर्वींचीं
होतां तत्स्मृति चित्त हें चरकतें, काटा थरारे त्वरें
कांहीं कांहिं ऋणानुबन्ध जडती येथून आतां नवे
त्यांचीया अवगुण्ठनीं मधुरता मी आणितों जीविता

माथा ठेवुनिया पदीं विनवितों प्रेमी जिवांनो तुम्हां
आतां देउं नकाच अन्तर कधीं या पोळलेल्या जिवा
सौख्यांचे खजिने करून उघडे दावीन कोणासही
दुःखांचे खजिने खुले करुं तुम्हांवाचून कोणापुढें ?

मकरसङ्क्रान्त, १८४४

२

आहे हक्क म्हणून हट्ट धरितां ये प्रत्यया वेगळें
दावावा जर औपचारिकपणा सन्मान सारा मिळे
आहे हा व्यवहार ! भाविकपणा हा हाच वाटे गुन्हा !
कांहींही वडतां अपेक्षित न जें, होती मला यातना

सोडूं भाविकता ? कशास्तव हवे सम्बन्ध लोकीं मग
सोडूं भाविकता ? कशास्तव तरी पाहूं खुलें हें जग ?
आहे भाविकतेंत उत्कटपणा हा दोष कोणी म्हणे
साङ्गा भाविकतेस उत्कटपणावाचून कैसें जिणें ?

तें कांहींहि असो; मला अनुभवें आतां कळूं लागलें
त्यागान्तीं हृदयास शान्ति मिळते, ना सौख्य तीवेगळें

मकरसङ्क्रान्त, १८४५

३

वृत्त–वियोगिनी

हृदयीं भरला सुधार्णव
निपजे बोल मदीय त्यांतुनी
विपरीत परन्तु भाव ही
जनता त्यांतुनि घेइ शोधुनी

तिळतीळ तुटून यामुळें
सुहृदांनो, मम जीव जातसे !
अधना खजिनाच वैखरी
न रुचे तीच तुम्हां !–करूं कसें ?

कविते, मग मी करूं तुझी
तिळगूळास्तव केंवि योजना ?
भलता जरि अर्थ दे गिरा
बरवी फारच मौनधारणा !

मकरसङ्क्रान्त, १८४६

४

वृत्त–आनन्दकन्द

सङ्क्रान्त हालव्याचा घेऊन येइ पेला
कल्लोळ कल्पनांचा दे क्षोभ भावनेला
दुक्खी चिरस्मृतींनीं शङ्कून भावि काळा
व्याकूळ जीव होई लोपे क्षणीं तजेला

वाया विकल्प चित्तीं आणून पाठमोरे
झाले स्मृती तयांची अद्यापि दे व्यथेला

माझ्या सुखासुखाचे ते भागिदार गेले
माझ्या मनोरथाचा भङ्गून आंस गेला!
सम्बन्ध जोडलेले आतां तुटावयाची
येवो पुन्हा न तैसी केव्हांहि घात-वेळा

संसार-सागराचें हें दृश्य भीतिदायी
सौहार्द बान्धवांचें दीनास या सुवेळा
दुर्दैव–तीव्रतापें हा भस्म जीव होई
युष्मत्कृपावलोकें ये पालवी लतेला

माझ्याकडून झाले जाणूनि नेणुनी वा
अन्याय जे तयांच्या मी याचितों क्षमेला
स्नेहामृताभिलाषी गुन्तून भाव-पाशीं
द्या थेम्ब मात्र मागे मी आपुला भुकेला

मकरसङ्क्रान्त, १८४७

५

वृत्त–शार्दूलविक्रीडित

जाती पाजळल्या निशीथसमयीं ज्योती नभःप्राङ्गणीं
तेजोगोल उफाळती वरिवरी कीं जेविं दारूतुनी
तैशा आठवणी जुन्या उजळुनी येती मनीं या दिनीं
अन् मी आक्रमितों मदीय पथ हा त्यांच्या प्रकाशांतुनी

या हो बान्धव, आजही विहरुं या प्रेमामधें आपण
बोलूं या गुजगोष्टि आणि हृदयीं ठेवूं तयां कोरुन
ठेवूं साठवुनी मनीं कृपणसे स्नेहाळ सद्यःक्षण
कीं जे आपुलिया भविष्यचरितीं होतील नीराजन

मकरसङ्क्रान्त, १८४८

६

वृत्त–शार्दूलविक्रीडित

नक्षत्रें, सण, वार, मङ्गल घटी पञ्चाङ्ग धुण्डाळुनी
आवर्जून किमर्थ रोज कथिती हे ग्रामजोशी मला ?
कांहीं मोडुनि आंकडे बसविले जे ठोकताळे जनीं
त्यांच्या काय कलानुसार हृदयव्यापार हा चालला ?

हा पर्जन्य ऋतू इथून दिसतो पानांत या छापला
ग्रीष्मर्तूसम जीव होरपळला माझा परन्तू तदा
या पानावरती दिसे कथियली कां हो दिवाळी कशी
होता भीषण अन्धकार भरला माझ्या तदा मानसीं

केव्हा सर्व कुयोगही उलट तों झाले महन्मङ्गल
झाल्या कृष्ण निशा उषेहुन मला कित्येकदा सुन्दर
साक्षात्कार शुभाशुभङ्कर असे होता मला आंतुनी
कैसे होतिल शक्त तन्नियमना निर्बन्ध बाहेरचे ?

माझें चित्त जुमानतें न असल्या याद्या तहाच्या वृथा
का हो पाळुन औपचारिक विधी ये श्रेय सम्पादतां ?

मकरसङ्क्रान्त, १८४९.

७

वृत्त–अगोढ

अनेक सङ्क्रमणांनीं स्थितीस ये नवता
मतीस विस्मय देई तिची अकल्पितता
कुठून केवि निघालों न होतसे गणना
कुठें विराम, न अन्दाज तोहि ये पुरता
परन्तु येउन वर्षानुवर्षं पूर महा
प्रवाह पालटलेली दिसे जशी सरिता

भले बुरे बहु संस्कार त्यापरी घडुनी
नवी दिशा अनुभूतीमुळें मिळे चरिता
दुरावले जन कांहीं बुजून तीस परि
कशी तया पटवूं हाय भावनिर्मळता

तथापि अन्तरवत्ते सवङ्गडी अजुनी
सुखोष्ण स्नेहसुधासेक माझियावरता
करून या निववीती निदाघतप्त जिवा
परी मला उतराई न व्हावया क्षमता

कृतज्ञता सुहृदांनो शके न दावुं जरी
विनन्ति कीं ग्रह चित्तीं धरूं नका भलता
तुम्हांविना तरि अस्तित्व कोठुनी मजला?
असेन चन्द्र जरी मी तुम्ही मला सविता

अनेक सङ्क्रमणांनीं स्थितीस ये नवता
मतीस विस्मय देई तिची अकल्पितता
नवीन आज गमे जें उद्यांस होइ जुनें
परन्तु रूप उद्यांचें न येइ आकलतां
नभांत जो ध्वज डौलांत आज सञ्चरतो
कशावरून उद्यां तो न व्हायचा कलता?
असेल आणि पताका धुळींत जी पडली
उद्यां बसेल दरारा तिचा न का भवता?
झडून तीव्र हिमें वृक्ष वैभवा मुकला
वसन्त काय तरी दूर त्यास पालविता?
मुळांत विश्वपसारा अणूअणूंत फिरे
तदङ्गभूत पदार्थांस कोठुनी स्थिरता?
मना तरी नलगे खन्त अन्तरीं धरणें
प्रकाशतो फिरुनी अस्त जाहला सविता

मकरसङ्क्रान्त, १८५०

# नाङ्गरखुण्टी सोन्याची।
# बैल-वेसण मोत्याची॥ [हदग्याचें गाणें]

सोन्याची कधिं लाविली हलधरा खुण्टी तुवां नाङ्गरा?
मोत्यांच्या कधि वेसणी कृपिवला बैलांस तूं लाविल्या?
हे अज्ञात कवे! अलोट विभवा त्वां ह्या कधीं पाहिलें?
कैसा त्यांतिल शेषही न उरला आम्हांस पाहावया?
आम्ही साम्प्रत पाहतों कृषिक हा अर्ध्यांच पोटीं जगे
वस्त्राला कुठला घरांत अडका? कर्जांत शेती रुते
फेडाया वर व्याज जात विकले ते बैल तो नाङ्गर
रस्ता मुम्बइचा धरून मरणा देतोच आमन्त्रण
पाहाया मिळणार का न वरच्या गीतांतलें वैभव?
जें केलें मनुजें करूं नच शके का तें पुन्हा मानव?

-येरवडा, २९।४।२५

---

# भूपतास मुजरा

सोन्याच्या मुगुटामधीं झळकती तेजाळ मोत्यें हिरे
वस्त्रें सुन्दर शोभतीं भरजरी, वारी कुणी चामरें
पायांमाजि चढाव – छे उतरलें ताऱ्यांसवें अम्बर
बान्धोनी कमरेस खड्ग बसला सिंहासनाधीश्वर
वाखाचा कमरेस दोर, खुरपें तेथें दिलें खोवुनी
पायीं जीर्ण वहाण जाड, फरशी खान्द्यावरी टाकुनी
लङ्गोटी भर वीत रुन्द, मळक्या चिन्ध्या शिरीं बान्धुनी
शेताच्या अपुल्या उभा दिसतसे बान्धावरी तो कुणी
त्या तख्तावर बाहुली – तिज नमी मालीक शेतांतला
ह्या शेतांतिल भूपतीस मुजरा राखून मीं ठेविला

-येरवडा, ३१।७।२३

---

# शेतकींतील सुख

जाति—केशवकरणी

पूर्व-पश्चिमा खळाळांतुनी वाहे जलवाहिनी
माण्डवी असुची मन्दाकिनी
दूर डोङ्गरासमीप अगदीं तीच्या तीरावरी
आमुची जमीन वतनी बरी
भरदार शिवारामधें पिकें दाटलीं
उगवत्या भानुची प्रभा नभीं फाकली
बान्धावर गवतें हिरवीं फोफावलीं
वनलक्ष्मीचें अभिनव वैभव उतास जणु चाललें
खगांनीं तत्स्वागत गायिलें
सृष्टिसतीच्या आनन्दाच्या प्रसन्न उत्सवदिनीं
शिवारामधें गात येउनी
वरुणकृपेचा विलास ऐसा पाहुन मनमोहन
वाटलें चित्तीं मजलागुन—
कोपऱ्यावरिल त्या आम्रतरूच्या तळीं
मृदु तृणाङ्कुरांची मखमल गादी भली
बुन्ध्यास टेकुनी, चक्रवर्ति जणु बळी,
भूक लागतां चटणी किंवा कान्दा अन् भाकर
खाउनी द्यावी वर ढेकर
घुमाळ-बाळा जोडी घेउनि मोट धरावी कधीं
करावी राखण मळणी कधीं
रास घालुनी डोळे भरुनी सन्तोषें पाहुनी
निजावें वाकळ मग पसरुनी
वर चन्द्रतारकामण्डित तें अम्बर
पायथ्यास पडुनी वाघ्या करि गुर्गुर
वाजती गळ्यांतिल बैलांचे घुङ्गुर
लाख पटींनीं हें न सुखद का कृषिकर्मीं राबणें !
नको तें परवशतेचें जिणें !

पुणें, १२।१२।२३

———

# चौघड्याचे घडे

वृत्त-शार्दूलविक्रीडित

झालेली मृत भावना पुनरपी आणून द्या हो कुणी
गेलेली सुकुनी पुन्हा प्रगटवा कोणी तरी वाहिनी
गेलेली विझुनी फिरून फुलवा कोणी तरी ही धुमी
गेली लोपुन खेळवा फिरुन ती अङ्गामधें रुस्तुमी

येती हेच दिशांदिशांतुनि जरी रोजीं घुमोनी ध्वनी
राहे वाढत उत्तरोत्तर परी दौर्बल्य देहीं मनीं
हातीं हात धरून आक्रमुं पथा चाले जरी घोपणा
जे जे गर्जत राहती घन नभीं ते देति का वर्षणा ?

द्वेषाची ठिणगी फुलून भडका होतो अकस्मात् कुठें
शान्तीचा क्षणजीवि बुद्बुद् फुटे, पेटे मुळीं रोपटें
ठेवाया नरडीवरी नख उठे सैतान माथेफिरू
ऐक्य क्षीण सुतापरी क्षणिं तुटे, बन्धुत्व लागे विरूं.

बाबांनो, विसरून तत्व लढता; ते धर्मतण्टे नको
आपत्काल शिरावरी निज करें ओढून घेणें नको
स्वार्थी माजविणें नको कलह, ते खोटे वहाणे नको
गोऱ्यांचा बडिवार गात बसुनी निस्तेज होणें नको.

ध्येयाची ध्रुव तारका वळखुनी फेरे तिच्या भोंवतीं
आप्राणान्त धरा – धरून पटवा ती रीति अन्यांप्रती.
घोडे सूर्यरथास सात परि ते एकाच जाती पथें
सामर्थ्ये सगळींच एकवटतां दुष्प्राप्यता ती कुठें ?

ज्याचा विक्रम, कार्य, कीर्ति, महती गातात हे चौघडे
त्याचे ह्या व्यतिरिक्त काय दुसरे दिव्य प्रभावी घडे ?

येरवडा, १८।३।२७

# यशःश्री पायिंची दासी

वृत्त—वसन्त

तुझ्या हातीं सुवर्णाचें मिळावें मोल मातीला
हिऱ्याचें तेज ही तैसें चढावें गारगोटीला
दिसावी पावलांखालीं खड्यांना तारकाकान्ती
विषारी तीक्ष्ण काट्यांचीं तुझ्या स्पर्शी फुलें होती
मनीषा ही जरी, ठेवी मनीं या खूणगाठीसी
ग्रहांचें साह्य शूराला यशःश्री पायिंची दासी

घणाचे घाव घालावे गळावा घाम अङ्गींचा
यशोदेवी तयासाठीं करीं घे हार पुष्पांचा
स्वसामर्थ्यें स्वचारित्र्यें तुवां हें दाविता राया
तरी ये निन्दकांच्याही मुखीं वाणी 'अहो या या'
बुजेना व्याप-आटोपा खलांच्या वा विरोधासी
ग्रहांचें साह्य त्या शूरा यशःश्री पायिंची दासी

ग्रहांनीं कुण्डलीच्या त्या फिरावें कोष्टकामाजीं
परी यत्नांस जो राजी ठरे तो सर्वदा गाजी
मनोरे मानसीं ज्यांच्या जयांना लोढ आधार
तयांचा ऐकुनी टाहो दया देवा न येणार
स्मरोनी आत्मकर्तव्या प्रयत्नांची करी रास
स्वयें चोखाळितो वाटा तयाचा देवही दास
दिसाया वाट अन्धारीं विजेचें तेज नेत्रांसी
ग्रहांचें साह्य शूराला यशःश्री पायिंची दासी

चाफळ, २१।११।२२



ग्रंथ संग्रहालय
रा. क्र. ३९८०

# खलांनो !

वृत्त—वसन्त

खलांच्या अन्तरङ्गाचा मला ठावाच देखावा
उरीं ज्वालामुखी पेटे, कढे पोटामधें लाव्हा
जिभेच्या अग्रभागाला मधाचीं मोहळें मोठीं
परन्तू डोम्ब आगीचा तयांच्या पेटतो पोटीं
दुधाच्या देखुनी धारा तयांना चीक शेराचा
म्हणोनी साङ्गण्यासाठीं धजे यांची खुनी वाचा
सुखाच्या पूर्ण चन्द्रानें जिथें फसाळतो सिन्धू
तिथें हे टाकुनी देती विषाचा नेमका बिन्दू
विराजे अङ्गणीं कोठें जरी कोजागरी रात्र
तिथें थूत्कार घालाया क्षणार्धीं ठाकती मात्र

रचा हो धूर्त दुष्टांनो, कसाही व्यूह जन्जाल
तया उल्लङ्घुनी जाया अम्हांला पङ्ख पाहाल
कसाही चालवा मारा न दावूं अल्पही ढाळ
न भङ्गे वज्रसम्पातें शिरीं जी आमुच्या ढाल
करा हो दुष्ट बुद्धीनें विषाची सारखी वृष्टी
विषानें शुद्ध भावाची जळोनी जाइना सृष्टी
विषारी वाफ सोडोनी भरा दुष्कीर्तिचा धूर
अम्हां वाटे फुलेलाचा वियद्गङ्गेस हा पूर
अम्हांला चिल्खतासाठीं त्वचा प्रल्हादबाळाची
कशा रूपांतही येवो अम्हां भीती न काळाची !

खलांनो, चालवा जिव्हा, जिव्हारीं भोसका बाण
खलांचे घाव झेलाया अम्हीं हें माण्डिलें ठाण !

पुणें, ११।८।२३

---

# आमचा धर्म

हातीं पाजळला सुरा, टकमका चोहींकडे पाहत
" गेली का इकडून गाय ? " पुसतो घामामधें नाहत
तो धेनुघ्न मृषोक्तिनें फसविणें आम्हांस मोक्षप्रद
साङ्गो कण्ठरवें श्रुतिस्मृति 'नरा, तूं नित्य सत्यम् वद'

गेले अन्त्यज मायबाप मरुनी, घाणेरडें शेम्बडें
रस्त्याच्या पडुनी कडेस उघडें तें पोरगें ओरडे
आम्हां एकच धर्म ठाउक तदा घ्यावें तयाला कडे
चातुर्वर्ण्यविचार गर्जति जरी सङ्केश्वरीं चौघडे

" कोणाचें तरि पोर बोल झणिं हें "–माझेंच हें पाडस !
" सम्भाजी नच काय हा "–करुं कसें हें घातकी धाडस ?
" याचा घेशिल का मुका "–न इतुकें, ताटांत एका बसूं
" झाला भ्रष्ट " तया म्हणो द्विज कुणी–आम्ही द्विजा त्या हसूं

धर्माची तरणार नाव फुटकी बाहूवरी ज्याचिया
धर्मत्याग करावयास धजणें संरक्षणीं त्याचिया
ज्याचें धाडस हें तयास अपुली बेटी सुखें अर्पणें
आम्हां ठाउक धर्म हाच, अमुच्या नांवें करा तर्पणें

अज्ञानें फसले, परास भुलले मिठ्ठास वाणीमुळें
होता क्षुद्रिकल स्वधर्म त्यजुनी गेले विधर्मीं खुळे
अन्तीं श्रेय कळून सावध परी होताच तापानलें
घ्यावें पावन त्यांस कां न करुनी ?–घेऊंच आम्ही बळें !

घेई साधुनि डाव जो बघुनिया पङ्गूपणा आमुचा
सत्ता गाजवुनी हुकूम बसवी माथां सदा सक्तिचा
स्कन्धीं घेउनिया तयास दुथडी पोहून जातां नदी
चारूं खास गटङ्गळ्या, मग कुणी आम्हां म्हणो दुष्टधी

जातीची अबला, फसून पडली ती पापपङ्कीं जरी
देती दुर्मद ते पशूच फसवे लत्ता तियेच्या शिरीं
गाती ऐकांति जे कथेंत गणिकोद्धारास पाषाणसे
धिक्कारून तयांस, हात पुढती भ्रष्टेस देऊं असे

येरवडा, १९२३

# माझा महाराष्ट्र

वृत्त–सुमन्दारमाला

नकाशा पुढें पाहतां भारताचा महाराष्ट्र आधीं भरे लोचनीं
असे हीच माझी अहा मायभूमी असे बोल येतात तोण्डांतुनी
हिच्या वैभवोत्कर्षसंवर्धना मी, पडे प्रश्न, आयास केले किती
कळोनी परी आत्मनिष्क्रीयता ती तदा हाय पस्तावते मन्मति

महाराष्ट्र माझा ! महाराष्ट्र माझा ! मुखानें वृथा चालते घोषणा
परन्तू न संसार भाराविना या दुजा कामधन्दा सुचेना मना
फिरावें परीघांत एकाच, जैसा फिरे बैल घाण्यास जो जुम्पिला
स्वताचे सदा गाळुनी घर्मबिन्दू दुजाचा मळा मात्र मी शिम्पिला

जिरूं लागल्या पार आतां उमेदी, सरूं लागलें पारतन्त्र्यीं जिणें
झुरूं लागुनी जीव खालीं वरी हो, जसें पाखरू होय पङ्खांविणें
कुणाचा धरूं हात हातांत आतां ? सुचेना वरूं मार्ग मी कोणते
न सेवा तुझी हातुनी जाहली या सदा शल्य हें मानसीं टोचतें

अमर्याद भूगोल विस्तारलेला किती त्यामधीं देश पुञ्जाळले
महाराष्ट्र भूचें परी त्यांत माझ्या दिसे सम्प्रती तेज मन्दावलें
तयांसारिखा दिव्य तेजोगुणी हा महाराष्ट्र होईल केव्हां पुन्हा ?
महाराष्ट्रमाते ! जना बुद्धि दे या तुझ्या वैभवोत्कर्षसंवर्धना

सदा गव्हरांतून सह्याद्रिच्या जे इथें स्रोत येतात देशावरी
पवाडेच गाती जणू पूर्वजांचे स्फुरायास चैतन्य लोकान्तरीं
निमाल्या महा पूर्वजांच्याच किंवा मनीषा मरुद्वैखरी बोलती
तयांनीं जित्या होउनी भावना या घडो हातुनी मायसेवाकृती

'महाराष्ट्र माझा' असें आज आम्ही जरी जन्मलाभामुळें बोलणें
'महाराष्ट्र माझा' असें घातलेल्या कधीं भूषणांच्यामुळें बोलणें ?

येरवडा, १५।८।२५

# स्वातन्त्र्यलक्ष्मीस मुजरा

वृत्त—वसन्त

दऱ्याखोऱ्यांतला आला कवी हा खास दर्बारा
मराठ्यांच्या महालक्ष्मी तुला घे शाहिरी मुजरा
जगाचा मानितों स्वामी स्वतांला मी महामानी
तुझ्या धामीं तुझ्या कामीं परन्तू दास हा मानी
असें शास्ता जनांचा मी परी माई तुझा भाट
दिपावें विश्व वाणीनें, तुझ्या येथें न तो थाट
नभींच्या तारकाराशी पदाघातें झुगारीन
परि स्वातन्त्र्यलक्ष्मी गे ! तुझ्या पायीं सदा लीन

जिजाऊचा स्वतेजाचा, शिवाजीचा स्वशौर्याचा
मराठ्यांच्या दराऱ्याचा, तसा तो स्वाभिमानाचा,
क्षणार्धीं चित्तचक्षूंना दिसाया लागला काळ
स्वराज्यीं जेधवा भाला जहाला नाङ्गरी फाळ
नभाला चुम्बिता झाला अतां तो मोडला भाला
परन्तू वाव येथें हा तयाच्या शेष तेजाला
भिनूं दे माझिया रोमीं तयाचें थोडकें तेज
जनां देईन साङ्गोनी नसे प्यालों कधीं पेज

इथें सञ्चारतें वारें थरारे स्पर्शनें अङ्ग
अहाहा ! जाहली वृत्ती समाधीमाजि त्या गुङ्ग !
झणीं बोला मला आज्ञा स्वरें सोडीन लल्कारी
पुन्हा लावीन नाचाया महाराष्ट्रीं दऱ्याखोरीं
जहाला नाङ्गराटीचा विखारी पूर्विचा भाला
अतांच्या लेखणींतूनी नवा आणीन जन्माला

समाधी लागली आहे म्हणोनी तोंवरी बोल
मराठ्यांच्या यशोगानीं मनानें स्फूर्तिनें डोल
तनूचें भान जावोनी बनूनी शून्य त्या नजरा
पडूं दे माउली खालीं तुझ्या वेणींतला गजरा
यशाचा कौल मानोनी मुदें सोडीन दर्बारा
मराठ्यांच्या महालक्ष्मी तुला घे शाहिरी मुजरा

बडोदें, ३०।११।२१

---

## समर्थांच्या पायांशीं

जाति—कोकिळ

स्वातन्त्र्याच्या चित्शक्तीच्या ह्याच खऱ्या सन्दुका
नमितों तव पादुका समर्था, नमितों तव पादुका

तव अभिमानें ब्रीद मिरविलें
तयासारखें कार्य न घडलें
सकळ मनोरथ दुबळे ठरले
काळ चालला फुका, हातुनी अगणित होती चुका

उगाच कांहीं माण्डुनि बसलों
श्रेय विसरुनी त्यांतच रमलों
क्षणिक सुखाच्या नादीं फसलों
रोज तेंच तें सेवन करुनी अजुन राहिलों भुका.

नाहीं ठावा जिवा विसावा
माराव्या तरि कुठवर धावा
विश्रान्तिस्थळ येइल केव्हां
परीघांतलें भ्रमण पोचवी स्वर्गाच्या दारिं का ?

अधिकाराचे कोणी पुतळे
मस्तक त्यांच्या पायीं झुकलें
भाव सर्वथा परन्तु हुकले
उलट तयांनीं रोखुनि धरल्या मजवरती बन्दुका

अन्धारामधिं चाचपडोनी
भलत्या वाटा पायीं मळुनी
कशीं वाञ्छितें येतिल जुळुनी
तेल कुणाच्या आलें हाता गाळुनि कधिं वालुका ?

भवतीं बघतां प्राण तळमळे
सारी पाङ्गापाङ्ग आढळे
ललाटपटलीं काय ना कळे
स्वातन्त्र्याचा या जन्मीं तरि दिसेल कधिं भानु का ?

रविकिरणांचा पूर वाहतो
विश्वगोल हा त्यांत नाहतो
परन्तु माझा मार्ग न दिसतो
दिशा जहाल्या निराशेमुळें आतां मज अन्धुका !

काय किती मी बोलुनि दावूं
काय कुणावर म्हणुनी कावूं
कोठवरी हें उगाच गाऊं
कण्ठ जाहला सुका, राहिला भाव मनांतच मुका.

परिस्थितीचा दाब भयङ्कर
तळमळ फडफड करितें अन्तर
धाव तुजकडे घेईं किङ्कर
नको लाथडूं तव पायांशीं पडल्या या कन्दुका

येरवडा, ८।४।२६

# माण्डवी

जाति—कोकिळा

[ समर्थकाळीं 'माण्डवी' या नांवानें विख्यात असलेली ही चाफळ-खोऱ्यांतील नदी भूगोलाच्या पुस्तकांत आज 'माण्ड' या नांवानेंच ओळखली जात आहे. सौन्दर्याला विकृति येणें हा काळाचा प्रभावच आहे.]

साङ्ग तुझा सन्देश माण्डवी साङ्ग तुझा सन्देश.
कालचक्र हें गरगर फिरवी
किती दिसांनीं दर्शन घडवी
हृदय उमललें आज माण्डवी !
तव आचमनीं क्षणीं हरपले कितिक माझे क्लेश.
समर्थगुरुची कर्मभूमि ही
पिढ्यांपिढ्यांची जन्मभूमि ही
दर्शनदुर्लभ परि मज होई
पोटासाठीं पेहरतां हा गुलामगिरिचा वेश.
पात्रीं तुझिया खेळ माण्डिले
किल्ले रचिले झरे खोदिले
वाद तयांस्तव तुम्बळ केले
उमेदिच्या परि वठे न पात्रीं कृतिचा त्या लवलेश.
कुठें तुझें जळ गिरक्या घेतें
कुठें शिळेच्या कवेंत घुसतें
खडकासङ्गें धडका देतें
शक्तियोग तो आजहि पढवी बळी व्हावया देश.
कहर गुदरला देशावरती
तें घेउनि शिर हातावरती
देह ठेविले धारातीर्थीं
वीर कुठें—खळभारमुक्त हा ज्यांनीं केला शेष ?

आज मावळे योद्धे गेले
धुळीस वैभवशिखर मिळालें
काळोखीचा सिन्धु उफाळे
देशभक्तिच्या अनन्यतेचा पिकावि पुन्हा आवेश.
सञ्चरतांना तीरावरती
अर्घ्य कितीदा समर्थहातीं
पडले असतिल तुझिया पात्रीं
समर्थदूती तूंच होउनी फिरवियला आदेश.
खनाळांतुनी वाहे खळखळ
पूर्वीपरि हें तव जळ झुळझुळ
मुक्या मनाची दारुण तळमळ
तुझिया गानीं मला ऐकुं दे दासांचा उपदेश.
आनन्दाचें या वनभुवनीं
स्वधर्ममन्दिर भव्य उभवुनी
प्राण वेंचिले ज्यांनीं ज्यांनीं
अन्तकाळच्या आशा त्यांच्या ठाउक तुजला क्लेश.
आज घोकतों इतिहासाचीं
पानें, पोकळ पोपटपञ्ची !
मिरास झालों उपहासाची
नसांनसांतुनि पुन्हा सळसळो त्या शौर्याचा त्वेष.
चीड अन्तरीं सदा भडकते
जिव्हेवरि परि वाणी अडते
लगाम काटेरी ही नडते
या दंष्ट्रांना पाणि पाज तव, तुटेल ती निःशेष.
हताश मृतवीरांची वाणी
खणखणते या तुझिया गानीं
अखण्ड घुमुनी राहो कानीं
तरीच कांहीं हातुन अमुच्या घडुन निघेल अपेश.

येरवडा, १७।११।२४

---

# देहाचा पूल

जाति–उद्धव

[ शिवाजीनें तोरणा किल्ला घेऊन स्वराज्यस्थापनेस प्रारम्भ केलेला पाहून विजापूर दरबारांतून एक मुसलमान सरदार त्याच्या पारिपत्याकरितां रवाना झाला. तो येत येत, पुण्याजवळ शिवापूर मुक्कामीं आला. ही बातमी शिवाजीस सायङ्काळीं पुण्यांत (पुनवडींत) समजतांच तो तीनशें मावळे लोक बरोबर घेऊन रातोरात चालून गेला. खानानें स्वसंरक्षणार्थ छावणीभोंवतीं खन्दक खणून त्यांत लाकडें पेटवून दिलीं होतीं; तो आगीचा खन्दक ओलाण्डण्यासाठीं चार मावळ्यांनीं आपल्या देहांचा पूल करून दिला; तेव्हां सर्व मावळे आंत घुसून त्यांनीं खानाचें पारिपत्य केलें.]

पूर्वींच्या इतिहासाचें उलटतां पान एकादें
फुरफुरति आमुचे बाहू जरि गुलाम झालों बन्दे
समशेर मुठींत न आज लेखणिचे करितों धन्दे
जी नसांनसांतुन बिजली
तेधवां सदा सळसळली
हतवीर्य आज ती झाली
म्हणुनि हें जिणें श्वानाचें कीं देणें हें नशिबाचें !

'हें नशिब आमुचें' म्हणुनी वीरांच्या वदति न वाचा
ते स्वतांच्याच रुधिरानें लिहिति लेख निज नशिबाचा
स्वातन्त्र्यसाधनीं देती मोबदला ते जीवाचा
ते स्वदेशकल्याणार्थ
लाथाडुनि देती स्वार्थ
मानुनी समर शुचितीर्थ
शौर्याची करिती शर्थ जणु कुरुक्षेत्रिं तो पार्थ !

पार्थाचे सुटती बाण त्यापरि हे धावति कोण
त्यांचिया रोमरोमांत सञ्चरलें कसलें स्फुरण
घनघोरहि काळोखांत दिसतात ज चकाकून

ते बच्चे नच भ्याडांचे
ते मराठेच हाडाचे
ते भोक्ते स्वातन्त्र्याचे
सह्यगिरीकुहरांतिल ते छावे जणु शार्दूलाचे

" उचलून विडा दर्बारीं सरदार विजापुरवाला
पुनवडीवरी चालून यावयास शीघ्र निघाला
पातला शिवापुरिं " ऐसे जासूद वदे शिवबाला
वृत्त हें ऐकिती कान
लागलें शिवापुरिं भान
तो वळवि आपुली मान
तों उभे राहिले भाले रिपुरुधिरास्तव तान्हेले

जय भवानिचा गर्जोनी धावले शिवाजीराजे
घेउनी जिवाचे दोस्त तीनशें मावळे सर्जे
ते किरण तयाचे दिव्य तो सहस्रकरसा साजे
स्थापक ते स्वातन्त्र्याचे
तारक ते जरिपटक्याचे
चालक ते शिवशाहीचे
गोपाळ ते मुकुन्दाचे कीं वानर हनुमन्ताचे

पातले छावणी जवळी ते काळ काम्बळीवाले
खानाचा चूर कराया आतूर अन्तरीं झाले
देखिले निखाऱ्यांनीं तों खन्दक ते रसरसलेले
पातलें भयङ्कर कोडें
विझवाया जवळि न ओढे
भिवविति न तयां ते खोडे
कल्पना स्पर्शली चित्ता जो तोच पटाइत चित्ता

ठाकुनी पुढे सकलांच्या जाहला शिवाजी वदता—
'जाणार काय माघारा ?' 'सरकार, काय हें पुसतां !'
'ऐका तर माझें आतां' 'जी, तयार हुकुमाकरितां'

'खन्दकावरी झणिं कोण
आपुले देह टाकून
मज देइल पूल करून ?'

निघतांच शब्द बाहेर जन निजले त्यावरि चार
त्यांचिया शरीरांवरुनी छावणींत सगळे घुसले
कण्ठनाल रिपुचे चिरिले रक्त तृषित भाले प्याले
विजयाच्या नव दीप्तीनें उरले ते सारे न्हाले

इतुक्यांत उगवला अरुण
तो गुलाल उधळी वरुन
आनन्दें भास्करकिरण

दर्शविती स्वातन्त्र्याचा उदयकाल साम्राज्याचा !
ती स्वातन्त्र्याची गङ्गा आज हाय आटुनि गेली !
ते चार मावळे गेले ती अवघी सृष्टी सरली !
परि आत्माहुतिची त्यांच्या ही स्मृतीच केवळ उरली !

इतिहास आज हा श्रवतां
वाटेल लाज जरि चित्ता
तरि मनन करावें आतां

कां स्वराज्य तेव्हां झालें ? कां स्वराज्य साम्प्रत नुरलें ?

चाफळ, ३।४।२१

# अजुन

जाति–अवनी

अजुन गगनचुम्बित हीं स्मारकें सभोंतीं
श्रीशिवनृपविजयगीत वितरती दिगन्तीं
शङ्ख दिव्य फुङ्किफयला
निद्रारत जागविला
मन्त्र महा नादविला
जेथुनी प्रभातीं

धर्मांचा मलिनपणा
स्वाभिमान शून्यपणा
उजळाया रविराणा
प्रगटला जिथें तीं

शिलालेख लेखाविण
कीर्तिध्वज वसनाविण
डिण्डिम कीं नादाविण
भासती जनां तीं

उज्ज्वल इतिहासाचे
पाठ देति नित साचे
आणि भाविकाळाचें
चित्र रङ्गवीती

ऊठ तरी नव तरुणा
श्रवुनि मूक हा करुणा
स्वातन्त्र्यालङ्करणा
आण हिन्दराष्ट्रीं

येरवडा, २९।३।२७

# बन्दिवान् गरुड

जाति—चिमणी

पडसी कारागारीं। गरुडा, घेशिल केंवि भरारी?
झुन्ज झुन्जुनी देवांनाही
तुवांच केलें त्राहि त्राहि
निनादती ह्या दिशांत दाही
अजुनी कीर्तितुतारी। गरुडा, घेशिल केंवि भरारी?

उचम्बळे जरि ती पूर्वींची
नसांनसांतुनि विक्रमवीची
नभा गवसणी घालायाची
लङ्गार परि पदिं भारी। गरुडा, घेशिल केंवि भरारी?

तव सञ्चारें व्योककपाटीं
विहगवरांच्या लपल्या कोटी
क्षुद्रहि साम्प्रत परि घुङ्गुरटीं
येंतिल डिवचू हारी। गरुडा, घेशिल केंवि भरारी?

जन्मजात तूं व्योमविहारी
जखडुनि पडसी परि गिरिकुहरीं
बद्ध होइ तव कर्तबगारी
स्थिति ही हृदयविदारी। गरुडा, घेशिल केंवि भरारी?

स्मरुनी घडि घडि गत विभवाला
देखुनि आल्या आपत्काला
जिणें मरणसें होइल तुजला
कोण विमोचनकारी? गरुडा, घेशिल केंवि भरारी?

येरवडा, २।११।२६

# वेलीच्या नव अङ्कुरा !

वृत्त—शार्दूलविक्रीडित.

वेलीच्या नव अङ्कुरा, करूं नको येथें प्रवेशास बा
येथें होत जमा न ही प्रतिदिनीं विद्वज्जनांची सभा
स्वेच्छा अल्पहि त्यांचिया नच मनीं या ठाकतां मन्दिरीं
दास्यामाजिं कसें तरी ढकलती आयुष्य ते भूवरी.

त्यांची सङ्गति ती कशास तुजला स्वातन्त्र्यभोगेच्छुला
दास्याचा जहरीपणा हिणवितो अत्युग्र हालाहला
ऐशा या परतन्त्रतेंत पळही जावो तुझा ना कधीं
जा जा जा परतूनि येथुनि सख्या, आहेस ना तूं सुधी ?

श्रेष्ठांच्या हुकुमावरून पडतें पाऊल मागें पुढें
नन्दीबैल शिरास हालवि जसा पाहून काठीकडे
स्वत्वाचे सुविचारही अशुभसे ज्यांना सदा वावडे
प्रेतांचा सहवास काय असल्या राया तुला आवडे ?

तेजोवर्धन तें घडेल न तुझें या पारतन्त्र्यामधें
कैसा स्वैर विहार घेशिल तरी जागेंत ऐशा मुदें ?
उच्छ्वासें करपून जाइल तुझी गा कोमलाङ्गा तनू
उच्छ्वासांत हवा विघातक तुला लोकांचिया या जणु

जो चण्डोल फिरे नभीं वरि वरी घेतो लकेरी मुदें
स्वातन्त्र्यांतिल सौख्य सेवुनि सदा तद्गायना तो वदे
त्याला काय गमेल वास बरवा सोन्याचिया पञ्जरीं
त्याचा घेइ विचार येइ मग तूं या येथल्या मन्दिरीं

केकांनीं मयुरांचिया दुमदुमे सारा जिथें पर्वत
तेथें जाउनि एकचित्त बनुनी केका रहा ऐकत
त्यांचा घे समजावुनी निजमनीं लक्ष्यार्थ तो कोमला
स्वातन्त्र्या त्यजुनी रुचेल मग ना येणें स्थळीं ह्या तुला

प्रेमाच्या करलालनांत रविच्या राहूनिया राजसा
वायूशीं गुजगोष्टि बोलुनि करी क्रीडा किशोरा कसा
घे कण्ठीं दवबिन्दुमौक्तिकसरा, वृद्धिङ्गत श्री करी
कल्पान्तींहि करूं नको जिवलगा, येणें इथें मान्दिरीं।

पुणें, १६।७।२०

---

## गुलामाचें गाऱ्हाणें

वृत्त–श्यामला

जू बैसलें मानेवरी
ह्या कर्दमी मार्गावरी
हाकावया जो बैसला
माया दयेची आर्द्रता
मागें रथामाजीं धनी
त्वेषें लगामा खेचुनी
घोण्ड्यावरी ठेचाळतां
उड्डीवरी सन्थावतां
विश्रामधोनी वाचवा
या हाकणाराच्या नसे
त्या बक्षिसाच्या पोतड्या
माझ्या तनूच्या चिन्धड्या
धावूं किती रे मालका ?
किंवा तुझी इच्छाच का

चाबूक हा पाठीवरी
चौखूर धावावें परि
सत्तामदें तो झिङ्गला
नाहीं तयाच्या अन्तरीं
थुङ्की तयाची झेलुनी
आसूड ने खालीं वरी
खाचेंत पायीं मोडतां
ते कोरडे अङ्गावरी
कर्तृत्व सारें दाखवा
पर्वा तयाची अन्तरीं
हासून मोतद्दार घे
कोणीहि पाहेना परि
होसी दयेला पारखा ?
जावें फुटोनी म्या उरीं ?

पुणें, १।६।२३

---

# प्रवासी जीवास

जाति—मोहिनी

पोंचशील केंवा जीवा स्वर्गीच्या शिवारीं ?
अजुनि कांहिं नाहीं झाली हाय तव तयारी !

शर्यतिची घटिका आली भरत अखेरीस
जाउं जाउं म्हणता गेला बुडायास दीस
अन्धकार खाया उठला भूमिला खवीस
घरांतून उठुनी अजुनी येसि ही न दारीं

दूर दूर दिसतीं शिखरें पुसट तीं दिगन्तीं
तींहि दिसेनाशीं होतिल क्षणभरें दिनान्तीं
मागुती उपाय न कांहीं करुनि मनीं खन्ती
ऐक इशाऱ्याची वाजे तटावर तुतारी

झडुनि झोप उठल्या झुण्डी लागल्या पळाया
पुकारीत इतरांनाही 'उठा हो पळा या'
कशी चेतना येईना परी तुझ्या पाया
ऊठ, काळ रोखुनि बसला बाण तव जिव्हारीं

बन्द एकदा झाल्यावर तेथलीं कवाडें
कोण तुझे पस्ताव्याचे ऐकतिल पवाडे
म्हणुनि चाल वेगें अपुलें सोडुनी खुराडें
मार्ग किती कापायाचा; अजुनि घे भरारी

येरवडा= ११।४।२६

# तुरुङ्गाच्या दारांत

वृत्त—पाण्डव दिडकी

वाढुं दे कारागृहाच्या भिन्तिची उञ्ची किती
मन्मना नाहीं क्षिती

भिन्तिच्या उञ्चींत आत्मा राहतो का कोण्डुनी ?
मुक्त तो रात्रन्दिनीं !

भक्तिला जो पूर आला वाढतो तो अन्तरीं
पायरीनें पायरी;

फत्तरांच्या या तटांनीं ओसरावा काय तो ?
सारखा फोफावतो !

अञ्जनीच्या बाळकानें सूर्यबिम्बा ग्रासिलें
मन्मनीं तें बिम्बलें

अन्य देशींच्या जनांचें चाललें थैमान जें
तें गिळाया मी सजें

अग्निकुण्डीं पाय केव्हां, कण्टकींही, केधवां
बन्दिखान्याची हवा

या विलासांमाजिं होई आमुची जोपासना
तेज नाहीं यांविना

हिन्ददेवी, गोन्धळी मी वाजवीतां सम्बळ
घालसी हातीं बळ

पेटलेला पोत हातीं स्वार्थतेलें तेवतां
नाचवूनी नाचतां

या दऱ्याखोऱ्यांतुनी स्वातन्त्र्यगीतें गाउनी
दावितां मी हिण्डुनी

आज आलों निर्भयें या मन्दिरीं विश्रान्तिला
मान्य झालें हें तुला

त्वत्कृपेचा सिन्धु माझ्या मस्तकीं हेलावतां
काय दुःखांची कथा ?
अग्निही वाटेल मातें चन्दनाचें लेपन
कीं सुधेचें सिञ्चन
शृङ्खला पायांत माझ्या चालतांना रुमझुमे
घोष मन्त्रांचा गमे
लौकरी स्वातन्त्र्यभानो ! भारतीं दे दर्शन
होउं तेव्हां पावन

मिरज-बेळगांव-रेल्वे, ३०।७।२२

---

## दैवास आव्हान

जाति–गोविन्द

डिवचुनि पाहि खुशाल दैवा, डिवचुनि पाहि खुशाल
दैवा, डिवचुनि पाहि खुशाल

दिसलें जरि कीं शान्त झोपलों घेउनि शाल-दुशाल
क्षणीं फणीन्द्रापरी उठूं जरि येशिल करुनी चाल
दैवा, डिवचुनि पाहि खुशाल

विलासलोलुप देह जाहले मानसही चवचाल
तरी सावरूं ढाल उपसुनी कराल करिं करवाल
दैवा, डिवचुनि पाहि खुशाल

सम्पुनि वर्षाकाळ साचला दिसतो पात्रीं गाळ
परन्तु पोटीं जिवन्त खेळे प्रवाह करित खळाळ
दैवा, डिवचुनि पाहि खुशाल

थर एकावर एक माजले राखेचे बहुसाल
फुङ्कर मारुनि पहा धगधगे आंत निखारा लाल
दैवा, डिवचुनि पाहि खुशाल

निष्प्रभ फत्तर लोह तसे जरि आज कण्ठतों काळ
काय चकमकीशिवाय फुलतिल ठिणग्या परि तेजाळ
दैवा, डिवचुनि पाहि खुशाल

फुशारकीचे बोल आमुचे असतिल हे बेताल
ओळख अमुची अम्हां यावया दाव रूप विक्राळ
दैवा, डिवचुनि पाहि खुशाल

निभावलों नच जर दिव्यांतुन निघेल सोलुनि साल
कशास मेल्यापरी जिण्याचा साङ्ग हवा साम्भाळ
दैवा, डिवचुनि पाहि खुशाल

आणि घातली विजयश्रीनें जर का कण्ठीं माळ
पर्वा नच भूपाल जाहलों वा उरलों कङ्गाल
दैवा, डिवचुनि पाहि खुशाल

येरवडा, १३।१२।२७

---

# इशारा

जाति–गोविन्द

नको करूं फुम्फाट पन्नगा, नको करूं फुम्फाट
बघ हा हिण्डत गरुड नभांत

देवांचेही दिपले डोळे जन्मजात तेजें
वन्द्य जाहला भासुनि सकलां अग्निदेव साक्षात्
बघ हा हिण्डत गरुड नभांत

पङ्खांचा फडफडाट होता डोङ्गर थरथरले
हादरलें जग, भेदरले सुर, काय तुझी मग वाट
बघ हा हिण्डत गरुड नभांत

कृष्णाचेंही गिळुनि सुदर्शन अगा कृष्णसर्पा
वज्र करी जो भग्न, ज्यापुढें देव जोडिती हात
बघ हा हिण्डत गरुड नभांत

सहस्र आले द्विजिव्ह बान्धव, काय कथा त्यांची ?
काद्रवेय ! तव एकाची मग दूरच राहो बात
बघ हा हिण्डत गरुड नभांत

अमृत चाटुन रे हतभागा विषवन्ही वमसी
भस्म तूंच होशील त्यामधीं तुझाच होइल घात
बघ हा हिण्डत गरुड नभांत

कुम्भ सुधेचा समरधुरन्धर जिङ्कुनिया आणी
दास्यविमोचन करि मातेचें हा ज्याचा पुरुषार्थ
बघ हा हिण्डत गरुड नभांत

येरवडा, ९।६।२६

---

## गाउं त्यांना आरती

वृत्त–पाण्डव दिंडकी

सङ्गरीं वीराग्रणी जे धैर्यमेरु सङ्कटीं
जन्मले या भारतीं
राष्ट्रचक्रोद्धारणीं कर्णापरी ज्यांना स्मृती
गाउं त्यांना आरती

कोन्दला अन्धार मार्गीं खाचखड्डे मातले
तस्करांनीं वेढिलें
सम्भ्रमीं त्या जाहले कृष्णापरी जे सारथी
गाउं त्यांना आरती

स्वार्थहेतूला दिला सङ्क्षेप ज्यांनीं जीवितीं
तो परार्थी पाहती

आत्मविस्तारांत ज्यांच्या देशही सामावती
गाउं त्यांना आरती
देश ज्यांचा देव त्याचें दास्य ज्यांचा धर्म हो
दास्यमुक्ति ध्येय हो
आणि मार्कण्डेयसे जे जिङ्किती काळाप्रती
गाउं त्यांना आरती
देह जावो देह राहो नाहिं ज्यांना तत्क्षिति
लोकसेवा दे रती
आणि सौभद्रापरी देतात जे आत्माहुती
गाउं त्यांना आरती
जाहल्या दिङ्मूढ लोकां अर्पिती जे लोचनें
क्षाळुनी त्यांचीं मनें
कोटिदीपज्योतिशा ज्यांच्या कृती ज्यांच्या स्मृती
गाउं त्यांना आरती
नेटकें कांहीं घडेना, काय हेतू जीवना
या विचारीं मन्मना
बोधितों की एवढी होवो तरी रे सत्कृती
गा तयांची आरती

येरवडा, ८।६।२६

# सुनीत

होतो स्पर्श हळूच कोठुनि तरी, हृत्तार कम्पाकुला
देते जागृति भावनेप्रति, जशी मन्दानिलें सिन्धुला
तेणें उद्भवती विचार, जलधीपृष्ठीं तरङ्गावली,
तत्त्वें सुन्दर मौक्तिकेंच जणु तीं ज्याच्यांत सामावलीं.
कांहीं आपण खोल ज्या दडविल्या नाना रहस्याकृती
शैवालापरि ज्यांवरी लगडल्या दुक्खासुखांच्या स्मृती
त्यांचे ते अवशेप लागति तदा काठास लाटांसवें
मोत्यावाचुनि शिम्पलेच बघतां नेत्रीं उभीं आसवें !

वाणीला दुबळीच निर्मिलि जयें तो धन्य वाटे मला
वाणी व्यक्त जरी करील हृदयें व्यापार आटोपला !
आम्ही ताजमहाल भव्य रचितों हा शब्दसम्पत्तिनें
ज्याचें त्यास रहस्य राहुनि जनां कारागिरी लाभणें.
हातीं घेउनि तोच तन्तु अपुल्या अर्थावरी गुङ्गतों;
तत्पूर्णत्व निजान्तरीं उभवुनी ओळी पुन्हा वाचतों.

पुणें, २५।३।२३

---

# आन्धळा झालों तर—

१

दुर्दैवें जर आजपासुन पुरा मी जाहलों आन्धळा,
बाळांचीं वदनें प्रफुल्ल सुमनें ज्यांचा जिवाला लळा,
ज्यांना पाहुनि कौतुकें विसरलों संसारिंच्या जाचण्या,
देवांच्या चिमण्या सुमूर्ति मिळणें कैशा पुन्हा पाहण्या ?
सौन्दर्यें भवतीं कितीक दिसती हीं चालतीं बोलतीं,
ज्यांच्या सात्त्विक चिन्तनीं मज रती, गुङ्गून जाते मती

तीं सञ्चारुनि आसपास मग ही ओसाड सृष्टी मला !
आकाशीं तळपून भास्कर मला अन्धार सामावला !
हे उत्तुङ्ग गिरी, अफाट नभ हें, हे रम्य अस्तोदय,
हे गम्भीर अथाङ्ग सिन्धु, गगनीं तारेहि तेजोमय,
मेघांच्या विविधाकृती बदलत्या, ते रङ्गही नाचरे,
पाहाया नच लाभतां रिझवुं मी कैसा मनाला बरें ?

'देवा, मृत्यु नको' असें विनविलें सौन्दर्यलोभामुळें;
'देवा, आयु नको' असें विनवितों होणें जरी आन्धळें.

ॐ ॐ ॐ

२

देवाच्याच मनांत येउन जरी मी जाहलों आन्धळा,
चित्तीं भीति न वाटते लव तरी, गाईल माझा गळा.
गाणीं गाउन नित्य डोळस जनां सन्मार्ग मी दाविन.
जे पान्थस्थ निराश, होतिल तयां सञ्जीवनी पाजिन.
ज्याचें दर्शन नेइ ओढुनि मना पापी विचाराकडे
आपोआप टळेल तें, मज गमे सद्भाग्य हें केवढें !
जें बीभत्स तसेंच निन्द्य जगतीं जें दृश्य घाणेरडें,
दुष्टांचेंहि मुखावलोकन तसें होईल ना यापुढें.
ज्यानें आपुलिया मना पढविलें धोण्डा हिरा सारखा
त्याला काय विषाद तो स्वनयना झाला जरी पारखा ?
काळाच्या पडद्यापल्याड भरलें तें पाहतां येइना—
ते हे दुर्बल चर्मचक्षु नसतां हानी न वाटे मना.

चित्रें रङ्गवितों, मना रिझवितों, अज्ञात मी पाहतों,
ते जे लोचन आंत खोल दडले त्यांनाच मी मानितों.

पुणें, ५।६।२२

# श्रीलक्ष्मीदेवीस—

ज्याचीं खोल तळांत जाउनि मुळें पङ्कांत विस्तारलीं
मानेला विळखा सदैव बसलें शैवाल घालूनिया
ज्याची मान जळीं क्षणोक्षणिं पडे वायूंत डोलूनिया
सूर्याच्या किरणांसवें सरतसें ज्याचें जिणें तोकडें
आहे हा इतिहास यापरि जरी देवी तुला आवडे
त्या पद्मावरती सदा विलसणें, त्याच्या गुणीं गुङ्गणें,
मालिन्यासह सेवणें क्षणिकता, पापांतही रङ्गणें,
साधूंनीं तुज मृत्तिकाच गणुनी यासाठिं धिक्कारिली.

धिक्कारोत मुमुक्षु; मी परि तुझी पूजा न अव्हेरिली.
आणी निर्धनता नरास पशुता वा मोल मातीपरी.
डोळ्यांना दिसतें मतीस पटतें सामर्थ्य लक्ष्मी तुझें
सद्भावें मग कोण साङ्ग तुजला पूजावयातें बुजे ?
त्वत्साह्यें सरिता वरी परतवूं, गाढूं गिरी सागरीं,
सिन्धूला घुसळूं, मुठींत मिळवूं दुष्प्राप्य रत्नावली.

येरवडा, २२।६।२३

---

# निर्धनतेस—

माझी निर्धनता ! न भीति वदतां माझी खरी मैत्रिण.
ये ये निर्धनते, सदोदित सखे मारूं मिठ्या आपण.
व्हायाचें तरि काय ? होइन घरादारास मी पारखा.
लोकीं कोणि न सोबती तुजविना; सारा पसारा फुका.
द्रव्याच्या पडल्या सरीवर सरी त्या होत तात्कालिक.
सम्पत्ती, कुजवी गुणा, मज नको ! तूं एक विश्वासुक

ऐशी पाहसि कां दुरून ? जवळी कां लाजसी यावया ?
ओठीं अमृत वा असो जहर तें मी वाञ्छितों प्यावया.
हातीं चौपदरी जरी तुजमुळें घ्यावी मला लागली
चारी मुक्तिसुखें म्हणेन तुझिया प्राप्तीमुळें लाभलीं
बाहूची करुनी उशी तरुतळीं झोपेन आनन्दुनी
गायी हम्बरतां मुदें विहरतां गातां गुराखी वनीं.
जीं जीं वाक्पटलांत आवृत मनें तीं तं खुलीं होउनी
मातें येतिल पाहतां तुजमुळें — तूं सत्यसंशोधिनी !

सांगली, २५।११।२२

# माळावरील समाध

ठावें नांव न वा पराक्रम तुझा अज्ञात वीरा जरी,
येथें सान तुझी समाध दिसते सङ्ग्रामभूमीवरी.
कीर्तीची तुजला असेल तरि का वीरा अपेक्षा अशी ?
व्हावें स्मारकही जगांत अपुलें कां वाञ्छिलें मानसीं ?
खड्गांचे रिपुच्या प्रहार अपुल्या झेलून देहावरी
कर्तव्यीं असशील देह अपुला त्वां ठेविला सङ्गरीं.
नेत्यांचा इतिहासही परि न तो नैश्चित्य पावे जिथें
शूरांचे तुजसारख्या कुठुन ते उल्लेख व्हावे तिथें ?
कोणी घालिति पुत्र-पौत्र न इथें येऊन पुष्पाञ्जली.
वारा पाउस ऊन खात पडली माळावरी ही खुली.
होते डागडुजी कुठून ? झिजली, कोठें निघाले चिरे,
हीचा कांहिं न मागमूसहि पुढें राहील कालान्तरें.
याचा खेद कशास ? सैनिक किती येथें समाधीविना
विश्रान्ती असतील घेत पडले, त्यांची कुणा कल्पना !

येरवडा, ७।९।२६

# मनःसान्त्वन

१

दुर्भाग्यें मजभोंवतीं पसरलीं कीं सर्पसेना उभी,
किंवा डाकिणि शाकिणी भिवविती दावून चेष्टा मला,
या डोहांत अथाङ्ग जीव पडला. घ्याया ह्ढालिङ्गनें
वेगानें सरसावतात सुसरी आनन्दुनी अन्तरीं.
जीवा, कां रडसी ? मनांत झुरसी, कां दुक्खनिश्वास हे ?
नाहीं स्वल्प सहानुभूति तुझियासाठीं कुणाच्या मनीं.
पायीं कण्टक ना खुपोत इतरां यासाठिं देहास तूं
मार्गी आन्थरसील, हे जन तरी देतील कांहीं दुवा.
सौख्यासाठिं नव्हे तुझ्या जग, परी तूं ह्या जगाच्या सुखा.
छाया शीतळ दाट केवळ तुझी यात्रेकरूंना हवी.
पानें तीव्र हिमें झडून पडतां नेतील जाळावया,
आद्यन्तावधि देह तूं झिजवितां सन्तोषती हे जन.

अन्यांच्या सुखसाधनीं सुख तुला, दुक्खांत दुक्खें तुला
या नेत्रें जग पाहतां मग तुला दुक्खें स्वताचीं कुठें !

२

'सौख्याची सदनासमीप सरिता माझ्या वहावी सदा'
काढावी वदनांतुनी प्रभुपदीं स्वार्थी अशी याचना—
ती कां ? हीं कुसुमें तुला शिकविती " आम्हां कृमी भक्षिती,
देहाची जरि होइ चाळण तरी आम्ही सदा हासतों "
'दुर्दैवी बहु मी' विचार असला थैमान घालों किती,
दुक्खांच्या निज गाउनी रडकथा आणूं नको आसवें.

कोणी बाण्डगुळें खुशाल तुझिया वाढोत देहावरी
आहे जीवित हें तयांस्तव तुझें चित्तांत हें वागवी.
स्वार्थाच्या पकडी जिवास बसल्या, स्वार्थें मती वेष्टिली,
स्वार्थाच्याच नियन्त्रणीं तव तनू राबावया लागली.
या स्वार्थी सुखसाधनांत जळती सौख्यें दुजांचीं परि
कैसें हें न दिसे ? विलाप शिरती कैसे न कर्णान्तरीं ?

नाहीं तें नसुं दे; नको पिळवटूं अन्यांस तत्साधनीं
आहे तें इतरांस दे नडतसे ज्यांचें तयावाचुनी

ॐ ॐ ॐ

३

हें नाहीं, मज तें नसेचि, असला पाढा सदा घोकिसी;
आहे जें प्रभुनें दिलें तुज, न सत्कार्यार्थ कां योजिसी ?
ऐकाया नलगे कुणासहि गड्या त्वन्न्यूनपाठावलि;
चाखाया तव शक्ति-युक्ति-सुफळें ही मण्डळी ठाकली.
हे काटे फणसावरी, अधवला देहीं पहा कोकिळा
नाहीं अप्रियता परी जनमनीं तन्न्यूनमात्रें कधीं
पुष्पांतील मरन्द भृङ्ग बघतो — ना पाकळ्या रङ्गित.
जें हातीं तव तेवढेंच जनता आहे सदा वाञ्छित.
न्यूनांच्या ठिणग्याच कां फुलवुं हृत्कापासराशींतल्या ?
ठेवूं कां जळवा उपाशि रुचि ज्या मच्छोणितप्राशनीं ?
नासूं देत पिकें उभीं चरतसे खिल्लार तेथें जर.
रक्ताचें पय आइच्या बनवि ती माया परार्थी खरी !

या कोणीहि, कितीहि न्या लुटुनिया जें जें जयांना हवें !
स्वार्था विस्मरुनी परार्थ शिकणें हें ध्येय माझें नवें.

पुणें, १।१२।२२

---

# सङ्ग्राम

आयुष्यीं समराङ्गणीं भडकला सङ्ग्राम घोरान्दर
नाहीं सोय तशी जरा सवडही मार्गे पहाया क्षण
केव्हां घाव कसा बसेल कुठुनी याचा नसे नेमही
डोळे यास्तव फाडफाडुनि हवें पाहावयातें पुढें.
पाहूं काय परन्तु? सर्व भरुनी गेल्या धुळीनें दिशा.
आहे शस्त्र करांतलें म्हणुनिया अश्रान्त हें नाचत.
कण्ठस्नान घडे रिपूस अथवा मित्रा कळेना मुळीं.
जाणाऱ्या निमिषाविना भरवसा नाहीं दुजाचा मनीं
केव्हां सङ्गर थाम्बणार नच हा अन्दाज येई कुणा.
कोणाला मिळणार हार विजयश्रीचा न हो कल्पना.
व्हायाचा अमुचा असेल पुढतीं धिक्कार वा गौरव
ऐकाया उरणार काय तरि मी या मृत्युलोकावरी?

देवा, चालवितों न शस्त्र परि मी कांहीं इनामास्तव;
हें तूं काय न पाहसी लढत मी माझ्या इमानास्तव!

येरवडा, ५।१०।२८

---

# ग्रामसिंहास

सिंहाचा जबडा करून उघडा जो दात मोजावया
घाली हात खुशाल सर्वदमना त्या दाविसी कां भया?
ध्येयाच्या अपुल्या पथीं स्थिर न जे बागूलबावा तया
दावावा अपुला तुवां; न उडवी सह्याचला वात या.
तूंतें सिंह म्हणावयास मिटले डोळे जनीं का तरी?
टाकी झाकुनि सिंहचर्म न गुणा, झाकी स्वरूपा जरी.

येते काय मृगेन्द्रता वसवसा अङ्गावरी भुङ्कुन ?
डौलानें पथ आक्रमी करिपती, पाही न तो ढुङ्कुन.
शुण्डा उन्च करून तोडुं सुमनें आकाशगङ्गेंतलीं,
शुण्डा घालुनि खोल सागरतळीं काढूंहि मुक्तावली,
त्यांचा गुम्फुनि हार अर्पण करूं श्रीशारदादेविला.
नक्राच्या न भयें हटूं, मग कसें श्वाना बुजूं रे तुला?
भीतींचीं भवतीं भुतें दिसुनिया येतीं सदा भीरुला;
निष्ठावन्त नरास एक दिसते देवी महन्मङ्गला.

येरवडा, २।२।२४

---

# गङ्गोदक

आहे दुष्टपणा जगामधिं, तसें सौन्दर्य ही सुष्टता,
दुक्खांच्या कढया इथें उकळती, सौख्याम्बुचेही झरे,
पापांचे पुतळे पदोपदिं उभे, साधूहि कोणी दिसे,
कोठें वृक्ष विदीर्ण पूर्ण वठला, कोणास पानें फुलें.
पाहोनी जगतांतली विषमता भाम्बावते मन्मती.
जातो धीर खचून पाउल पुढें मार्गांत टाकावया.
कोणी सोसुन घाव त्यांतहि परी निर्धार ना सोडिती;
कर्तव्यास्तव झुन्जती भवरणीं देवी अहिल्येपरी.
शान्तीच्या समवेत ती झळकते नेत्रीं तपाची प्रभा,
शीलाचा हृदयान्तरीं हिमगिरी, पीयूष वाणीमधें,
संसारांतहि राहुनी भिनविली संन्यस्तवृत्ती मनीं,
ऐशा येति दिसून कांहिं नलिनी दुर्दैवपङ्कामधें.
देई धीर तदीय दर्शन, लवे त्यांच्यापुढें मस्तक.
माझा राम रहीम येशु अवघा तच्छीलगङ्गोदक.

पुणें, ९।३।२५


---

# रत्नाकर

केव्हां क्षुब्ध, कधीं गभीरहि तशी सिन्धूपरी शोभसी
हो ऐरावतही हतप्रभ तुझ्या शीलद्युतीनें परि,
पाणीदार विशाळ लोचन तुझे रत्नेंच तेजाळ कीं
नेत्रांमाजि तुझ्या कधीं जहरही येई मला प्रत्यया
गालीं नाजुकता तुझ्या विलसते प्राजक्तपुष्पापरी
पाहोनी अधरास पक्व फळ कीं हें वारुणीचें गमे
बोलूं लागसि तेधवा स्रवतसे वाणी तुझी अमृत.
शोभे कोमल उन्च कण्ठ तव तो शङ्खाकृती गोंडस.
होता मानस हें तमोमय, तुझें चन्द्रापरी दर्शन.
होता व्याकुळ चित्त येसि जवळी धन्वतरीसारखी.
तूतें इन्द्रधनू दुरून गणतों, रम्भाच तूं सन्निधीं,
लक्ष्मी तूं गृहिं नान्दसी, भववनीं तूं कामधेनू खरी.

ही सारी गुणसम्पदा बघुनिया माझ्या मनीं सत्वर
येई एकच हा तरङ्ग – 'रमणी प्रत्यक्ष रत्नाकर'

येरवडा, ५।११।२५



# चमेलीचे झेले

जाति–चन्द्रकला

१

अधीर मन झालें, तुझ्या ही प्रेमाची करणी.
करमेना म्हणुनी निघालों आलों तव सदनीं.
झोपाळ्यावरती बसोनी झोके घेतांना
मी निज कवनाच्या घेतल्या प्रिय ज्या तुज ताना.
ऐकुनि नाद झणीं उठुन तूं माजघरामधुनी
सुन्दरसा झेला अर्पिसी हासत आणोनी.
मन माझें डोले त्याचिया गोड सुगन्धानें
झोपाळ्यावरती देहही डोले झोक्यानें
हिन्दोळ्यावरती प्रीतिच्या डोले मग जीव
विश्वचि डोलतसे होइ मग ही दृढ जाणीव
आली त्या सौख्यीं मला तों देवांची कींव
नको नको बघणें अतां ती स्वर्गांची शींव

गुच्छ चमेलीचा आणखी हास्य तुझें गोड
नन्दनवनिं ऐसे कुणी का पुरविल मम कोड ?

२

लगबग येवोनी झणीं तूं शिरतां मम सदनीं
पाठोपाठ कुणी पातला पाळत राखोनी
कळलें नच तुजला मला – मी बेफिकीर पुरता.
प्रमुदित मनिं झालों मात्र ती चाहुल तव येतां.
धीर निघायाचा कोठला ? उतावळी हाव !
तव गुच्छासाठीं घेतली तुझ्याकडे धाव.

खुणच हृदयाची द्यावया हात पुढे करिसी—
प्रणयाचा इन्दू लागला वाढूं प्रतिदिवशीं
ग्रहण तोंच लागे ठाकला हेर पुढें राहू
गोन्धळलों दोघे जाहलें जाऊं कीं राहूं
कोणी नच बोले खातसे ज्याचें मन त्याला !
कां देवा ! इतुकीं सङ्कटें चढत्या प्रेमाला ?

मिळला नच झेला आजला; हुरहुरला जीव.
होवो जग आम्हां उभयतांशिवाय निर्जीव !

## २

" काय करूं बाई, सम्पला बहर चमेलीचा.
मुळांतुनी मजला भरंवसा नव्हता मेलीचा ! "
तव दारावरुनी फिरकतां मनिं आशा धरुनी
पडली मम कानीं तुझी ही मृदु करुणावाणी
पाय थबकले तों जागच्या जागीं अकस्मात्
हाय ! वसन्तानें आपुला केला हा घात.
तीव्र मनोभङ्गें प्रीतिच्या अश्रूंचें पाणी
शिम्पिलेंस जरि तूं लतेच्या तळांत दिनरजनी
फुलेल ना फिरुनी, वसन्तासाङ्गाती गेली
अपुरी परि अपुली साखळी मधेंच ही पडली !
आण तुझे अश्रू साखळीवरि शिम्पुन ठेवूं
मग कैसे झेले सुकोनी जातिल ते पाहूं !

अश्रूंचा अथवा ओघुंदे शेवटास झेला;
पहा वसन्ता रे ! आमुचा हार पुरा झाला !

वाफळ, २३,२४,२५ मार्च २२

# शिलालेख

जाति–चन्द्रकला

मज पुढती पडले आज हे सुकून गेलेले
प्रेमें त्वां दिधले मला जे चमेलिचे झेले
उडुन सकल गेला यांचियामधला मधु वास
तव हृदयामधला जोवि त्या प्रेमाचा वास
काळ लोटला; हे जाहले हाय कान्तिहीन
लोचन ओठ तुझे दिसति जें मला प्रीतिवीण
परन्तु सुकलेल्या आज ह्या दलादलामधुनी
त्या कालामधली मूर्ति तव येत मला दिसुनी
आण-भाक–वचनें तुझीं तीं–विसर तुला पडला—
जपजाप्यासाठीं आज परि मन्त्रच तीं मजला
भव्य उभाविलेलें हाय तें मनोराज्य विरलें
झेले नच हे, त्या काळचे शिलालेख उरले

अनन्यता मम ही मानुनी पिसें, मला हास;
मुशाफरीमाजी जिवाला जीवन इतिहास !

येरवडा, २०।३।२५

---

# एक वर्षानन्तर

जाति–चन्द्रकान्त

१

प्रशान्त वदनीं शान्त चन्द्रिका घाली जणु झूल
फुले पौर्णिमा–प्रभातीस जणु चमेलिचें फूल
आवरल्या ओठांत उसळतें हसणें अनिवार
दन्तपङ्क्ति त्यामधुनी धवला विलसे भरदार
विशाळ लोचन करिती कीं हे स्वागत–सन्मान
हृदयमन्दिरद्वारावरती भालदार दोन

स्कन्धावरुनी पाठीवरुनी नितम्ब-भागास
मोरपिसाऱ्यापरी रुळरुळे मुक्त केशपाश

मन्दगामिनी काय चालसी तुडवित हृदयाला
शान्त जलाशयिं मन्द पवन करि तरङ्गावलीला

उषाकान्ति पावलांखालती येई धूलिकणा
तूंच पङ्कजा अशी शोभसी मनोहरा सुगुणा

ती तूं दिसतां हृदयीं येती कितीक आठवणी
मम सौख्यांची झाली होती तुझ्यांत साठवणी !

२

गतकाळावर नजर फिरवितां, चमेलिचे झेले
जरी वाळले, स्मृतिलतिकेवर पुन्हा फुलुनि ठेले.

फुलले परि ते सलूं लागले तीक्ष्ण जणू शल्यें,
विपरित काळीं बिसतन्तूंचे होती शर भाले.

झेल्यांची साखळी गुम्फिली त्या कवनांमाजीं
निष्फळ कवनें उरीं कवळणें नशिबीं ये आजी

प्रेम सम्पलें साम्भाळावें आतां तत्स्मृतिला
गन्ध निमाला जपणें आलें परि निर्माल्याला

ओघ आटला बसणें आलें त्या ओढ्याकाठीं
प्राण लोपला मिठी मारणें प्रेताच्या कण्ठीं

मूर्त रूप तव गडे प्रीतिचें हें तत्कालीन
प्रीति तुझी क्षणभङ्गुर ठरली, भाग्यच मम हीन !

निर्माल्याचा चुराहि तुझिया फुलेल नजरेनें;
त्या नजरेची केंवि याचना परि आतां करणें !

३

गतवर्षींचे आज उगवले ते दिन त्या रजनी
ऋतुमासांची अखण्ड चाले अशी पाठशिवणी

सृष्टिसुन्दरी पुन्हा आपुल्या दावी त्या लीला
आला किति हा बहर आपुल्या पुन्हा चमेलीला.

निसर्गदेवी ! तव भाग्याचा वाटतसे हेवा.
पाठशिवणिचा खेळ न अमुच्या नशिबीं कां देवा !

पुन्हा हासरा तुझा चेहरा आज वसन्ता हा
केविं साङ्गुं तरि करितो माझ्या अङ्गाचा दाहा !

गतसालाची स्मृति गुरफटली या वेलीभंवतीं
स्मृतिसान्निध्यें लतादर्शनीं दुक्खा ये भरती.

आवडती तव सखे चमेली प्रियतम अजुनि तुला
दुक्खावर डागण्या देइ ती आज परी मजला.

तुझी चमेली फुलली, माझी भाग्यलता वठली !
प्रेमसृष्टिमधिं पाठशिवणिची लीला कधिं कुठली ! !

४

झोपाळ्यावरि बसुनि चढविले उन्च उन्च झोके
विचार शिवला न कीं प्रीतिला येतिल कधिं धोके

खालीवरती हेलकावतां प्रीतीची नाव
प्रीतिसुधासागरीं रङ्गला दोघांचा जीव.

प्रेमसुधा प्राशुनी तेधवां होतों बेभान
मरणाच्या मुलखांत घातलें म्हणून थैमान

हा झोपाळा तसाच अजुनी इथें लोम्बकळतो
त्यावर बसुनी झोके घ्याया पाय न परि वळतो.

एकाकी मी, झोके घ्याया अतां न ये धीर.
कोसळतां लचकेल पुरी मम मानेची शीर

ते प्रीतीचे सोलच तुटले, आदळला जीव!
स्वर्गसुखाची आतां कोठुनि दिसेल तरि शीव?

झोपाळ्यावर झोके घेउनि देहाला रमवूं?
देहा चन्दन लावुनि आंतिल आग कशी शमवूं?

५

कुठें फिरावें भग्नमनोरथ जिवास रमवाया,
ठायिंठायिंचीं क्रीडास्थानें आडविती पायां.

हें वृन्दावन–गुम्फिलेंस तूं येथें मज हार;
प्रेमाच्या शर्तींत आज परि घेतलीस हार!

केळीची ही बाग–खेळलों इथें लपण्डाव,
मम दुर्दैवें आज साधिला परि पुरता डाव!

या कुञ्जामधिं तुज साङ्गितल्या कितीक नवल-कथा;
प्रेम भङ्गलें म्हणुन आज ही गातों कर्मकथा!

मी पोहाया गेलों बघुनी घाटावर येशी,
पोरपणींचे खेळ – भिजविलें तुजला दररदिवशीं.

डोहीं बुडुनी कितीकदा तुज अधीर मी केलें
बाळपणींच्या तव अश्रूंनीं प्रेम व्यक्त झालें.
क्रीडास्थानें त्याच पूर्विच्या सौन्दर्यें नटलीं
जगास विटला जीव, रम्यता तयास मग कुठली?

६

वियोग–वेळा ठरलि एकदां; दोन जीव दूर
होतांना तेधवां लागली मनास हुरहूर
कर्तव्याची कटु नियतीची कठोर घटिका ती
यावि न सत्वर असें इच्छितां प्राप्त होय निकटीं.
बघतां डोळे भरुन, धरवला धीर न अश्रूंना,
क्षण तोण्डें फिरवुनी पाहिलें एकामेकांना.
अधरांचें थरथरणें भाषा केवळ त्या समयीं
व्यक्त कराया सकल भावना ज्या स्फुरल्या हृदयीं
तोंच सम्पला तो क्षण, तिळभर असेल रवि ढळला;
परस्परांच्या हृत्कमलांचा मुखरवि मावळला !
मनें मिळालीं, देह जाहले दूर दूर दूर
विरहीं सावरि परि कसल्याशा आशेचा दोर
वियोग–घडिच्या चिन्तनांतुनी स्वप्न भावि घडिचें
अन्धुक तेव्हां दिसूं लागलें पुनर्मीलनाचें.

७

त्या स्वप्नावर जीव जगवला रात्रीच्या रात्री
अन्धारामधिं तुझी पाहिली सन्तत सुखमूर्ती.
मूर्तीच्या चिन्तनें आणिली विरहाला गोडी
विरहसागरीं बुडत्याला प्रियचिन्तन हो होडी.
दीर्घ भासलें अन्तर दिवसा तुझ्यांत माझ्यांत
एकान्तीं चिन्तनीं गमे तूं मत्सान्निध्यांत.
देहीं दूरावलों, मनानें परि एक्या जागीं.
हें मन उरतें कोटि योजनें व्यापुनि भूभागीं !

मनःसरोवरीं कितीक केल्या क्रीडा तव सङ्गें
निकट आज तूं, सौख्य परी तें कायमचें भङ्गे !

प्रेमाचा परतला ओघ तो, आशाङ्कुर जळला.
विरह पुरवता, योग भेटिचा कशास हा जुळला !

पुनर्मीलनीं स्वर्गसुखाची होती जी हाव
ठार बुडाली ! दैव घेतसे रसातळीं धाव !

८

सुहासिनी, हे अतां कशाला दर्शन तव देसी ?
अथवा झाकुनि घेतों लोचन – हृदयाच्या वेशी

तुझिया वदनीं शान्त चन्द्रिका – मला न सुखकारी;
आग धुमसते सदैव माझ्या हृदयप्राकारीं.

नेत्र नाचरे, गाल लाजरे, ओठ हासरे गे
स्वर्गावरती चालहि केली असती या मार्गें !

आज लाभलीं हीं भाण्डारें अलोट भलत्याला
श्रीमन्ताच्या पेढीवर हा सौदा तव झाला

प्रेमें केवळ सौदावणि ही करायास सजलों
प्रेमाचा पाडाव जाहला, लिलावांत फसलों.

गतसालीं तूं प्रेमपङ्कजा, पङ्कजाहि आज
श्रीमन्तीच्या परि तख्तावरि बससी मुम्ताज !

सुहासिनी, कां दर्शन देसी ? मी हा दरवेशी !
समोरुनी जा, झाकितोंच वा हृदयाच्या वेशी !

चाफळ, १६।१२।२२

# स्वप्नसौदामिनी

जाति–केशवकरणी

स्वप्नीं येउन गतकाळाचें स्वप्न पुन्हा दाविसी
मनीं चलबिचल कराया अशी ?
जखमेवरती बसली खपली, टवका कां काढिसी—
जिव्हाळी कां फिरुनी लाविसी ?
खेळ सम्पतां पडदा पडला शेवटचा एकदा
मुलामा धुतलासहि तूं तदा;
पडद्यामागुनि कां डोकावुनि आज फिरुनि पाहसी ?
मनीं चलबिचल कराया अशी ?

असुनि अधोमुख नजर मजवरी रोखुनि कां लाविसी ?
काय मीं समजावें मानसीं ?
चिकटतील का देठाभवतीं झडलेल्या पाकळ्या—
प्रीतिच्या तुटलेल्या साखळ्या ?
पडलेली निखळुनी, अम्बरीं चढे काय तारका ?
जुळे वा तुटलेली तार का ?
त्याच जादुनें भूषवुनी तनु कां पुढती ठाकसी ?
मनीं चलबिचल कराया अशी ?

पिवळें पातळ, पिवळी काया, पिवळी चाफेकळी,
नागिणी काय साधिसी कळी ?
गालीं लाली, अधरीं लाली, लालीं पायातळीं
आग का लावाया योजिली ?
उभ्या राहिल्या स्थानावरुनी हालसी न रतिभरी
ठाण का जिङ्काया मज तरी ?
नजरेंतिल निश्चलता मजवरि अस्त्राचे कीं सोडिसी
मनीं चलबिचल कराया अशी ?

जादुगारिणी ! दूर हो क्षणीं; थडगें उकरावया
घालसी हात बया कासया ?
गतप्राण जाहल्या प्रीतिच्या अस्थींना जुळवुनी
समाधी ठेवियली बान्धुनी
पूजा उध्वंसुनी, समाधी–विध्वंसा ठाकसी ?
जशी आलीस तशी जा कशी !
निलाजरी तूं, उलट हाससी नयनें वदनें कशी ?
मनीं चलबिचल कराया अशी ?

ॐ ॐ ॐ

ओठावरचे शब्द उडाले, उठला आलिङ्गना—
अगोचर झाली तों अङ्गना !

येरवडा, २९।८।२३

---

## लिलाव

जाति–दिण्डी

कैक वर्षें झुन्जून निराशेशीं
काळ एकाकी कण्ठिला उपाशी
गरीबाचा संसार जस झाला
आणि बाजारीं लिलावास आला

आणि सरकारी साङ्गुनी सवाल
ओरडाया तो लागला दलाल
जमा वाटेचे वाटसरू झाले
म्हणत कोणाचें निघालें दिवाळें

अधोवदना तों कानशिलें हातीं
धरुन बसलेली येइ दिसुन मूर्ति
मुखीं गाम्भीर्यासवें खिन्नता ती
करी सूचित जखडल्या जिवा ताती

घेत एकामागून एक वस्त
वदे बेलिफ 'चालली लई सस्त'
वस्तु जीच्या भोवतीं भावसिन्धू
कुणी लागे ती त्याज्य गणुनि निन्दूं

जिला जपलें नैराश्यवारणार्थ
कुणी घेई ती गणुनि कःपदार्थ !
सुधा स्त्रवली जीवनाधार झाली
तिचे धिण्डवडे निघुन हो टवाळी !

वास देव्हाऱ्यामधें करि सदा जी
हाय पडली ती पायदळीं आजी !
भुवनमोलाची स्मृती जीसभोतीं
मातिमोलानें भाव तिचे होती !

असें पाहूं लागलें विभव त्याचें;
उदक सोडी तो वरी आसवांचें.
असा सारा संसार फुकुन टाकी
आणि उरलें स्मृतिचिन्ह एक बाकीः—

भुवनगोलावरि मूर्ति चारुगात्रा
तन्तुवाद्या वाजवी अन्धनेत्रा.
मूर्तिकाराची कला मूर्तिमन्त
लिलावाला ती निघे हन्त हन्त !

दलालानें उचलितां लिलावाला
हात गमलें घातला काळजाला
तिची कैशी लागेल वासलात
तिला घेइल अपवित्र कोण हात !

तिचा देखुनिया दैवदुर्विलास
बसे दाटुन त्याचिया गळा फास
दाम कोणी बोलतां निन्द्य लोकीं
गमे लचके हृदयिंचे तोडितो की !

तोंच धवलाम्बरधारिणी कुलीना
इन्दु अस्तोन्मुख तेवि दैवलीना
कुणी प्रौढा अवतीर्ण हो समोर
करी सौदा होऊन तीन वार.

नेत्र विस्फारुन आणि मूढ चित्तें
कर्जबाजारी दृश्य पाहतां तें
बघुन मूर्ती पावली स्व-स्थळाला
हर्ष-शोकाचा तीव्र ये उमाळा.

आणि भिडला तो वार अन्तराला !
प्राण गेला भेदून अन्तराळा !!

येरवडा, २६।९।२७

---

## प्रीतिसङ्गम

जाति–चन्द्रकान्त

१

वाकवाकुनी बघसी कां तूं मागें फिरफिरुनी ?
खुणावि काय कचकलाप काळा कुरळा भुरभुरुनी ?
निरोप कसला पोंचवितें मज ही गाहिरी नजर ?
वाजवुनी कां कङ्कण करसी हा मञ्जुळ गजर ?
गुलाब गालीं अधिकाधिक कां खुलती टवटवुनी ?
अधरहि कोमल काय सुचवितो ऐसा थरथरुनी ?
स्कन्धावरुनी ओघळतो तव अञ्चळ फडफडुनी
प्रणयपत्रिका येइ काय ही मजला तुजकडुनी ?

भ्रूविलास हे करिती मजला हृदयीं व्याकूळ
काय चालले केवळ तव हे मजकरितां खेळ ?
तुझिया हृदयांतील – तुझ्या त्या देव्हाऱ्यांतील
देवमूर्ति का मीच ? सुधामय बोल झणीं बोल.

छे, खुळाच मी नव्हे काय तरि ? काय तुला पुशिलें ?
प्रेम कधीं का असें कुणाचें वाटेवर पडलें ?

२

तूं कोणाची कोण असा हा विचार मनिं येतो
मिलिन्द पङ्कजजनन कधीं का शोधाया जातो ?
नांव पुसावें काय तुझें तरि असेंहि मज वाटे
नांवावाचुनि सुगन्धसेवनसौख्य उणें कोठें ?
गांव कोठलें ? असेल खेडें; काय करायाचें ?
माळावरही तुळशीचें कां रोप न यायाचें ?

तुझी गरीबी व्यक्त होतसे शृङ्गारावरुनी
रीतभात तव चाल साङ्गते तूं जातां पुढुनी
कान्ति सावळी स्वरूप साधें दहाजणींसम हें
रूपाहुनि आगळेंच असतें जयास मन मोहे
मना ओढणी पुरी लागली प्रथमदर्शनींच
कोणाची मग ऐस गडे तूं, उच्च आणि नीच !

पूर्वजन्मिची असेल पटली ओळख जीवाला
मुकेपणांतच अनोळखीपण गेलें विलयाला.

२

करुनी वर पापण्या पाहसी निमिषानिमिषाला
कांहींही मिष पुरें होतसे प्रीतीविवशाला
नयनाला आपुला नयन जों भिडला भिडला न
नजर आपुली घेसी काढुन चटकन मजवरुन
उघड-झाप यापरी चालतां तुझ्या पापण्यांची
चालवितीं तव नयन कृती मम हृदय कापण्याची
जखम वाढते क्षणोक्षणीं परि कटाक्ष चुकवाया
वाञ्छितें न मन, उलट अधाशी तयांस सेवाया
शस्त्रास्त्रांच्या प्रहारांत डगमगेल रणधीर
तुझे कटाक्षप्रहार उलटे मज देती धीर
दृष्टिनिपातें जखम होइ ही – धन्वन्तरि हरला—
उपाय असल्या जखमेवरती शस्त्राविण नुरला.

गावा कां बडिवार वृथा त्या भीष्माचार्यांचा ?
कटाक्ष-शरपञ्जरीं वास हा मदीय हृदयाचा !

४

मिटल्या अधरीं हळूच हससी जवळुन जातांना
मीहि घेतसें मम कवनांच्या सहज हळू ताना
जसें काय पाहिलेंच नाहीं बतावणी करिसी
पुरुष-जातिचें बेगुमानपण आठवतेंहि मसी
'किती पुरुष बायका ग आल्या तुझ्या उदाहरणीं'
ठाउक असुनी मैत्रिणीस परि पुससी वरकरणी
हातांतिल ग्रन्थाचीं पानें चाळत मी चालें
खिसा चाचपुनि मधेंच बघतों जणुं कांहीं स्मरलें
चार पाउलें पुढें जाउनी बघसी मुरडून
कळे मला तें मीहि पाहतां मागें परतून
होतें दृष्टादृष्ट यापरी निमिषार्धीं एका
चालुं लागतों उधळुनि अपुल्या प्रीतिसुधासेका
नाटक हें सम्पणार केव्हा याच विचारांत
तूं शाळेमधिं मीहि जातसे हमालखान्यांत

५

चाले वेळीं अवेळींहि तव चिन्तन दिनरजनी
धन्दा रुचला हाच मनाला रमणें तव भजनीं
तुला चिन्तितों बसुनी विटलों असताना स्वजनीं
आपुलकीचें राज्यहि तैसें स्थापितसें विजनीं
स्वगुण विसरती लोचन रमतां तुझ्या चिन्तनांत
कटु दृश्यांतिल अप्रियपण मग शिरे न नयनांत

थकल्या पायीं जोम येइ नव मार्गक्रमणांत
खडकाळीला क्षणांत मार्दव येइ पुष्पजात
खरखरणारें ऊन भाजतें प्राणीमात्रांना
तुझ्या चिन्तनीं शरदृतू परि माझ्या गात्रांना
'उन्हाळ्यांतले दिवस लाम्ब हे' वदणें जनतेनें
सान भासती तुजविषयींच्या प्रेममग्नतेनें

महती ऐशी बिम्बग्राही हृदयदर्पणाची
मग्नतेंतही अमित पटींनीं जी वाढायाची

६

समय साधुनी आज निघे परि गाठ न कां पडली ?
नेत्रसुखें हि न दुष्ट विधीला कैची आवडलीं ?
तुझ्या भेटिच्या आशेवरती कामकाज चाले
अवघड कामहि तुझिया नादीं मज हलकें झालें
उत्साहाचे घोट पितों मी तुझ्या दर्शनांत
थकलेल्या प्रतिभेला फुटती पङ्ख पळाधींत
किरणशलाका एकच येतां कौलारांतून
भयाण अन्धारास निवळवी मना शान्तवून
धुरकट वेलीवरी फुले जरि एकच शुभ्र कळी
मोहकतेची वेलीवरती कान्ती ती उधळी
पर्णकुटीच्या सन्निध एकच जरी पाणपोई
वाळवण्ट मग अफाट कोण न ओलाण्डुनि जाई !

चुकामूक होणार – परन्तू ही मूर्ती आली
शोधशोधुनी शिणलेली ही नजर अतां धाली

७

चित्र कालचें स्वैरपणाचें चित्तावर उठलें
सङ्कोचितपण या चित्रावर आजच कां नटलें ?
रस्त्यावरती बोललीस तूं माझ्याशीं काल
लज्जेचा रक्तिमा दाविती आजच कां गाल ?
निर्भयतेची चमक नाचली काल तुझ्या नयनीं
नयन आज परि बुजुनी बसले भूवर कां खिळुनी ?
खुल्या मनानें काल अनावर किती हासलीस
दडपण त्यावर कां घालाया आज लागलीस ?
काल बोलली कितीक रसना जी स्वच्छन्दानें
अडखळते कां आज बोलते अस्फुट शब्दानें !
वायूनें उडविला तेवढा सावरला काल
आज अकारण चालविसी कां पदराचे हाल ? -
झालें जें वडिलांचें अपुल्या कुजबुजणें काल
तव लीलांच्या ओघाला तें होइ काय ताल !

८

मङ्गल झालें, जिवाजिवांचें सम्मीलन झालें !
अन्तःपट काढितां, लोपली बालिशता बाळे !
येइ मुलामा तुझिया लीलांवरि गाम्भीर्याचा
नभीं चन्द्रमा विलसे सरतां प्रभाव सूर्याचा
चिन्तातुर गाम्भीर्य यापरी वरुनी निज वदनीं
पहात होतिस वाट एकदा गवाक्षांत बसुनी

दिवेलागणी होउन पुरत्या तिन्हिसान्जा टळल्या
प्रीतिबलें तव मृदुल भावना हृदयीं खळबळल्या

मुखीं चान्दणें, प्रकाश पार्श्वीं दीपाचा घरच्या
बघुनि अशी तुज फिक्या मानिल्या मीं तारा वरच्या

येउनि दाराआड घेतलें बुचड्यांतिल फूल
दचकुनि वळतां तूं, आलिङ्गुनि तव हरिली भूल

प्रीतिसङ्गमीं मुकी प्रार्थना केली हृदयांत
'सुधाकरा ! संसारिं असा दे शुक्लपक्ष सतत'

पुणें, १३।५।२३

---

## फिरस्त्याचें गाणें

जाति—**चन्द्रकान्त**

विहरत होतों, नांव न ठावें मज त्या रस्त्याचें
सहज एकदा आलें कानीं गीत फिरस्त्याचें.

सत्तावन सालांत गुदरला कहर उत्तरेंत
मनोरथावर दुर्दैवानें कीं केली मात

रणाङ्गणामधिं हार खाउनी आला परतून
प्रीति-लताङ्कुर तों गेलेला दिसला करपून

भग्नमनोरथ असा दाक्षिणी कुणी एक राव
प्रेमगीत निज गात हिण्डतों हें गांवोगांव

हृदयाच्या तबकडीवरी उमटले ध्वनी त्याचे
गाउनि सकलां तेंच दावितों गीत फिरस्त्याचें

"तूं रस्त्यांतुनि जातांना तव गाठ गडे पडली
तुझ्यासवें बहु बोलाया मम जिव्हा धडपडली.
लगबग जासी, पाठपुरवणी करणें कुठवरती
पङ्गुपणानें होइ निराशा माझी परि पुरती
काय जाहलों महाग तुझिया एका शब्दाला ?
एक शब्द तव पुरवण्यास मम येई अब्दाला
एकवार तरि पहावयाचें होतें मुरडून
निर्दयतेनें तुझ्या हृदय हें गेलें चुरडून.
स्त्रीहृदयामधिं निर्दयता ती आली तरि कुठली ?
कुन्दकळ्यांतुनि घाणेरीची दुर्गन्धी सुटली
मखमालीचा गालिचाच जो म्हणती स्त्रीहृदय
कण्टकराशीसम कैसें तें झालें परि अदय
स्त्रीहृदयाला म्हणती सुमनें कीं सेवन्तीचीं
आज ठरावें फणी विषारी कीं निवडुङ्गाची
स्त्रीहृदयाचा विपरित अनुभव दिलास तूं कां गे ?
कठोर वर्तन हें कां करसी ? — कसल्या तूं रागें ?

दिवसयामिनी मला साजणी ध्यास तुझा लागे
कितीकदा तुज वदुनि दाविलें नव्हतें कां मागें ?
जातीचा अभिमान सोडिला, सोडुनि घरदार
तुझ्याचसाठीं नगरी झाली ही मजला प्यार
तव नांवानें भूषविली ही माझी तरवार
यापरि तव मी नांव घेउनी केले रणिं वार.
बेगुमान तूं, बेइमान तूं, तुला न परि चाड
कुटिलपणाचा स्वभाव तुमचा जातीचा द्वाड
इतुकी कैशी तरी गडे तूं खट्याळ मुलखाची
तुझ्या प्रीतिला कान्ती केवळ वरवर वर्खाची



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

तुझी आजची वागणूक ही आठवुनी सतत
दिसन्दीस हें हृदय हळुहळू जाइल गे झरत
वचनांशीं पुरतेंच विसङ्गत वर्तन तव असुन
विसरुन तें मी प्रेम आजवरि केलें विश्वसुन
असो तुला लखलाभ सदा ही तव कावेबाजी
कोठेंही मी राहिन तुझिया स्मरणावर राजी
'अशी एक ती मदीय होती प्रेमाची खाण'
निदान हें तरि हरून नेइल कोण समाधान ?
एकान्तामाधिं आळवून हें प्रेमाचें गान
करीन मी वनवासामाजी तुझें गडे ध्यान
जातांना सङ्गरास जो तूं ताइत दण्डांत
बान्धलास तो जिवापलिकडे जपला बण्डांत
चिन्तन तूझें, पूजन त्याचें, श्वास हेच मन्त्र
उरल्या आयुष्यांत न उरलें अतां अन्य तन्त्र.
आणि ठाकतां प्रस्थानाची वेळ, तदा नाम—
तुझें घेउनी, चिरशान्तीचें पतकरीन धाम"

ॐ ॐ ॐ

विहरत होतों – नांव न ठावें मज त्या रस्त्याचें—
सहज एकदा असें ऐकिलें गीत फिरस्त्याचें
हृदयाच्या तबकडीवरी उमटले ध्वनी त्याचे
गाउनि सकला तेंच दावितों गीत फिरस्त्याचें

ॐ ॐ ॐ

काय माधुरी फुटकळ असल्या करुण कहाणींत
कशास पुसतां – पुसुनि घाव कां बसतां हाणीत ?

येरवडा, ३।८।२३

# मनमोहिनी

जाति–मोहिनी

सदाकदा जातां येतां तुला पाहियेलें
आज दर्शनें परि तुझिया भाव नव उदेले.
देवघेव झाली पूर्वी क्षेमकुशलतेची
परी औपचारिकतेची आणि सभ्यतेची
खुल्या दिलाची नच किंवा खऱ्या जिव्हाळ्याची
स्मरणनिधीमधुनी दिन ते पाझरून गेले
परी आज हे क्षण हृदयीं शिलालेख झाले.

जिथें प्रभा सौन्दर्यांची असे फाकलेली
तिथें रसिकतेची दृष्टी सदा गुन्तलेली
रूपमती लीलावति तूं शोभसी मराली
रूपसम्पदेहुनि ज्यांचें जनन परि निराळें
आज दर्शनें तुझिया ते भाव नव उदेले.

आज नाहिं कारण पडलें प्रश्न-उत्तरांचें
भव्य लोक-सम्मर्दामधिं कोण गे कुणाचें
आपआपुल्या इतमामीं मग्न असायाचें
सहज तुझ्या परि नयनाला नयन हे मिळाले
आणि तोंच हृदयीं माझ्या भाव नव उदेले.

क्षणोक्षणीं वाढत होती वाहवा गुणांची
जणू उधाणाची वेगें लाट सागराची
जणू कला चढती राहे शुक्लसुधांशूची
तुझ्या बाजुला तों न कळत नेत्र मम पळाले
आणि त्या क्षणीं मम हृदयीं भाव नव उदेले

मिळे तुझ्या तन्मयतेमधिं साक्ष कौतुकाची
जणू आरती तूं धरिली स्नेहलोचनांची
जणू पुष्पवृष्टी केली अरुणकपोलांची

करुनि असें अभिनन्दन तूं मला गौरवीलें
आणि तोंच हृदयीं माझ्या भाव नव उदेले.

तुझ्या वाचिलीं मी भाळीं सनद या यशाची
जणू तुझ्या कम्पित ओंठीं माझिया स्तुतीचीं
गोड मूक कवनें स्फुरलीं प्रीतिच्या उषेचीं
कौल देउनी तूं जणु की धन्य मला केलें
आणि तुझ्या दर्शनयोगें भाव नव उदेल.

नाहिं काय जातां जातां वळुनि पाहिलेंस ?
नाहिं काय रेङ्गाळुन तूं उगिच परतलीस ?
आणि पुन्हां दारांतुन कां नजर टाकलीस ?
दार भविष्याचें समजूं काय खुलें झालें ?
आज दर्शनें तुझिया हे भाव नव उदेले.

येरवडा, १५।१२।२३

---

# प्रेमसमाधी

जाति–भूपतिवैभव

क्षण एक दोन तूं पाहिलेंस निरखोनी
माझीहि नजर ती भिडली तुझिया नयनीं

नयनांत आपुल्या काय साचलें होतें
येइना खरोखर वदुनि दाखवाया तें

तें दिसलें नयना तें पटलें हृदयाला
वदुं शकेल रसना कां हृत्सन्देशाला

विश्रांत साचली प्रीती अपरम्पार
तव झाली होती दृष्टीहि तदाकार

भिडविली परतुनी दृष्टी तव दृष्टीला
मज मीच देखिलें तींत खोल बुडलेला
इतुक्यांत लोचनें वळलीं खालीं मिटलीं
यावया वरी मज वाट अतां तरि कुठली ?
प्रेमांत बुडालों ऐसा । सर्वथा
मज विश्व बुडालें तैसें । सर्वथा
ही प्रेमसमाधी प्रेमसरोवरिं मजला !
प्राशुनी प्रेमपीयूष जीव हा निजला !

पुणें, २१।१२।२१

---

## शीलवती सुन्दरीस

वृत्त—गीतिका

पथिं चालतां पडतीं तुझीं किति सन्थ कोमल पाउलें
जन मागुनी पुढुनी तुला मुरडून पाहत राहिले
भरदार त्या बुचड्यावरी फुलला जरा बटमोगरा
सित पैठणी, लव आरुणी जरतारि शालु खुले बरा.

कुरळ्या बटा पवनासवें हळु नाचती निटिलावरी
स्वकराङ्गुली फिरवून सावरसी तयां वरचेवरी
लवतांच किञ्चित मान तों फिरतात लोचन नाचरे
चमके हिरा चमकींतला, मन मोहणार न कां बरें ?

कुलशील तूं धजशील दृष्टि न दृष्टिला भिडवावया
चुकुनी परी भिडतां परस्पर लागती चुकवावया
नयनां पिसें परि लागुनी मनिं होतसे कसलेंचसें
नच ते तुला बघती तसें, विधिहेतुला परि राजसे !

चळते मती, खिळते तुझ्यावरि दृष्टि, दोष न हा जनीं.
जानिता तुझा अपराधि ह्यास्तव जाब त्या बघ मागुनी
फिरतेस तूं भरल्या पथीं चुकतेस तूं सुळि हेंच की
जनदृष्टि ना कधिं सारखी; कुणि घातकी, कुणि पातकी !

विधि येउनी अवनीतलीं जरि आपुली बघता कृती
सुरलोक सोडुनिया मुदें नित वाञ्छिता तव सङ्गती
अथवा अगोचर राहुनी फिरतो गमे तुजभोंवतीं
म्हणुनीच आढळुनी न ये दुसरी अशी नव आकृती.

पुणें, १२।५।२३

---

## मनीषा

वृत्त—वसन्त

त्रिलोका तूंच सम्राज्ञी अनन्या रूपसम्पन्ना
'मनीषा आपुली बोला' जरी या बोलसी दीना
नको उत्तुङ्ग सोनेरी मला प्रासाद राजांचे
न साहे तेज नेत्रांना विजेच्या रोषणाईचें
दरिद्री दासदासींची धनार्थी ती नको सेवा
जयाचा वीट ये ऐसा नको तो साखरी मेवा
स्वतांच्या हुक्मतीखालीं नमावें सानथोरांनीं
कशाला पाहिजे ऐसें—नको स्वामित्व सैतानी
तुझ्या शब्दांस सामर्थ्यें मिळालीं कल्पवल्लीचीं
तरीही वैभवें सारीं नको मातें कुबेराचीं
रहाया तारकामेळीं मिळो तें भाग्य चन्द्राला
भुलोनी मी न जायाचा कधीं त्या सौख्यलोभाला
करूं दे राज्य सूर्याला जगन्माथां दिमाखानें
वितानाच्या कपाटाचे सुरांना आवडो खाने
निजूं दे शेषशायीला सदा रत्नाकरापोटीं
पडाया मोहिनी यांचीं सुखें हीं काय हो मोठीं ?

जरी तूं पाहिजे तें तें जनां या द्यावया शक्त
तरी हा भक्त तूझा गे म्हणे दे एवढें फक्त—
ललाटीं चन्द्रकोरीला शिवानें ठेविलें आहे
अरेरे, भाग्य दोघांचें वदा हें क्षुद्र का नोहे ?
तुझ्या भाळीं नभोगङ्गा तिथें मी होउनी कोर
रहाया वाञ्छितों, देणें तरी दे भाग्य हें थोर
जरी मी पात्र ना याला — न आशा ठेवितों याची
तुझ्या भ्रूनर्तनीं देई स्वरूपें स्वेदबिन्दूंचीं
तुला वेणींत गुम्फाया हवें ना केतकी पान
करोनी काञ्चनी काया मला दे तेंच कीं स्थान
परागाला मिळे जागा गुलाबाच्या कळीमाजी
कपोलीं तीळ होवोनी रहाया मी सदा राजी
फुलांचें पारिजाताच्या सुरांना मोल वाटावें
तुझे रत्नोष्ट हे कां मी न सेव्य श्रेष्ठ मानावे ?
तुझी सञ्जीवनी प्रीती, मला तूं देवयानीच
कचाचा मान दे मातें, नसें मी घातकी नीच
अहाहा, भाससी लक्ष्मी, तुझ्या त्या पावलांखालीं
मिळो दे जन्म पद्माचा, लिही हा लेख या भाळीं
क्षणीं तों शारदेऐसी मला तूं भासमान् होसी
सतारीचें मयूराचें तरी कां रूप ना देसी ?

विरूनी जाउं दे किंवा तनू ही अन्तराळांत
सुमाङ्गी ! वास लाभाया तुझीया अन्तरात्म्यांत.

येरवडा, २३।४।२४

---

# दुःशीला

देहाला मृदु मन्द गन्ध तुझिया, कान्तीहि शेवन्तिची
वाणी मन्जुळ, भाषणीं विनय तो धारा स्रवे प्रीतिची
डोळे मोहक – लोहचुम्बक जणू – मोठे बदामाकृती
पाहोनी तुजला मुनीन्द्र अपुलें वैराग्य धिक्कारिती.

रानांतून कधीं कधीं विहरसी सीता तदा भाससी,
चिन्तातों दमयन्ति कीं सखिसवें बागेंत जैं बैससी,
झोपाळ्यावरि उन्च उन्च अगदीं घेतेस झोके यदा
ती चित्रांतिल मोहिनी अवतरे हा भास होई तदा.

शुक्राची जणुं चान्दणी चमकते ज्योतिष्मती-भूषणा
येथें स्त्रीसमुहांत पाहुनि तुला येते अशी कल्पना.
ज्या ज्या आजवरी दिल्या सुकविनीं सौन्दर्य वानावया
त्या साऱ्या उपमा उचम्बळति या जिव्हेवरी यावया.

दुःशीला तुजला परन्तु घडवी कां बुद्धिदाता विधी ?
खातेऱ्यामधिं लोटितो अमृत वा सौन्दर्यगङ्गानदी !

* * *

'दुःशीला' म्हणुनी तुला मम जरी सम्बोधते वैखरी
त्वच्चारित्र्यविशेष एक मजला आला दिसोनी परि
प्रेमाची सरिता अथाङ्ग तुझिया वाहे सदा अन्तरीं
अम्बुप्राशन तीमधील मिळणें ही भाग्यमत्ता खरी
प्रीती स्त्रीहृदयास भूषण खरें, प्रीती जिवा जीवन,
प्रीती हेंच जगत् तयांत रमणें – ना ध्येय त्यावाचुन

प्रीती दुःसह यातनांस बसवी सौख्यासनासन्निध
जिङ्काया सुरभी, सुधा, सुरलता प्रीतीच पुष्पायुध.
केलें प्रेम तुवां जयावरि तया हें वर्तनीं दाउनी
कायावाङ्मनसा तदीय भजनीं दासी पुरी होउनी
स्वत्वाला विसरून जासि, पुरती होसी तदाकार तूं
त्याचें भाषण वेदवाक्य तुजला, सेवा तयाची ऋतु.

प्रेमाच्या प्रभुपूजनीं परि तुझी कीं जाहली वञ्चना?
किंवा कातर भावना तव तुला देई अशा शासना?

ॐ ॐ ॐ

व्हावी कां तव वञ्चना? विकसते का चम्पकीं धोतरी?
आम्राच्या मधुमञ्जरीस लटके का बेलवाङ्गें तरी?
ऐसे येउनि दाखले मम मनीं एकावरी एक ते
होता जाबजबाब, निर्णय मती अन्तीं असा कल्पि —
एकामागुन एक देव करुनी जे जे तुवां पूजिले
झाले धार्जिण ते तुला न, ठरले धोण्डे भले थोरले.
प्रेमाचीं तव वायनें विफळ तीं झालीं, जशी रासभा—
गीता, हारच मर्कटास अतुला ज्यामाजि रत्नप्रभा.
होता विन्मुख एक देव, भजणें अन्यास, — त्यावाचुनी
कोठें स्तब्ध न हो तुझें हृदय तें — ही खोड त्यालागुनी!
ब्रम्ह्यानें हृदयास ज्या घडवितां प्रेमेंचि ओथम्बिलें
अन्तर्दृष्टि कशी तयास न दिली? कां न्यून हें राखिलें?

प्रेमाची प्रभुजी, नका करवुं हो ऐशी कधीं वञ्चना
किंवा त्यास अनन्यताहि शिकवा पावेल जी भङ्ग ना!

येरवडा, १३।१४।१५ मार्च २४

# कलङ्किता

जाति—चन्द्रकला

[ पुरुषाच्या पापाचाराला समाजानें सवलत ठेविली आहे. पण पुरुषाच्या फसवेगिरीला अज्ञानानें वळी पडलेली भोळी अबला दयेला आणि प्रेमाला मुकून समाजांतून बहिष्कृत होते. बहिष्कृत वञ्चितेला भावी काळ निष्पाप आणि सुखमय असा प्राप्त करून देणें समाजधुरीण पुरुषाकडेच जोंवर आहे तोंवर पुढील काव्यकथेंत दाखविल्याप्रमाणें धीराचे धर्मात्मे पुढें यावयास नकोत काय ? अधःपात दयेनें टळतो, कडक निर्बन्धांनीं टळत नाहीं; आणि 'साधूंनाही पूर्ववृत्त असतें व पापी मनुष्यांसही ऊर्जितकाल येण्याचा संभव असतो' हें विसरून चालावयाचें नाहीं.]

" कां तिचियावरती जीव हा लोभुनिया गेला ? "
सवाल कां करितां ? मनीं मीं विचार नच केला.
खोडसाळ हसणें प्रदर्शन मोहकतेचें तें
घालुनि भूल मना माझिया होइ काय जेतें ?
कीं काळा कुरळा रेशमी तिचा केशपाश
खेचुनि नेइ मना घालुनी अपुले दृढ पाश ?
नजर जादुची ती, कमानी भिवयांच्या किंवा
मूढ मला करुनी लाविती निज नादीं जीवा ?
वीणाझङ्कृतिसे तिचे कीं लाडिक वच गोड
फुलाविति वठलेलें माझिया हृदयाचें खोड ?
कीं बौद्धिकतेची चन्द्रिका अशी तिची मुद्रा
प्रीतीची भरती आणवी कीं हृदयसमुद्रा ?

नव्हे जिन्दगी ही तिची, कां उगाच मग पुसतां ?
सम्भवनीय नसे प्रेम कां सुन्दरता नसता ?

२

गुपित गोष्ट उघडी करूं का? हृदयीं चरकाल,
ऐकुनि ती मजला कुशब्दें मग धिक्काराल.
होय, साङ्गतों मी तेंच कीं चारित्र्यीं तिचिया
कलङ्क मज दिसला आणि तो दिसत असूनीया
हात पुढें केला दयेनें; चुकलेल्यावरती—
चुकी उगाळुन का करावी लाथांची वृष्टी?
पौरुष काय तरी घालणें घावावर घाव?
कां अबलत्वाला मिळावा जगावरि न वाव?
सुख नशिबीं नुरलें, सुखीं मग हास्य तरी कुठलें?
निन्दाशर सुटले, जीविला मन पुरतें विटलें;
तया शान्तवाया, मिळाया भविष्य निष्पाप
दार खुलें केलें, घेतलें घरांत हें पाप.

कां तिचियावरती जीव हा लोभुनिया गेला?
प्रश्न कशास हवा? जगानें चन्द्र कधीं त्यजिला?

३

रडूं नको बाळे! तयाची अतां नको खन्त.
पापी पूर्वींचे — आजला जे साधूसन्त.
वसिष्ठ आद्यमुनी तया जन लोटाङ्गण घाली
चळलेलें होतें तयाचें मन एका काळीं.
पुराणांत असल्या शहाण्यासुर्त्यांच्या गोष्टी
पावन तन्नामें जनांच्या आज परी ओष्टीं.

पूर्व-वृत्त पाही कुणी का त्या वाल्मीकाचें ?
परि रामायण तें जाहलें दैवत लोकांचें !
पश्चात्तापाग्नीमधोनी पावन सीता तूं
तुज हातीं धरितां मनीं या येई नच किन्तू.
तव नयनांपुढच्या निवारावया तिमिरपटला
समोर असतां मी, अश्रुचा ओघ न कां हटला ?

'नसेल जो पापी तयानें अम्हांस शापावें'
हेंच निन्दकांना वजावुनि आपण साङ्गावें.

४

पुरुषी भुलथापा भुलविती भोळया अबलांना
फशी सहज पडतां तयांची काय वदूं दैना !
न्यायाचा काटा जेथला पुरुषांच्या हातीं
चौकशींत असल्या होइ तो सहज पक्षपाती.
पन्च महाजन ते निवाडा देती पापाचा
दगडाधोण्ड्यांनीं साङ्गती ती कुलटा ठेचा.
कलङ्किता चरके ऐकुनी कठोर ही शिक्षा
खिस्तपदीं रिघुनी मागते न्यायाची भिक्षा
दीपच जनतेचा आणखी अनाथांस वाली
खिस्त पुढें सरुनी बोलला सकलां त्या काळीं—
"प्रथम, न जो पापी तयानें मारावा धोण्डा"
ओशाळुनि सगळे पाहती टकमक मग तोण्डा.

एक एक आधीं सनातनधर्मरक्षका हें;
तव कर्तव्याचा पहा मग रथ कोठें आहे.

५

बोल निन्दका रे, पताका तव पुण्याईची
काय कार्य करते ? साङ्ग तरि तिची किती उन्ची ?
उन्च डोलकाठी वितानीं सन्तत फडफडते
परि भगव्या रङ्गा कशाची दुर्गन्धी येते ?
चान्दीच्या मूर्ती, चान्दिचा चकपक देव्हारा,
कुणा भाविकाच्या दक्षिणेंतुनी थाट सारा ?
अहोरात्र जळती चान्दिचे हे नन्दादीप
त्यांत कृष्ण कृत्यें बुडालीं तव आपोआप.
ठरोत जरि ठरलीं विधानें साफ चुकीचीं हीं;
साधो, साङ्ग तुझी काय परि करिते पुण्याई ?
तव पुण्याईनें मिळेना चुकलेल्या शान्ती
तव संन्याशाच्या व्यर्थ तरि विभवाची कान्ती !
'कां तिच्यियावरती जीव हा लोभुनिया गेला ?'
कुणी न अधिकारी कराया प्रश्न मला असला.

६

तिजवरि मत्प्रीती, माझियावरी तिचें प्रेम
पूर्व जन्मिचा मी मानितों हा नेमानेम.
परि फसली, भुलली, कलङ्कित झाली, तिज वाली—
कोणी नच उरला, धरित्री तिज खाया उठली.
सजल तिच्या नेत्रीं कांहिं तों दिसलें, मज पटलें;
मन माझें द्रवलें, सहाय्या आवेशें उठलें.
तेज कुणी विहरे माझिया आंत कोन्दणांत
आज्ञापी मज तें आणि मी घेइ तिचा हात.

काहिं तरी नव्हतें आणि जें हवें हवें वाटे
तिजपाशीं मजला मिळालें अखेरीस परि तें.
जीवितार्णवीं जें भडकलें तुफानांत तारू
काय खलाशानें बन्दरीं नयेच हाकारूं?

कां तिच्चियावरती जीव हा लोभुनिया गेला?
सवालास मसुदा समाजा! हा ऐसा लिहिला.

येरवडा, २३।२४

---

## पावन झाल्यावर

वृत्त—शार्दूलविक्रीडित

मी पापी कळतां तुम्हांस, मज कां धिक्कारितां सज्जन?
पश्चात्ताप नव्हेच काय लवही पापावरी मार्जन?
जीं पापें बुरख्यांतुनी विहरती त्यांचा खपे वावर
पापी निन्द्य ठरे जनांत फुटली पापास वाचा जर!

केलें पाप चुकून खोल परि तें सद्वर्तनीं गाडिलें
सान्निध्यीं असतां तुम्हां स्थळ न मीं शङ्केस कांहीं दिलें
देहें आचरिलें कुकर्म लव ना आल्या दिसापासुनी
चित्ताची शुचिता तुम्हां पटविली सद्भावसम्भाषणीं

दुर्दैवें मम भूतकाळ कळुनी येतां तुम्हां आजला
कैसें लोटुनि दूर दूर सुहृदा देतां मला एकला
आहे पङ्कज का म्हणून कमला देती कुणी त्यागुनी?
कां सद्यःस्थिति पाहतां निरखुनी त्या भूतकाळांतुनी?

होतें काल गढूळ तें निवळलें पर्जन्यपाणी जर
कां शोधा मग की पयोद बनले तापूनिया सागर?
होतें लोह, परी सुवर्ण तुमच्या झालें करस्पर्शनें
शुद्धाला मलिनत्व कां डकवितां पूर्वाश्रमींच्या गुणें?

पुणें, ११।४।२५

---

यशोधन

# पेन वेळीं—

दाताच्या करुनी कण्या विनवुं मी राया किती रे तुला
  नाहीं मागत राजसा मज तुझी ती शेज किंवा उशी
  पोतेरें बनुनी घरांत तुझिया राहावया मी खुशी
पायीं भीक बटीक मागत – नको बाजूस लोटूं हिला !
आणाया वळुनी घरा कितिकदा गायी न आल्या मला
  तेव्हां काम दिलेंस हें करुन तूं, मीही दिली बक्षिसी.
  आतां होउन मीच गाय, वळुनी अप्सूक येतां अशी
देसी हाकलुनी कशी उधळुनी माघार रानीं मला !

दोपारां जरि नीज ये शिर तुझें माण्डीवरी घेतसें
लाडानें कुरवाळिलें मुख जवां घामांत नामी दिसे
  तूं झाडावरती मला चढवुनी मागून येसी वर
  दोघेही किति घेतसूं बसुनिया झोके डहाळीवर
मी झाडावरुनी सख्या उतरतां झेलून घेसी मला
येतां 'कायमचीच झेल' म्हणुनी होसी कसा बाजुला ?

येरवडा, ५।६।२४

---

# घर

जाति–उद्धव
अन्तरा व मेळ 'नृपममतें'तील

" लइ मानस अमुचा, द्यावी   आपल्या घरीं ही पोर
पर शङ्का येउन कांहीं   घेतें हें मन माघार !
पोरिला हौस मोत्यांची   ती तुम्ही कशी पुरवाल ?
हा हेत पडावी कीं ती   ज्या घरीं माणकं लाल.
  बोलतों
    असूं द्या माफि
      करा दिलसाफि
  असावें चोख   व्यवहार तरी बिनधोक ! "

" ठेवितां न पोटीं किन्तू पुसलेंत – लई आवडलें !
धनदौलत घ्या देखून कांहींच नाहिं लपलेलें.
पडवीला कणगी पोतीं मोतीं त्यांमधि बिनमोल
दावणीस गायी बैल त्ये अम्हां हिरे अन् लाल.
दरसाल
पिकें येतात
खाण शेतांत
तीच सोन्याची "

बसलीच गांठ जन्माची.

चांफळ, १२।६।२८

---

## न्याहारीचें गाणें

मुद्रिकेंतील समपङ्क्तिसारखो

न्यारिचा वकुत व्हाईल मैतरणी बिगिबिगि चाल
नाङ्गूरसुटीच्या आंत पोंचाया होवं ततं
सोडितिल हात बैलाला धुण्डील नदर कोनाला
नदरे न पडन् मी जरी
जाईल मर्जि ग तरी
उरिं रुतल माझ्या सुरी
नग नग गमात्रूं येळ मैतरणी बिगिबिगि चाल

लइ वाडुळ जुपि झाल्याली असल्याल समदिं शिणल्यालीं
शिण जाइल न्यारि करून अन् साङ्ग कुना देखुन
त्यें खुलें तोण्ड घामानं भरघोसहि कणसाहुन
पाहिलं जरी रोज मी
तरि हौस न होई कमी
फिरफिरुन पगायास मी
व्होतसें मनिं उतायीळ मैतरणी बिगिबिगि चाल

येरवडा, ७।९।२५

---

# घात

जाति–रसरङ्ग

चला घात आली। बिगि कराया व्होवत पेरे ॥ ध्रु०॥

मिरिग् लागला छान
गेलं भिजून रान
देवकिर्पेचं सुटलं वारं ॥ चला०॥ १ ॥

पघा चाडं कुरी
कसा ओटी पुरी
काढा राजा–सुभान्याला म्होरं ॥ चला०॥ २ ॥

घरीं झाका मडं
पुरं करा रडं
उंद्या बघूं कियाकर्म सारं ॥ चला०॥ ३ ॥

अतां कराया खन्त
आहे कुटं उसन्त
बान्धा पचङ्ग, तयार व्हा र ॥ चला०॥ ४ ॥

जरि हुकल घात
तरि पुराच घात
रडत्याल पोरं गुरं–ढोरं ॥ चला०॥ ५ ॥

येरवडा, २।१२।२८

# प्रेमाची दौलत

जाति–भूपतिवैभव

ही तुझीच वाकळ म्हणुनि मला लै प्यारी
पितांबरी आवड समद्याहुनि रे न्यारी
झालींत लक्तरं तरीहि मजला गोड
[ पुरवितें प्रेम पाहिजेल त्याचें कोड ! ]
ही तुझीच थाळी म्हणुनि चाटते राया
मज लागिर झालं म्हणती आयाबाया
हा तुझाच पावा, मोरवेलिची काठी
झोपते घेउनी रोजच पोटीं–पाठीं
हें तुझ्या डोइचं जुनं जरी मुण्डासं
कुरवाळित बसत्ये, होतं माझं हासं
हें तुझ्या अङ्गचं जपुनि ठेविलं कुडतं
ही दौलत माझी – येडच त्याचं जडतं
माझिया कोण जो पोटीं येइल
तो जवा बापई म्होरं होइल
ह्यं घालुन त्याला पाहिन डोळं भरुनी
मग खुशाल तिरडी बान्धा माझी कोणी

येरवडा, १।९।२३



# एक कहाणी

## स्थानभ्रष्ट फुलास

'आहे विश्वच नन्दनोपवन हें' ह्या गोड तन्द्रीमधे
होतों चालत मन्द मन्द गतिनें मार्गांतुनी मी मुदें
तों कोणी कलिका पुढेंच दिसली, वृत्ती तिनें वेधिली
बाला नाजुक, कङ्कणें रुणुझुणू हातांत झुङ्कारलीं
अम्बाडा, घन कृष्ण कीं, उतरता मानेवरी सैलसा
ताजा त्यावरती गुलाब खुलला, सम्पूर्ण बालार्कसा
बालेच्या वदनाकृतीस सुचवी, तों कोसळे तेथुनी
तारा जेवि नभांतुनी, अहिमणी वा मस्तकापासुनी
त्यातें पाहुनिया अनावर मनें भृङ्गापरी धावलों
कोणी पाहिल काय की म्हणुनिया चोरापरी थाम्बलों
त्याला पायदळीं तसें दवडणें मानेच ना मन्मना
माझी मी दडपू कशी रसिकता? कैशी मनःकामना?
घेवोनी हरितों अधोगति तुझी पुष्पा स्ववृत्तीबलें
स्थानापन्न तुला करूं न शकतों, मद्भाग्य ना तेतुलें

पुणें, २३।८।२२

---

## तूं गेलीस समोरुनी

तूं गेलीस समोरुनी मज कसें झालें कसें साङ्गुं तें
काव्याचे रचुनी प्रबन्ध बघतो आतां परी मागुतें
अर्पावें चरणीं तुझ्या हृदय हें नान्दे मनीं लालसा
पायांना परि पारतन्त्र्य अडवी थण्डावती या नसा
ऐकायास हपापले श्रवण हे प्रेमार्द्र वाणी तुझी
ज्या भाग्यें मज वाटतें न उरली स्वर्गीय सृष्टी दुजी

झाल्या आज परन्तु दोनच खुणा सन्दिग्ध कांहीं तरी
शब्दांच्या भरल्या नद्या परतल्या येऊन ओठावरी
डोळ्यांना दिसली जरी निसटती मुर्ती तुझी सावळी
राहे व्यापुनि बिम्ब मात्र हृदयीं मद्भावगङ्गाजळीं
हातीं चन्द्र न, चन्द्रबिम्ब परि तें सन्तोषवी बालका
माझी आस दुणावते घडिघडी तूते बघाया फुका
आयुष्यांत पदोपदीं विषमता येतां अशी प्रत्यया
कोटिक्लेशविदीर्ण हृत्पट चुरा होऊन जाई लया

येरवडा, १८।६।२३

---

# प्रेमाचें स्मारक

पुष्पांचा रमणीय गुच्छ सखये तूं जो दिला धाडुनी
दावी तो मज चारुता मधुरता जी तूझिया आननीं
झाला प्यार फुलांहुनी मम मना हा भास गे सुन्दरी
त्यासाठींच जपून ठेवुनि दिला, निर्माल्य झाला जरी
जातां गोड सुखें जिरूनि सगळीं ह्या थोर काळोदरीं
देती तत्स्मृतिलेख भग्न हृदया दुक्खार्णवीं माधुरी
व्हायाला गतगोष्टिची कधिंकधीं जाणीव काळान्तरीं
प्रेमानें जन ठेविती उभवुनी हीं स्मारकें भूवरी
माझ्या आणि तुझ्या मनांत वसते जी एकमेकास्तव
प्रीती आज तिचें स्वरूप गमतें हें मन्मना वास्तव
झालें स्वप्नच सौख्य हें तरि पुढें ह्या वाळल्या पाकळ्या
एकान्तीं पसरून शान्तविन मी माझ्या मना पोळल्या
नेलें हेंहि हिरावुनी जरि कुणी त्वत्प्रीतिचें स्मारक
मृत्यू विश्वसखा तरी विरहिं त्या होवो मला तारक

चाफळ, २१।३।२२

## पूर्तता

पूर्वेच्या क्षितिजावरी पसरली लाली उषेची नभीं
शय्यामन्दिर सोडुनी प्रगटली द्वारीं कुमारी उभी
होते कुन्तल मोकळे विखुरले स्कन्धीं कपाळीं तसे
ओचे खोवुनि सावरी पदर ती, गालीं विराजे हसें

निद्रेची नयनांत धुन्दि भरली, छाया तिची आननीं
धुन्दी मुग्धपणांतली तनुवरी खेळे मनोल्हादिनी
ती धुन्दी चरणीं गती तिजमुळें मन्दावलेली दिसे
ऐशी मोहक धुन्दता बघुनिया लागे न कोणा पिसें ?

मूर्ती गोजिरि माझिया पुढुन ती लागे हळू यावया
ठावे नाहिं कसा न मी सरकलों मार्गांतुनी तीचिया !
मिथ्या आवरुनी हसें, मजवरी फेंकीत ती इक्शरा
रागानें उसन्या वदे भिवयिनें 'व्हा दूर मार्गें सरा'

" होतों दूर, परी उणीव भरुनी ही काढुं दे सुन्दरी
मन्नामें मज लावुं देच तुझिया कुङ्कू कपाळावरी "

पुणें, ८।२।२२

---

## दैव चित्रकार—

" दृष्टिक्षेपच आजला, स्मित उद्यां गालीं जरा चञ्चळ,
लागावा जवळून तूं निसटता जातां तुझा अञ्चळ,
एकादा दुसराच शब्द अपुरा ओंठावरी तेरवा,
लोकांच्या नजरा क्षणीं चुकवुनी द्यावी फुलें केधवां,
एकान्तीं मज गाठतां मज तुझ्या गालीं दिसावी खळी
कोठें चाहुल लागतां परतणें तों मागल्या पावलीं,
लागे जों हुरहूर, मङ्गल दिनीं येऊन कोणी भट
हातीं हात तुझाच देति, मधला काढून अन्तःपट "

आलों ज्या दिवशीं अनोळखि पुरा मी त्वत्पित्याच्या घरीं
डोलारे रचिले असे, निरखुनी त्वां पाहतां सुन्दरी.
आशा बाळगुनीच ती परतलों कालान्तरानें महा
देखावा भलताच मात्र दिसतो गेहीं तुझ्या आज हा
चित्रें रङ्गविलीं मनीं समजुनी माझा चितारीच मी
'आहे दैवच चित्रकार' कळलें आतां निराशा-तमीं !

साङ्गली, २४।७।२२

---

## तुझ्यावाचुनी

उत्साहें उमलावयास जगता येते उषासुन्दरी
भाण्डारें अपुलीं सुगन्धमय हीं पुष्पें मुदें अर्पितीं
गाया स्वागतगीतिका तरुवरी ठाके विहङ्गावली
देई बालरवी सुवर्णकिरणीं आहेर कीं भर्जरी

जेव्हां मावळतीवरून सविता विश्रान्तिला सेवितो
येती जाति अनेक रङ्ग गगनीं, मागून ये चन्द्रिका
नक्षत्रें अथवा अनन्त खुलती नीलाम्बुधीभीतरीं
सारे उत्सव हे निरर्थक मला एका तुझ्यावाचुनी

होती दिव्य उषेहुनी तव मुखीं माङ्गल्यमन्दाकिनी
वाणीनें अपुल्या तुवां हिणविल्या त्या सारिका कोकिळा
झालें स्थान सुगन्धपूर्ण घडलें वास्तव्य जेथें तुझें
सूर्येन्दू गमले फिके मज तुझ्या आलोकनीं नाहतां

आतां दङ्ग वसुन्धरा असुन ही लीलाविलासामधें
खातों घोर गटङ्गळ्या तुजविना अन्धारसिन्धूमधें

येरवडा, २।१०।२८

---

## विस्मृती ?—अशक्य !

आरम्भीं तव बिम्ब या हृदयिंच्या काचेवरी पातलें
तेथें प्रीतिरसांत घोळुनि चिरस्थायी अतां जाहलें
शक्ती युक्ति न बिम्ब तें पुसुनिया काढूं शके यापुढें
कैसें हें मग साङ्गसी विसरुनी जावें तुला मी गडे ?

सङ्गें चन्द्रहि जेंवि येत असतो ज्योत्स्नेंतुनी हिण्डतां
पैलूपैलुंत लोलकांत दिसतीं दृश्यें जशीं पाहतां
मूर्ति स्थावरजङ्गमीं तव दिसे प्रेमी मना लोचना
जाऊं मी विसरूनिया तुज कसा तें तूंच गे साङ्ग ना ?

तूझी विस्मृति ना कदापि घडणें ! त्वन्नामसङ्कीर्तन
व्हायाचें पुढतीं मुखांतुन तसें या रोमरोमांतुन
सर्वस्वा मुकतां पुरी बधिरुनी वेडावलेली मति
त्याचा ध्यासच एकमेव धरते, होई अमर्त्या स्मृति !

या लोकीं घडलें न जें विधिबळें तें प्रेमसम्मीलन
इच्छाशक्तिमुळें घडेल अपुलें लोकान्तरीं काय न ?

पुणें, ११।२।२२

---

## वानग्या

प्रीतीच्या बिसतन्तुंनीं निज मला आणून ताळ्यावर
माझ्या वृत्ति हळू हळू जडविल्या त्वां आपुल्या पूजनीं
जे वर्षागमनीं सवेग पळती बेफाम फोफावुनी
होती ते सरिदोघ सन्थ फुलतां आम्रावरी मोहर.

येशी वाजवितां न पाउल कधीं, स्कन्धीं हळू अङ्गुली
ठेवोनी मज देशि जागृति तुझ्या मी चिन्तनीं रङ्गतां,
येशी तूं कधिं मोहरून, गमतें स्वप्नास ये सत्यता
ऐसे घालविले शरदृतु किती सङ्ख्या कुणी मोजिली

सारें स्वप्न क्षणीं सरे, उघडुनी मी पाहतों लोचनें—
चान्दीचा चमचा तुवां मज दिला ही चान्दिची लेखणी
हा पेला, परि यांत कांहिं न दिसे; ऐशा तुझ्या देणग्या
अस्ताव्यस्त समोर; – पोकळ तुझें हें मोहरें घालणें.
झाली भातुकली, क्षुधा न शमली बोलांतल्या भोजनीं,
ये दैवीं इथुनी परन्तु सगळया साम्भाळणें वानग्या !

पुणें, १४।२।२३

---

# गेला विझोनी दिवा !

प्रीतीची पहिली तुझ्या उगवती होती उषा जेधवां
आशेचे चढत्या मनोरथ तदा होते जवें धावत
कोणाला कळलीं मुळींच नव्हतीं गूढें भविष्यांतलीं
इच्छेचा दुबळेपणा उमगला तो आपणाला न वा
सारें ईप्सित पूर्ण होइल असें होतें मनीं वाटत
तेव्हां सादर तूं मला प्रिय अशी जी देणगी अर्पिली
ती मीं आजवरी जिवापलिकडे साम्भाळुनी ठेविली
नाहीं पाहवली विधीस, हरपे ती आज कोठें तरी.
प्रीतीला तुझिया मुकून बसलों; होती विसावा जिवा—
तेव्हांपासुन एक ती मज, जशी तारा तमिस्रांतली.
होतों फेंकित दृष्टि ज्यामधुन मी त्या भूतकाळावरी
मूर्त स्मारक तें, दुवा निखळला, गेला विझोनी दिवा !

वार्धक्यें भर यौवनीं पकडलें या प्रेमभङ्गामुळें;
वृद्धाची परि यष्टि आज हरपे ! मृत्यू न कां तो वळे ?

येरवडा, २।८।२३

---

मोहरून–समोरून. मोहरें घालणें–गोन्जारणें. वानग्या–शेष.

## पत्रिकाहवन

गेहीं निर्जनता, भयाण रजनीसाम्राज्य विश्वावरी,
भालू भीषण साद देति मधुनी रानांत शेजारच्या
अग्नी पेटवुनी तदा पसरलें त्याच्यापुढें आसन,
घालूं नाचहि लागल्या उसळुनी ज्वाळा वरी हावऱ्या

वक्षीं ठेवुन वाम हस्त, उजव्या हातांतली आहुती
मन्त्रोच्चार करून ऋत्विज जसा अग्नीमधें अर्पितो
माझें वक्ष धडाधडा उडत तें डाव्या करीं दाबुन
देतों आहुति एक एक तिचिया या प्रेमपत्रांतली

हा थण्डावत चालला अनल, जा जा अग्निनारायणा !
झालें, पार जळून राख बनलीं हीं स्मारकें प्रीतिचीं
राखेच्या परि कागदावर दिसे सुस्पष्ट तीची सही
वायूनें उडवून तीहि दिधली; हें सम्पलें नाटक !

खेळाची सुरवात आणि बघतां हा आजचा शेवट
पेटे अन्तरिं अग्निकुण्ड, जळतो त्याच्यामधें हृत्पट.

येरवडा, २६।११।२३

---

## ज्योतिष्मती

भूगोलार्ध हळूहळू सरकला अन्धारसीमेवरी
तारांचा रजनी सुरम्य चढवी शृङ्गार अङ्गावरी
आली पाङ्घरुनी नटी भरजरी शालू जणूं काजळी
देखावा जरि रम्य हा परि मना दे गारवा ना मुळीं

प्रेमाची तिरपी दिसे चमक ती नेत्रीं जिच्या मोहक
शोभे नाजुक नासिकेंत चमकी बिन्दूपरी बारिक
गालीं चञ्चल वावरे लहर ती बोलेच जें अन्तरीं
डोले सन्तत तीच एक नयनीं – नाहीं जरी भूवरी !

ऐसें पाहुनि यामिनी मिरवते माझ्यापुढें निर्दया
तारा — छे ठिणग्याच ह्या उधळुनी देते शिरीं माझिया
टाका तोडुनि या अनन्त टिकल्या, ध्या काढुनी वैभवें
सोसेना मज हें तिचें हिणविणें, ना लोचनीं पाहवें

ही तारा तुटली — नव्हे, हिरकणी कोणी दिली फेंकुनी
आहा! सत्वर वेदना चुकवितों ही झेलुनी सेवुनी

पुणें, १२।२।२२

---

## मीलन

होती बिम्बत ज्यामधें निशिनिशीं ज्योतिष्मती सुन्दर
झालें जीवनशून्य पात्र नदिचें आतां उन्हाळ्यामुळें
बाजूच्या डगरी गभीर गमती भग्नाश जीवापरी
साऱ्या भीषणतेस त्या अधिकता दे पेटलेली चिता

यावज्जीव जळून हाय उरला जो देह राखेपरी
द्याया अग्नि तयास चार जमले कोणी सगे सोयरे
होत्या आजवरी अगोचर जणू ज्या त्याचिया अन्तरीं
घालूं नाचहि लागल्या प्रगटुनी ज्वाळा निळ्या ताम्बड्या

आकाशांतुनि तारका निखळुनी तों एक त्या बाजुला
गेलीसें गमलें मिळूनहि चितावन्हींत अन्य क्षणीं
लागे शान्तहि व्हावयास मग ती देखून बन्धूजन
माघारा वळले कधीं उमगली ज्यांना मृताची व्यथा

होतें मानवदेहिं हाय ठरलें अप्राप्य जें मीलन
तें ऐसें घडलें बघुन मजला येईल का धीर न?

येरवडा, ८।८।२८

## बालगन्धर्वांस

वृत्त—नराच ऊर्फ पञ्चचामर

विलोल गोल लोचनीं खगोल तेज रङ्गलें
विशाळ भाळदर्पणीं कितीक इन्दु बिम्बले !
त्वदीय जादु लाभली
कुणासही न भूतळीं
म्हणून सेवनीं तुझ्या लहान थोर लागले
तुफान सिन्धु नाचतो
अफाट वात खेळतो
त्वदीय गान ऐकतां क्षणार्ध सर्व थाम्बले
कसा असेल स्वर्ग तो
जगीं कुणी न जाणतो
म्हणून तेथुनी तुला असेल काय धाडिलें ?
कवीन्द्रही नसून तूं
मुनीन्द्रही नसून तूं
स्वगीत—योगसाधनें जगास सर्व भारिलें
स्वरूप रम्य देखुनी
रमून दिव्य गायनीं
सुटून पार्थिवांतुनी समस्त जीव गुङ्गले

येरवडा, २०।३।२४

---

## गायकास नजराणा

जाति—नवती

चन्द्र चवथिचा
रामाच्या ग बागेमधें चाफा नवतिचा
गीत—गायनीं
शब्द ते न, अश्रुहार देसि गुम्फुनी

एक ओल ही
निघतां तव वदनांतुनि डुलत अहिमही !
यामिनी रडे
अश्रुबिन्दु – चान्दणेंच पडत चहुंकडे.
हृदय कढकढे
या गङ्गायमुनांना पूर बहु चढे.
नगहि उपळले
ऐन वसन्तांत मेघ नभिं उफाळले.
सजिव जड बने
जडतेला येइ जीव रडतिं मग वनें.

गायका, तुला
अश्रूंचा नजराणा हाच अर्पिला.

चाफळ, १६।८।२२

---

## सारङ्गीवाला

जाति–'मनमोहन'सारखी

सारङ्गि सारखी तव वाजवुनी टाकी जन गुङ्गवुनी
घोर रजनी विकट हासे
वस्तुठायीं भूत भासे
परि सूर ऐकतां दूर जातसे काहुर मनिंचें पळुनी.
किरकिरे ही रात्र काळी
कीं गृहांच्या ताळमेळीं
वाचते जगाच्या लेख कपाळीं ठेवियले जे लिहुनी.
कटु निराशा माजलेली
नजर पुरती अन्ध झाली
अन्धार हराया दीपराग कीं बवसी तूं आळवुनी.

लागले हे दीप गगनीं
वादनाच्या मञ्जु गानीं
अन्धारसिन्धु मन्थुनी फेंकिसी उडुरत्नें कीं गगनीं.
तीव्र समरीं जीविताच्या
फुटति छाती ज्या जनांच्या
तूं धन्वन्तरि, तीं हृदयें देसी सङ्गीतीं सान्धवुनी.
प्रेम सरलें, शरिर कसलें
प्रेत बनलें त्यास अपुलें
परि आयु सार्थकीं लावाया पथ देसी कीं दाखवुनी
हें उपाशी मूल उठलें
माउलीचे अश्रु प्यालें
अङ्गाइ गावया तया हिण्डसी सारङ्गी वाजवुनी
धूळ जीतें रोज झाली
येथ निजली ही हमाली
चैतन्य द्यावया तिला उद्यास्तव अवतरसी दिव्य मुनी.
उदरभरणीं चोर उठले
देह गणिकांचेहि नटले
परि दिव्य भाव अन्तरीं त्यांचिया पालवसी कीं फिरुनी
भङ्गलेल्या आत्महृदया
रोज फिरसी शान्तवाया
परि भग्नहृदय जीवांस मिळतसे विरङ्गुळा या गानीं
कर कसेंही कर्म दिवसां
सूर रात्रीं घुमवि ऐसा
नेतील विमानांतुनी देव तुज आनन्दें निज भुवनीं

येरवडा, १८।१।२४

---

# कवीस

जाति–'मनमोहन'सारखी

तूं कलावन्त, मग मौन कशाला ? गा सखया गोड गान
मोहरानें आम्र फुलले
वसन्तानें विश्व खुललें
तरि दिला कशाला गळा कोकिळा जरि घेइ तो न तान ?
उषा गगनीं जों उदेली
कान देती वृक्षवेली
तरि विहङ्ग मञ्जुल गायक चञ्चू का लपवी देइ ध्यान
विधात्यानें वतन दिधलें
तुझ्या वहिवाटीस असलें
पिकवुनी न तें तूं असा तयार्शीं नको होऊं बेइमान !
जन भुकेले आळवीती
कौतुकानें गाइ म्हणती
तूं असा कसा रे लहरी छन्दी ? नको होऊं बेगुमान !
दग्ध जीवा जीवदात्री
निस्तुला ही गानशक्ती
तव कवनासव-सेवनीं जनांचें विरुन जावो देहभान !
कला फुलवी ही शिलांना
साधुता दे ही खलांना
हिंस्रता संहरी वन्य पशूंची, ही ऐक्याचें निधान.
झुन्जती ह्या जाति–जाती
कड्यावरुनी खोल पडती
स्वातन्त्र्य-शैलमन्दिरीं पोंचवी बन्धुभावें गीतयान
आत्मतेला जीव मुकती
ध्वान्तपङ्कीं खोल रुतती
परि उद्धाराया तया शलाका पुरे कविची एक तान

ध्येयलङ्का पैल अगदीं
घालितो थैमान उदधी
या सिन्धुशासना सेतुबन्धना तुझें गाणें रामबाण !
मीन जैसे तळमळावे
मूल जैसें कळवळावें
जन आतुर तैसे, पयोद होई तयां द्याया जीवदान !
ही विनन्ती याचसाठीं
ऐकवी ती छन्दधाटी
का दानशूर करि याचक विन्मुख ? नको पाहूं कालमान !

येरवडा, २२।१०।२४

---

# दिवङ्गत कवयित्रीस

वृत्त—वसन्त

१

जिण्याच्या वाळवण्टींचा प्रवासी कमूनशीबी मी
चुकीच्या चालतां वाटा चुकोनी ये तुझ्या धामीं
कवित्वाचे पसा – पोहे तुवां सेवून आनन्दें
सुदामा भूपवीला हा कृपेच्या हीरकीं हेमीं
जिव्हाळा लोचनीं तूझ्या, जिव्हाळा भाषणीं तूझ्या
जिव्हाळा अन्तरीं तूझ्या, मला तो ठेवि आरामीं
तुझ्या मी साउलीमाजी विसावा घेतला कांहीं
मनाला या समाधानी मिळाली तूझिया नामीं
दुरावे भार चित्तींचा, दुणावे भाव भक्तीचा
गमे उन्चावलों कांहीं जरा येतां तुझ्या कामीं

मला मूर्तीमधीं तूझ्या मिळाली माउली माझी
सुखें जी देइ या लोकीं नसावी स्वर्गिच्या ग्रामीं
कसें हें स्वप्नसें झालें ! अकालीं जासि तूं व्योमीं
जिण्याच्या वाळवण्टींचा प्रवासी कमूनशीबी मी

२

तुझ्या जीं अक्षरें काव्यीं कुवे साक्षात् जिव्हाळ्याचे
सुटूनी पार्थिवांतूनी तुझें तें रूप कीं नाचे
तुझ्या या काव्यपुष्पांना न ठावा दर्प दम्भाचा
खऱ्या ओघास झाकाया नसे लेणें तवङ्गाचें
विना-सौदामिनी जैशी नभीं कादम्बिनी शोभे
तसें आल्हाद देणारें तुझीया रूप काव्याचें
रसार्द्रा गीतिका पर्वें जशीं तीं इक्षुदण्डाचीं,
जणूं वा घोस द्राक्षांचे, मणी कीं चन्द्रकान्ताचे
तुझीया भावनोद्रेका म्हणूं राजापुरी गङ्गा
असें पावित्र्य तीर्थांचें तयांमाजी गमे साचें
जणूं वाग्देवतेच्या तूं सुमुक्ता कर्णपुष्पींची
खरें ऐश्वर्य तूं आर्यें ध्रुवाच्या सूर्यपानाचें
क्षणायू पुष्प हें झालें अरेरे पारिजाताचें !
घडीच्या वर्तमानानें असें भूतीं विरायाचें !

ॐ ॐ ॐ

कसें हें स्वप्नसें झालें ! अकालीं लोपली सृष्टी
स्मृतीचीं चाळतां पानें अतां बाष्पान्ध हो दृष्टी

येरवडा, ११।२।२६

# गाउं कशाचें गान ?

जाति—कोकिळा

साथ कशी तुज करूं ? कोकिळे, गाउं कशाचें गान ?
गाउं कशाचें गान ? कोकिळे, घेउं कशी मी तान ?

तुझ्या स्वागतासाठीं मोहर
फुलले आम्रावर चेतोहर
गळा खुले तव सहजीं सुन्दर
मला न जादू तव — जी नाचवि तरुचें पान न् पान.

विश्वासाची दुनिया फिरली
आकाङ्क्षांचीं स्वप्नें विरलीं
रानें हीं ओसाड पसरलीं
कालमान बदललें, जाहलों दुष्काळीं हैराण !

मनोरथाचीं चाकें चारी
परिस्थितीनें गिळिलीं सारीं
हतबल त्यांच्या मी उद्धारीं
करितो तेजोभङ्ग सारथी; कोठुन शरसन्धान !

जरी लागली शिळाच हातीं
आणायातें आकारा ती
घाव घालितां तडेच जाती
कला होय निष्फला; मनोमय मूर्ति न हो निर्माण !

दृष्टीमधली सरली नवता
रङ्गहीनता आली जगता
अन्तर्यामीं भरली जडता
चन्द्रदर्शनाविना सिन्धुला येइल कैंवि उधाण ?

हसें येइना, रडें येइना
जिणें होय हें विनाभावना
अर्थांवाचुनि जेंवि मायना
नदी प्रवाहाविना जशी कीं तरु वठलेला जाण !

तशांत घेइन लकेर मी जर
झाकळून हें जाइल अम्बर
दिशाहि होतिल निमिषीं धूसर
गळून जाइल मोहर अवघा, झडेल पान न् पान !
गाउं कशाला गान ? कोकिळे, घेउं कशी मी तान ?

येरवडा, २८।२।२८



## मोहिता

जाति—मोहिनी

गात रहा सखया अपुलीं आवडिचीं गानें
मीहि तुझ्या सन्मुख बसतें बघत कौतुकानें

शोष जिवा दुर्दम लागे तुझ्या सङ्गिताचा
थाट तुझ्या कवनांमाजी रम्य वसन्ताचा
आणि शरद्-हेमन्तींच्या गोड कौमुदीचा
स्वर्ग यावयातें सन्निध हींच कीं विमानें !

सन्थ सूर निर्झरणीचा लागला विलोकी
गर्द जाम्भळी फळभारें वाकली तटाकीं
सान्ध्य रङ्ग मावळतीला प्रीतिसङ्गमीं की
घनःश्याम माझा तूं, मी राधिका मनानें !

तुझ्या गोड आलापांनीं कान दाटतील
विकल गात्र होउनि, अवघे रन्ध्र विकसतील
तुझ्या भावशब्दांनीं हें मन उचम्बळेल
भूत भावि जन्मांचीं मी करिन तुला दानें !

येरवडा, २४।९।२७

---

## सङ्गीत-सञ्जीवनी

वृत्त—पाण्डव

चालु दे गाणें तुझें कीं घालि पिङ्गा भिङ्गरी
कीं पतङ्गाची भरारी अम्बरीं खालीं वरी

होइ जागी भावना, चैतन्य अङ्गीं दाटलें
आणि या निष्क्रीयतेची खन्त वाटे अन्तरीं

थोर आकाङ्क्षा जिवींच्या सम्प्रती मन्दावल्या
पेट घेती त्या पुन्हा अन्धारल्या हृन्मदिरीं

जुम्पल्या शक्ती रथा ज्या त्या पुन्हा चौताळती
सोडुनी द्याया जुनी चोखाळलेली चाकुरी

झिङ्गुनी गेल्या मना पाजावया सञ्जीवनी
आत्मतेच्या ओळखी देई तुझी ही बासरी.

येरवडा, डिसेंबर १९२५

---

## प्रतीक्षा

जाति—नवती

दार वाजलें उठुन धावलें
पाहिलें, परन्तु नाहिं कोणि पातलें !
केशविरचनीं हातुनी फणी
गळुनि पडे तरि न पटे शकुन कां झणीं !
नाहणी घरीं उपसलें जरी
ऊन पाणि निवुन जाय भान ना तरी !
जाळ फुरफुरे पापणी स्फुरे
अजुन यायचें न कसें ! हृदय हें झुरे.
भाकरी करीं चढत ना वरी
करपुनीहि जाय दुजी ही चुलीवरी.
सहज होय तें रुचिर रायतें
उरवितें न सेवितांहि विटुन जाय तें !
तान्हुली सुशी झोपते कुशीं
कुठुन झोप मजसि ? सुनी बाकिची उशी !

* * *

यायचा उद्या असुन वायदा
ऊठ सुशी, कोण पहा—तिजसि झोपुं द्या.
याल आजला भरंवसा मला
ऊठ सुशी खाउ—तुम्हिच घ्या नि द्या तिला.

येरवडा, ९।१०।२७

---

## वेध

जाति–मुद्रिका

उत्फुल्ल वाटतें मला काय आजला
कां मेघ नसोनी व्योमीं मनमोर नाचुं लागला ?
घरधन्दा करतें जरी रोजच्यापरी
अवधान नसूनहि सारें कां अचूक घडतें तरी ?
मज भाङ्ग काढिता प्रयास पडती किती;
परि आज साधला केंचा निमिषांत सरळ हा अति !
मी कोर कोरतें रोज तरि न साधते
क्षणिं कशी आज ही जैशी इन्दुची नभीं शोभते !
प्रतिदिनीं कितिकदा तरी पुसतसे, परी—
अजि सहज सुबक राङ्गोळी गोपद्में निघती करीं.
फुलवेणी करितां कैक फुलांचा चुरा
परि आज गुम्फुनी झाली किति मोहक ही झरझरा !
परि रमे न मन भोजनीं शयनिं वाचनीं
फिरफिरुन लाट हर्षाची आकण्ठ येइ दाटुनी.
"अजि कमलनायका मुरलि वाजवूं नका"
घोळते मुखामधिं माझ्या सारखें उगीच गीत कां ?
कां मधेंच हृदयीं होइ चमकल्यापरी ?
बावरी करी कसलीशी हुरहूर गोड अन्तरीं.
कां मोहरलीशी मला वाटतें तनू
चैतन्य कशाचें माझ्या सञ्चरलें अङ्गीं म्हणूं ?
हा कसला साक्षात्कार असावा तरी
मी म्हणुन पहाया केलीं लोचनें शेवटीं वरी
तों समोरुनी वेधिती अभावितपणें
ते नेत्र जयांमधिं थोडें मृदु खोडसाळ हासणें
लगबगा खालती पाहुं लागलेंच मी.
नुकताच उतरला होता तों क्षितिजीं भानू श्रमी !

येरवडा, १७।१०।२७

---

# मातृपदाविण

जाति—बालमुकुन्द

[ चाल—तुझ्या बालमुकुन्दें अजि बाइ दैना केली ]

मज विफल गमे ग जीवित माझें सखे !
सुख किती जरी उणिव ही परी मिळति न शिशुचे मुके !
ही चिमणी चारा आणुन घाली पिला
ही पहा वानरी फिरते घेउन मुला
निज कटि-खान्दीं ही लतिका मिरवी फुला
मज हिणविति त्यांचीं वत्सल हीं कौतुकें !

तें अशुभ जसें ग देउळ शिखराविना
नच चन्द्रावाचुन शोभा ताराङ्गणा
मज निष्फळ तैसा गमतो हा स्त्रीपणा
मम तात घरीं या येउन जाती मुके !

मी शिवत बसूं ग कुन्ची झबलें कुणा ?
मी माझ्या मुखिचा घास भरवुं ग कुणा ?
मुख बघुन कोणतें स्वर्गहि मानूं उणा ?
हो स्वर्गसौख्यही मातृपदाविण फिकें !

मी बघुन कुणाला विसरूं हृदयव्रणा ?
प्रिय अधिकचि होइन केव्हां त्यांच्या मना ?
कधिं चिरञ्जीवता येइल सम्मीलना ?
का बालभानुविण वितळुन जाई धुकें ?

येरवडा, २०।१०।२७

# जलक्रीडा

वृत्त—पाण्डव

झोत खालीं आदळे वेगें बळें शीर्षांवरी
विन्चरी केसास, निर्मी मोतियांच्या झालरी.
पृष्ठभागीं लोट घेतां फाकुनी दोहींकडे—
—पङ्ख काचेचे तसें विस्तारुनी पाणी पडे
त्या प्रपाताखालती देखूनिया आम्हां नरां
आमुचा हेवा तुला कां वाटला गङ्गाधरा!
चन्द्रमौळी तूं, ललाटीं आमुच्या इन्दू नसे;
आर्द्रतेनें तें परन्तू तेवि तेजस्वी दिसे.

कापलेल्या फत्तरांचे सान मोठे कोपरे
कीं कराया टाकले हे मत्त हत्ती मोहरे,
रोखुनी कीं ठेवियेल्या तीक्ष्ण भाल्यांचीं फळें,
क्षुब्ध झाल्या शार्दुलांचे उग्र किंवा ते सुळे.
जागचें पाऊल थोडें हालता अर्धा तसू
खोल चिन्चोळया प्रवाहीं भग्न गात्रांनीं असूं!
मृत्युच्या दंष्ट्रा परी भ्यालों न तेथें मोजतां
तीक्ष्ण साऱ्या तत्क्षणाग्रीं हासुनीया नाचतां!

पिन्जलेल्या त्या प्रवाहांतून पाणी धावतां
शुभ्र रत्नांची करी खैरात कोणी देवता.
रूप गारांचें धरी पाणी उशी येतां झणीं
अम्बरींच्या झुम्बराचे साण्डले किंवा मणी
धावतां खाचांतुनी फेसाळलें सारें कसें
कीं दह्याच्या मन्थनीं लोणी जमोनी येतसे
कीं चमेलीच्या फुलांचे वाहती हे पुन्जके.
हाय, येथें सौख्य सारें सेवणें हें मोजकें!

पुणें, २३।१।२३

# नौकाविहार

जाति–शूर्पणखा

सखे ग, प्रशान्त किति यामिनी।
ही तशीच जलवाहिनी ॥ ध्रु० ॥

ही विशाळता कितितरी
तव उदार हृदयापरी
करुं विहार चल तीरीं ॥ सखे ग० ॥

किति अथाङ्ग जळ हें दिसे
तव अगाध अनुरागसें
मज जडे जयाचें पिसें ॥ सखे ग० ॥

तव मुखीं छटा नाचती
जळिं लहरि तशा धावती
तव मृदुता अनुकारिती ॥ सखे ग० ॥

गगनिंच्या सुधासिञ्चनीं
उमलली पहा मेदिनी
कुमुदिनी जणू उपवनीं ॥ सखे ग० ॥

बघ नभांतल्या चान्दण्या
उतरल्या जळीं डुम्बण्या
गतसुखस्मृती जणु मनीं ॥ सखे ग० ॥

चवथिच्या विधूसारखी
चिमुकली दिसे नाव, कीं
फिरुं बसून या पुष्पकीं ॥ सखे ग० ॥

चमकत्या तरङ्गांसवें
ही डुलेल नौका जवें
जशि रसिकजनीं कञ्चनी ॥ सखे ग० ॥

जळ झुलेल जै वायुनें
सुख मिळेल आन्दोलनें
जें दिलें अङ्किं आइनें ॥ सखे ग० ॥


तरुलता उभ्या दों तटीं
लवलवून डोकावती
अनुभवूं सुखें आज तीं ॥ सखे ग० ॥

विहरतो विधू उडुगणीं
सुख इथून मिळवूं झणीं
नभबिम्बित जळिं हिण्डुनी ॥ सखे ग० ॥

भववनांत तूं इन्दिरा
प्रगटलीस या पामरा
सुरपदास न्याया झणीं ॥ सखे ग० ॥

तव कोकिळकण्ठांतुनी
ऐकवी मला गौळणी
नच दुजा स्वर्ग याहुनी ॥ सखे ग० ॥

येरवडा, ३।१।१०।२५



## हा प्रश्न कशाला ?

वृत्त–भिल्लीण दिंडकी

ओठीं भिडलें अमृत किंवा विषप्याला
हा प्रश्न कशाला ?
मी पाहि न कीं प्रास शिलाखण्ड उशाला,
कीं कापुस, पाला.
स्वातन्त्र्य हिरावून जिथें दैव जयी हो
उन्चावुनि बाहो
आज्ञापित 'हो सज्ज करीं घेउन माळा'–
हा प्रश्न कशाला ?
क्षेत्रांत जिथें नाचत कर्तव्यपताका
मी सैनिक बाका,
स्वेच्छेस जिथें वाव न, मृत्यूच तियेला,–
हा प्रश्न कशाला ?
रस्ता उरला एकच गत्यन्तर नाहीं,
जू हें न निघेही;
काटे, खळगे त्यावर कीं फार धुराळा—
हा प्रश्न कशाला !
झाकून बळें नेत्र अतां वावरतों मी
दाबून मनोर्मी.
अभ्यासित संन्यास जिथें आचरणाला–
हा प्रश्न कशाला ?
वैतागुन भोगास मनीं मात्र कुढावें,
क्षोभांत जळावें,
ज्याची दिनचर्याच अशी निश्चित त्याला
हा प्रश्न कशाला ?

येरवडा, २३।२।२८

# कोण्डमारा

जाति–मुद्रिका

मी कुठवर देऊं हात ? कसें सावरूं ?–
खिळखिळे कोसळे माझें घर, टिकाव कुठवर धरूं ?
उतरतें ऊन, पाऊस बघे पाझरूं,
कौलार चन्द्रमौळी हें किति कसें कुठें शाकरूं ?
ह्या तुळया वासे खाम्ब उभे भासती
परि भुङ्गा लागुनि झाल्या फुङ्कण्या नळ्या सम्प्रती
जाहले ढिले गतधैर्य मनुष्यापरी
नच नेम फुङ्करानेंही कधि येतिल धरणीवरी
हा धनको शिरुनी गृहीं कुरतडे खिसा
जाहलों कर्जबाजारी; नुरवि तो धान्यही पसा
हम्बरे भुकेलें बाळ दीन वासरू
मी काय तयाला चारूं ? मी टिकाव कुठवर धरूं ?

तसु तसू ढुसू हें रोज रोज कोसळे
मम एकसारखें तैसें अन्तरीं धैर्य ढासळे
तें क्षयी मनुष्यापरी काळ कण्ठतें
कीं चित्रच माझें साक्षात् मजपुढें उभें भासतें !
पोखरून गेली कुडी सर्वथा, जशी
जाहली भुई ही सारी लागून घराला घुशी.
जरि अभङ्ग वरुनी पोकळ मी आंतुनी
नारळी जीर्ण ही जशी माझिया उभी अङ्गणीं.
भडकल्या चिता माझिया किती मानसीं
त्यांभवतिं नाचती चिन्ता भेसूर भुतें कीं पिशीं !
आभाळ फाटलें जिथें तिथें पाङ्घरूं
का हात ?–तयांनीं कैचा मी टिकाव कुठवर धरूं ?

ये महापूर झरतात नदीचे तट
या विपदीं तैसे माझे आयास आणि हृत्पट !
संसार – घोर सङ्ग्राम चढे त्यांतुनी
का येइल चक्रव्यूहा सौभद्र बाळ भेदुनी ?
दावाग्नि चहू बाजुंनीं भिडे येउनी
आपुला मार्ग शलभानें काढणें केंवि त्यांतुनी ?
मी कुठवर लढवूं कोट असा एकटा ?
खिण्डार पडे तिकडे हें इकडचें जरा लिम्पितां !
क्षोभला सिन्धु, अन्धार घोर दशदिशीं
पोंचवूं पैलतीराला ही बुडती नौका कशी ?
तोलून कसा मी धरूं उमळला तरू ?
तव रोषापुढती ईशा ! मी टिकाव कुठवर धरूं ?

चिन्चवड, ३०।८।२६

---

# अनन्य भाव

मी तुझ्या पदीं जुगणार
तूं तार, मार, झिडकार ॥ ध्रु० ॥

कैकांची मीं धरिली कास
परि न पोटिंची शमली प्यास
केवळ आतां तव विश्वास
धरि मुखीं तूं सुधाधार ॥ तूं तार० ॥

नको कुणाचे मज सम्बन्ध
तुझाच केवळ आतां छन्द
करुन कवाडें सगळीं बन्द
तव ध्यानिं दङ्ग होणार ॥ तूं तार० ॥

बहु रङ्गी हें जगदाकाश,
धवला कान्ती तव चरणास
परन्तु भाविक आर्द्र मनास
सुरचाप तींत दिसणार ॥ तूं तार० ॥

तेज जयांचें मुळांत उसनें
कशास त्यांच्या कुशींत घुसणें ?
तुझ्या पायिंचें व्हावें पुसणें
सकलांस तव पदाधार ॥ तूं तार० ॥

तीव्र विषारी शरनिन्देचे
घाव गनीमी रिपुशस्त्रांचे
येथवरी नच पोचायाचे
तव सार्वभौमता थोर ॥ तूं तार० ॥

क्रोधांतहि तव सुधाच नयनीं
क्रोधांतहि तव सुधाच वदनीं
क्रोधांतहि तव पादिं मन्दाकिनि
तव अवकृपाही प्यार ॥ तूं तार० ॥

विश्वपटावर नरदा फिरती
उरीं मृत्युची धरिती धास्ती
मरती, उठती, फिरुनी मरती
मी कटिवर या बसणार ॥ तूं तार० ॥

येरवडा, २३।७।२६

# मृत्यूस

वृत्त—भिल्लीण दिडकी

जीवास सखा तूंच खरा आश्रयदाता
कीं प्रेमळ माता
कां घोळ असा घालिसि ? ये धावत मृत्यू !
घाली न हुतूतू
हें जीवित कीं सासर, माहेर जिवाला—
तूं एक जिव्हाळा
कां चाळवण्या दाविसि ? दे गाढ मिठी तूं !
घाली न हुतूतू
आलिङ्गन देतील परी दृष्टि हितार्थी
ऐशी जनरीती
प्रेमांत तुझ्या स्वार्थि नसे कांहिंच हेतू ;
घाली न हुतूतू
स्नेहाळ उबेचे जरि हे हातच हातीं
सोसे धग ना ती
त्यांहून बरा गार तुझा हात, परन्तु—
घाली न हुतूतू
दुर्दैव—टणत्कार बसोनी मन मेलें
पिन्जून निघालें !
लावून अतां वेळ नको अन्तर कातूं,
घाली न हुतूतू
ही आग सभोंतीं, श्रम केले विझवाया
गेले परि वाया;
ना [illegible] म्हणावाच जरी आणिक ओतूं !
घाली न हुतूतू

आले कढ जे आजवरी ते निववीले
तें धैर्य निमालें.
ये धाव, अतां आघण जाणारच ऊतू;
घाली न हुतूतू
संसार महासिन्धु फिरे पाहुन दृष्टी,
ही जर्जर यष्टी
नेसील परी पैलथडी तूं जणु सेतू
घाली न हुतूतू
मार्गांत नको तीच कधीं सोबत येई
सन्तापद होई;
वाटे तरि तैं कां न तुटे जीविततन्तू !
घाली न हुतूतू
मुक्काम नको येथ अरत्री न परत्री
या भीषण रात्री;
फुङ्कून शिटी हालवि हातांतिल केतू
घाली न हुतूतू
धाडी फिरुनी येथ कधींही न प्रवासा,
ने स्वीय निवासा !
हें दान तुला मागतसे, बोल 'तथास्तु'
घाली न हुतूतू.

चिन्चवड, १८।९।२५

# मरणा, येउं नको आतांच!

जाति–गोविन्द

येउं नको आतांच मरणा! येउं नको आतांच
मरणा! येउं नको आतांच ॥ ध्रु०॥

तुझ्या दर्शनें भङ्गुनि जाया हृदय न माझें काच
उलट जाणतों तूंच एकला जिवलग माझा साच
मरणा, येइ न परि आतांच

दुक्ख नसावें, भंवति असावा सदा सुखांचा नाच
ही न मनीषा; होइल मजला सौख्यांचाही जाच
मरणा, येइ न परि आतांच

दिली चढवुनी हण्डी, अजुनी जों न लागली आच
तोंच कशाला येसी सखया? जा जा परतुनि जा च!
मरणा, येउं नको आतांच

धुण्डधुण्डुनी वाड वेळ ही शिकार ये होण्यांत
धनुष्यावरी अजुनि चढविला नाहीं परि नाराच
मरणा, येउं नको आतांच

भार शिरावरि दूर किती तरि ध्येयनिवासस्थान
निघालों न जों तोंच अचानक निर्मिसि मार्गी खाच
मरणा, येउं नको आतांच

निरोपिलें मज जयें तयाचें अजुनि न घडलें काज
व्यत्यय आणिसि जों न कराया बसलों सूतोऽवाच
मरणा, येउं नको आतांच

येरवडा, १५।५।२७

---

# तळमळ

जाति–अवनी

सफल कधीं आकाङ्क्षा व्हायच्या कळेना !
करि उदण्ड मी प्रयास सुयश तें मिळेना !

घट वाहुन रात्रन्दिन
भरूं बघतों हा रान्जण
ठरतो परि थेम्बही न,
छिद्र तें दिसेना !

करित रोज समर थोर
लोहगोल वृष्टि घोर
तरि अभेद्य तट समोर
मरत मात्र सेना !

कवळाया रत्ननिधी
मन्थियला किति उदधी
गवसुनि परि तो न कधीं
होइ धनी फेना !

मुग्ध सम्पदाच आंत
गोड अशा सम्भ्रमांत
उघडाया सजत हात
तों रिताच मेणा !

स्फूर्तीची तीव्र धाव
जीवातें तीच हाव
पूर्तीला परि न वाव
पङ्गुता सुटेना !

सूर नभीं गूढ गोड
लाविति जीवास ओढ
घ्याया सहकम्प जोड
शक्त ही न वीणा !

जनन मरण पाय दोन
जाती सोपान चढुन
वरती परि किति अजून
हाय तो दिसेना !

सफल कधीं आकाङ्क्षा व्हायच्या कळेना !

येरवडा, १८।३।२८

---

## उपासक

जाति–माधवकरणी

घिण्ड तुझी काढितों, फिरवितों तुज दारोदार
प्रतीष्ठा मिळवाया लोकीं
त्वत्प्रतिमेच्या भाण्डवलावर माझा व्यापार
शब्दशर असे कुणि रोखी.
परन्तु माझ्या भाव मनींचा आकळतो तुजला
सत्य ना लपे त्वदालोकीं.
अङ्गारे लावून पाहणें दाह जनीं शमला
हेतु ना दुजा ध्येयफलकीं !
चालवितों व्रत तव भक्तीचें, सुलभ जना गमतें—
जनांची वरवरची दृष्टी
तयार व्हाया परि अङ्गारे अन्तरङ्गा जळतें;
आंतली ज्ञात कुणा सृष्टी !

तव मूर्तीचे वागवितों मी माथां पेटारे
रिती परि झोळी काखेला
दण्डावरचे आसूडाचे तसेच फटकारे
तयांचा तर्क कुणी केला !
म्हणोत कोणी कांहिंही परि लागुन फुङ्कर तो
विझो हा नच नन्दादीप !
पदर आड धरि तुझ्या कृपेचा विनन्ति ही करितों.
तूंच कीं मज सकलाधीप

येरवडा, ३०।७।२७

---

## अखेरचें मागणें

जाति–मुद्रिका

रावलों वृथा संसारसौख्यविभ्रमीं
ने प्रभो आपुल्या धामीं, जाहलों सर्वथा श्रमी !
चाललों जरी सत्पथें
तरि तुफान उलटें सुटे
सैराट तारूं भडकतें, विफल रुस्तुमी !
जे विकार उठले बळें
ते तसेच उठुनी दिले
आवरुनि तयां आणिले कधि न संयमीं !
मधुबिन्दु लाभले जिथें
तें मोहळ पडले रितें
मन विगुन्तलें परि तिथें निराशातमीं !
लाभेल सुधा वाटलें
मन म्हणून नादावलें
परि अनुभव कीं विषफळें अधरविद्रुमीं.

हे कितीक जन वेढिती
मम जीवनरस शोषिती
जे बाण्डगुळें प्रगटती वाढती द्रुमीं
अश्रूंत न्हाणुनी उशा
आक्रमिल्या दुःसह निशा
तैशाच उगवल्या उषा खिन्न नेहमीं
व्यापिते निशा पोकळी
लागली चहूं काजळी
ह्या दिगन्त भरल्या जळीं तरूं केवि मी ?
दाविले बहाणे कुणा
वञ्चिलें दुखविलें कुणा
तोडिती स्मृती त्या मना तीक्ष्ण कीं कृमी
अनुताप चढे अनुदिनीं
तव दयाम्बुकादम्बिनी
कां टाकि न ही विझवुनी पेटली धुमी ?
धृति मति श्रुती पाङ्गल्या
ह्या नसा क्षीण जाहल्या
एकेक तुटूं लागल्या न त्यांची हमी
ने प्रभो आपुल्या धामीं; जाहलों सर्वथा श्रमी !

येरवडा, ७।५।२७

---

# दुबळेपणा

अभङ्ग

देवा मी दुबळा हेंच भय पोटीं
माथां पापें खोटीं बैसतात

विषाद वाटे कीं वाचा असमर्थ
अचिन्त्य अनर्थ फैलावतो.

अनर्थांच्या भयें बोलतां न वाणी
'मुरे येथ पाणी' बोलतात.

अन्तरींचे भाव झालिया प्रगट
म्हणती 'नाटक छान केलें !'

लोचनीं आननीं दावितां न भाव
अन्तरीं अभाव वाटे लोकां

जगीं कैसा चालूं ? जनीं काय बोलूं ?
कृति कोण्या तोलूं तराजूनें ?

दुबळा मी देवा हेंच भय पोटीं;
दूषणें ओखटीं सोसूं केवि !

येरवडा, १३।८।२८

# दया नको !

अभङ्ग

नका मारूं मज दया दाखवून
माथां तीव्र ऊन सोसूं द्या हें.

नाङ्गरली भूमी उन्हांत भाजाया
तिच्यावरी छाया बान्धितां कां ?

माझिया प्रयासा तुमच्या कृपेनें
काय फळें येणें भूषणें तीं ?

केलें वरदान देवाजीनें थोर
होय तेंच घोर शाप अन्तीं !

वाहिल्या कावडी तितुक्यांचा दाम
मागतो सुदाम मात्र रोख

कृपेची खैरात विक्रमा विषारी,
आणि ती उधारी प्राणहारी !

नका मारूं मज दया दाखवून
माथां तीव्र ऊन सोसूं द्या हें !

येरवडा, १।१२।२८

## पुष्पसमर्पण

जाति—बालमुकुन्द

[ चाल—तुझ्या बालमुकुन्दें अजि बाई० ]

मम सुमन कुणा हें वाहूं कमलावरा ?
जरि कुणी शिरीं धरिल या तरी प्रफुल्लता ये भरा !

या रङ्गच कोणी म्हणतो नच चाङ्गला
कीं डौलच कोणी म्हणतो न दिसे भला
कीं गन्धच कोणी म्हणतो न रुचे मला
ह्या अवगणनेनें पडति घरे अन्तरा !

करि निन्दा कोणी शुद्ध न याची कुळी
क्षणभङ्गुर गणुनी घेच कुणी ना मुळीं
उपयुक्तपणा तर याचा कोणी तुळी
करि निकष जगाचा भाविकतेचा चुरा !


गिरि गोवर्धन तो सहज तुम्ही तोलिला
पूतनास्तन्य वा प्याला हालाहला
तर तुम्हीच मग ह्या घ्या हो माझ्या फुला
हो मलिन विमल हा प्रभाव तुमच्या करा !

येरवडा, २४।७।२७

REFBK-0003980
REFBK-0003980



मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ३९८०



# विश्रान्ति

